Tuljaram Chaturchand College
Library
★ Baramati ★

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती
ग्रंथालय विभाग

# अनेकान्त वार्षिक नियतकालिक

## (वर्ष १९८१ ते १९८४)

अंक क्रं : १९ ते २२

Acc No. Set No (5) Call No ...........
Tuljaram Chaturchand College
Library, Baramati ( Pune )
Title "Anekant" - Miscellany
(1980-81 to 1983-84)
Author T.C.College, Baramati

| Card No. | Lent on | Received on |
| --- | --- | --- |
| Prof S.B Ingawale | 28/8/2011 | 13/9/11 |
| T43 | 9/11/01 | |

Anekant Education Society's
*Tuljaram Chaturchand College Library*
*Baramati. (Pune)*
Due Date Slip
Acc. No.
Call No.
Tuljaram Chaturchand College Library * Baramati *
5
This book should be returned on or before the date stamped below. Rs. 2=00 (Rs. Two only) will be charged as fine for each day if the book is kept beyond that date.

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती
ग्रंथालय विभाग

# अनेकान्त वार्षिक नियतकालिक

## ( वर्ष १९८१ ते १९८४)

## अंक क्रं : १९ ते २२

8 16 24

साहाय्यक
प्रा. ए. एस्. किर्निगे
प्रा. व्ही. व्ही. उपाध्ये
प्रा. व्ही. ए. संगई
श्री. आर. डब्ल्यू. जोशी

Notice No.:
All
f India Re
igin ID – t

# अनुक्रमणिका

संपादकीय / १
माझे मनोगत / ३
श्रद्धांजली / ५

## ॥ वरिष्ठ महाविद्यालय ॥

कॉलेज निवडणुका । अजित जगताप / ९
समाजपरिवर्तन व युवाशक्ती (पारितोषिक पात्र) । जयराम रायते / ११
कुमारावस्था : मनोचिकित्सा । आर. के. अडसूळ / १२
इराक-इराण युद्ध । सुनील जगताप (नियतकालिक प्रतिनिधी) / १५
शेतकऱ्याचा असूड : एक परीक्षण । सदाशिव कृष्णाजी गाठे / १७
ऐतिहासिक बारामती । सुनील महामुनी / २०
काणेकरांचे ललित व्यक्तिमत्त्व । कु. शामला भुंजे / २२
पार्टी (कथा) । कु. एस्. डब्ल्य. कर्वे / २४
मोह (कथा) । संजय सूर्यवंशी / २७
वीज टंचाई : एक उग्र समस्या । नंदकुमार निंबाळकर / २९
श्री गोमटेश्वर । महावीर माणिकचंद शहा / ३२
संपूर्ण क्रांतीची आवश्यकता । अशोक गायकवाड / ३५

## ॥ कविता ॥

मद्यपी । प्रमोद वडगावकर, जीवन-मार्ग । पी. ए. बंडगर
डिसेक्शन । कु उज्ज्वला मुथा, एका हळव्या संध्याकाळी । दिलीप ज्ञानेश्वर पांढरपट्टे
तू एकटाच । मिराज मुलाणी, पौर्णिमा । प्रमोद दि. वडगावकर
शपथ वाहतो । दिलीप पाठक, नव्या युगाची नवी वाट । दादाराम रघुनाथ सायकर
आठवण । एम्. टी. शेंडगे, असा मी कसा मी । प्रभाकर शांताराम खडके
स्पर्श । दत्तात्रय शेंदरकर, एकदा तू आली होतीस । एन्. डी. शेंडगे

## ॥ हिन्दी ॥

शिक्षा-क्षेत्र में हिन्दी का स्थान । रमेश पिंगळे / ४०
समाज-दीप प्रेमचंद । दयानंद मिसाळ / ४१
किस्सा कुर्सी का । कु. एम्. एम्. धालपे / ४३

## ॥ कविता ॥

गजल । आझाद शेख 'शरीफ', वक्त ही बताएगा । कु. एस्. के. खत्री
प्यार की खातिर । नितीन जगताप, न फिर आवाज देना । मिराज मुलाणी

## ENGLISH

Rights of Women : A social problem । Miss S. K. Khatri / 46
John Keats । Pramod Wadgaonkar / 48
Plants and the energy Crisis । Miss. Ujwala S. Mutha / 49
Semester System and the Students । Ingale R. M. / 51
The Disillusionment (पारितोषिक पात्र) । B. M. Mandhare / 53

## ॥ कनिष्ठ महाविद्यालय ॥

मला प्रभावित करणारी कादंबरी (पारितोषिक पात्र) । राजेश आचार्य / ५६
गोमंतक : एक नंदनवन । कु. मीना संगई / ५९
पराभूत । विलास एस्. पवार / ६१
सामाजिक विषमता आणि आम्ही । कु. शहा एस्. एम्. / ६३

## ENGLISH

The Solar Energy । S. R. Chaphekar / 65

## ॥ कविता ॥

हिवाळ्यातील एक संध्याकाळ (पारितोषिक पात्र) । राजेश आचार्य, बदल । राजेश आचार्य
काळी रात्र । बी. व्ही. झगडे, खूण । सदानंद बेलसरे
नियतीचा घाला । सुनील दयाराम पाटील, फुला रे फुला । एस्. एन्. शिंदे
रूढी । कु. माधुरी गोसावी
पानपूरके । व्ही. ए. क्षीरसागर, घोळवे एन्. एम्., घोळवे आर. ए., स्मिता एस्. बिरबले, शहा आर. एम्.

॥ सिद्धिरनेकान्तात् ॥

# संपादकीय

**हा** अंक हाती देत असताना प्रथम आठवण होते ती डॉ. पुराणिकांची. गेली तीन वर्षे त्यांनी या नियतकालिकाचे संपादन केले. त्यांचा मागोवा घेत, त्यांनी आखून दिलेल्या मार्गाचेच मी अनुसरण केले आहे. त्यांच्या अकाली निधनाने महाविद्यालयाची कधी न भरून येणारी अशी हानी झाली आहे. त्यांच्या स्मृतीला विनम्र श्रद्धांजली अर्पण करून हा अंक प्रकाशित होत आहे.

## स्वागत व निरोप

या वर्षीच्या प्रारंभी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अनेक नव्या प्राध्यापकांची नियुक्ती झाली. त्या सर्वांचे मनःपूर्वक स्वागत. त्याचप्रमाणे काही प्राध्यापकमित्रांना या ना त्या कारणाने इतरत्र जावे लागले. त्यांना त्यांच्या भावी जीवनकार्यात सुयश लाभो ही शुभेच्छा.

प्रा. आर्. एच्. चाफेकर हे या वर्षीच महाविद्यालयाच्या सेवेतून स्वेच्छेने मुक्त झाले. महाविद्यालयाच्या प्रारंभवर्षी रुजू झालेल्या प्राध्यापकांमधील, ते एक आद्य प्राध्यापक. सेवेच्या या दीर्घ कालावधीमध्ये त्यांनी अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या व महाविद्यालयाच्या प्रगतीला हातभार लावला. आपल्या व्यासंगाने व अध्यापन कौशल्याने त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये आदरणीय स्थान मिळवले होते, तसेच आपल्या स्पष्ट पण तितक्याच दिलखुलास मनमोकळेपणाने त्यांनी प्राध्यापकांमध्येही आपुलकीचे स्थान प्राप्त केले होते. महाविद्यालयामधील त्यांची अनुपस्थिती नेहमीच जाणवत राहील. त्यांना त्यांच्या भावी जीवनामध्ये सुयश व समृद्धी लाभो ही सर्वांतर्फे शुभेच्छा.

## महाविद्यालयाची प्रगती

गेल्या काही वर्षांत आपल्या महाविद्यालयाने झपाट्याने प्रगती केली आहे. कोणतीही संस्था उभी राहते ती संस्थेतील सेवकांच्या कर्तृत्वाने आणि परस्परांच्या सहकार्याने. त्याबरोबरच बदलत्या काळाच्या गरजा आणि अपेक्षा लक्षात घेऊन नव्यानव्या योजना आखणारे आणि राबवणारे दूरदर्शी व कल्पक नेतृत्वही संस्थेच्या विकासासाठी आवश्यक असते. सुदैवाने आपल्या महाविद्यालयाला असे प्रेरक नेतृत्व प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांच्या रूपाने लाभले आहे; आणि त्यांच्या सर्व योजना प्रत्यक्षात उतरवणारे परिश्रमी सहकारी त्यांना मिळाले आहेत. म्हणूनच आज आपले महाविद्यालय बारामतीच्या परिसरात मोठ्या वैभवशाली दिमाखाने उभे राहिले आहे आणि सर्वदूर आपला नावलौकिक पसरवीत आहे.

## इमारतींची उभारणी

केवळ इमारती पाहिल्या तरी या महाविद्यालयाचा विस्तार केवढा वाढला आहे याची कल्पना येईल. सभागृह, विद्यार्थि-विश्रामिका, विज्ञान-प्रयोगशाळा इत्यादी इमारतीनंतर आता यावर्षी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दिलेल्या रुपये ६५,०००/– च्या उदार देणगीमध्ये संस्थेने आपले रु. ८५,०००/– घालून दीड लाखाची Students' Recreation Centre (विद्यार्थी आमोद गृहा) ची इमारत बांधून पूर्ण केली आहे. पदव्युत्तर विभागाच्या स्वतंत्र ग्रंथालयाची इमारतही आता पूर्ण होत आली आहे.

## नवे नवे प्रकल्प

पण या इमारतीही अपुऱ्या पडाव्यात इतके नवे नवे प्रकल्प इथे कार्यवाहीत आणले जात आहेत.

महाविद्यालयाच्या गौरवात भर टाकणारा या वर्षाचा सर्वात महत्त्वाचा उपक्रम म्हणजे भाषाविज्ञान प्रयोगशाळा व दृक-श्राव्य केंद्र. विद्यापीठ अनुदान मंडळाकडून यासाठी रुपये ४६,०००/- चे अनुदान मिळाले आहे. अशा प्रकारची भाषाविज्ञान प्रयोगशाळा व दृकश्रवण केन्द्र सुरू करणारे महाराष्ट्रातले हेच पहिले ग्रामीण महाविद्यालय आहे.

या वर्षी सुरू झालेली 'कोहसिप' (College Humanities & Social Sciences Improvement Programme) योजना हीही अशीच एक अभिमान वाटावा अशी घटना. विद्यापीठ अनुदान मंडळाने या योजनेसाठी आपल्या महाविद्यालयाची निवड केली. पहिल्या वर्षासाठी रुपये ९४,१००/– चे अनुदान दिले आणि दिनांक १–१०–८१ पासून पुढील तीन वर्षांसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. बाहेरगावच्या नामवंत व व्यासंगी प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित करणे, चर्चासत्रे भरविणे, शैक्षणिक सहली काढणे, निबंधस्पर्धा घेणे इत्यादी विविध कार्यक्रमांच्या साहाय्याने पदवी वर्गातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला चालना देणे, त्या त्या विषयांतील त्यांची जाण सखोल व व्यापक करणे, त्यांच्या आवडीच्या विषयात विशेष काही करून दाखविण्याची संधी त्यांना उपलब्ध करून देणे इत्यादी अनेक उद्देश्य साधले जात आहेत. विज्ञान व पदव्युत्तर विकासासाठी अशाच प्रकारची Faculty Improvement Programme ही योजनाही या बरोबरीनेच चालू आहे.

या अभ्यासविषयक विविध प्रकल्पांबरोबरच आजच्या काळाची गरज ओळखून आपल्या महाविद्यालयाने तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देणारी सायन्स वर्कशॉप (विज्ञान प्रयोगशाळा) ही या वर्षी सुरू केली आहे; ही आणखी एक वैशिष्टयपूर्ण अभिमानास्पद घटना. पुढच्या वर्षी प्रिंटिंग प्रेस सुरू करण्याचा विचार संस्था करीत आहे.

या वर्षी वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने, कविवर्य प्रा. वसंत बापट, सुप्रसिद्ध कथालेखक प्रा. गंगाधर गाडगीळ, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रा. गं. प्र. प्रधान, समाजवादी नेते भाई वैद्य, समता प्रतिष्ठानचे अध्वर्यु डॉ. बाबा आढाव, विधान सभेतील विरोधी पक्षनेते मा. आ. शरच्चंद्रजी पवार इत्यादी मान्यवर व्यक्तींनी या महाविद्यालयास भेट दिली तेव्हा इथे राबवल्या जाणाऱ्या विविध योजना व अल्पावधीत महाविद्यालयाने केलेली सर्वांगीण प्रगती पाहून समाधान व्यक्त केले.

## प्राध्यापकांचा व्यासंग

या महाविद्यालयातील प्राध्यापकही आपल्या वैयक्तिक विकासासाठी प्रयत्नशील असतात.

मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी. टी. पाटील यांना या वर्षापासून Ph. D. च्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक म्हणून पुणे विद्यापीठाने मान्यता दिली आहे.

रसायनशास्त्राचे प्राध्यापक एम्. बी. चौधरी व वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक डी. के. मगदूम यांना तीन वर्षांसाठी Research Fellow ship मिळाली होती. त्या दोघांनी तीन-साडेतीन वर्षे परिश्रमपूर्वक संशोधन करून Ph. D. साठी आपापल्या विषयातील प्रबंध सादर केले आहेत.

प्रा. व्ही. ए. आचार्य यांनीही आपला प्रबंध पूर्ण केला आहे. या सर्वांनाच डॉक्टरेट मिळाल्याची शुभवार्ता ऐकण्यास सर्वजण उत्सुक आहेत.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख म्हणून रुजू झालेले प्रा. एस्. आर्. काकडे यांना मार्च मध्ये Ph. D. पदवी दिल्याचे पुणे विद्यापीठाने जाहीर केले आहे.

इतरही प्राध्यापक आपापल्या विषयाचा व्यासंग वाढविण्यात व्यग्र असतात. या सर्वांच्या परिश्रमातून व सहकार्यातूनच संस्थेचा विकास होत आहे.

## नवे विचार – नवी दृष्टी

शिक्षणक्षेत्रात आज नवे विचार येऊ लागले आहेत. शिक्षणसंस्था या समाजपरिवर्तनाच्या परिणामकारक साधन ठराव्यात अशी आता विचारवंतांची अपेक्षा आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाची मान्यता मिळालेले विविध प्रकल्प सुरू करण्यामागे हे शिक्षण अधिकाधिक समाजाभिमुख व्हावे आणि या संस्थेतून बाहेर पडणारा पदवीधर स्वावलंबी बनून सामाजिक पुनर्रचनेतील आपला वाटा उचलण्यास तत्पर राहावा हाच दृष्टिकोन आहे.

ग्रामीण परिसरातील शिक्षणसंस्थेवर तर फार मोठी जबाबदारी असते. सामान्यपणे आजच्या शिक्षणपद्धतीमुळे ग्रामीण विद्यार्थी आपल्या समाजापासून दुरावतो. अशा विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण जीवनाविषयी आस्था निर्माण करणे, श्रमाची प्रतिष्ठा जागवणे आणि त्यांना वैयक्तिक व सामाजिक जबाबदारी पेलण्यास समर्थ करणे हे अतिशय अवघड पण तितकेच अत्यावश्यक असे कार्य ग्रामीण परिसरातील शिक्षणसंस्थांनी हाती घ्यावे अशी आजच्या परिस्थितीची निकड आहे

विद्यार्थ्यांपुरतीच आजच्या शिक्षणसंस्थांची जबाबदारी मर्यादित राहिलेली नाही. भोवतीच्या परिसरातील सामान्य मागासलेल्या जनतेसाठीही त्यांनी काही करावे ही अपेक्षा आहे. यादृष्टीने राष्ट्रीय प्रौढशिक्षण योजना, निरंतर शिक्षण केंद्र अशा प्रकल्पाद्वारे आपल्या महाविद्यालयाने सांस्कृतिक प्रबोधनाचे कार्य कर्तव्यभावनेने व उत्साहाने स्वीकारले आहे.

Notice No.:
All
India Re
gin ID –

ज्यांच्यासाठी या सर्व योजना आणि प्रयत्न चालू आहेत त्या विद्यार्थ्यांनी यांचा उद्देश समजून घेऊन मिळालेल्या या संधीचा जाणीवपूर्वक व जबाबदारीने पुरेपूर लाभ मिळवला पाहिजे.

**नियतकालिक**

विद्यार्थ्यांच्या क्रिया प्रतिक्रिया त्यांच्या मनोविश्वातील भावभावना यांच्या प्रगटीकरणाचे माध्यम म्हणजे हे नियतकालिक. त्यादृष्टीने वर्षाच्या सुरुवातीलाच त्यांना लेखनप्रवृत्त करण्यासाठी अनेक विषय सुचविले होते. हेतू हाच होता की केवळ काही ठराविक विषयांवर सांकेतिक पद्धतीने लिहिण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी आपल्या भोवतालच्या परिसराविषयी विचार करावा व स्वतःच्या जीवनातील अनुभव प्रामाणिकपणे व्यक्त करावेत. पण त्याला अपेक्षेइतका प्रतिसाद मिळाला नाही. तरीपण विद्यार्थ्यांनी आपापल्या परीने पुष्कळच साहित्य आणून दिले. सर्वांनाच प्रसिद्धी देणे अशक्यच असते. काही विशिष्ट धोरण सांभाळूनच निवड केलेली असली तरी नियतकालिकाची पूर्वनियत पृष्ठसंख्या हीच खरी अनुलंघ्य अशी मर्यादा. त्यामुळे ज्यांचे साहित्य स्वीकारता आले नाही त्यांनी नाराज वा निराश न होता आपले लेखन सातत्याने चालू ठेवावे व आज ना उद्या त्यांनाही प्रसिद्धी लाभेल हा विश्वास बाळगावा.

**नामाभिधान**

यावेळी नियतकालिकाच्या स्वरूपामध्ये, मांडणीमध्ये बराच बदल केला आहे. 'अनेकान्त' असे नामाभिधानही त्याला आता प्राप्त झाले आहे. वास्तविक आपल्या महाविद्यालयाच्या नियतकालिकाचा प्रा. आर. टी. अक्कोळे यांच्या संपादकत्वाखाली मार्च १९६२ मध्ये निघालेला पहिला अंक 'अनेकान्त' याच नावाने प्रसिद्ध झाला आहे. मधल्या काही काळात हे नाव लोपले होते. तेच आता पुन्हा प्रकाशित होत आहे.

**अनेकान्त**

काहीसे अपरिचित किंवा दुर्बोध वाटणारे हे नाव अत्यंत अन्वर्थक असेच आहे. 'अनेकान्त' ही वास्तवाकडे व जीवनाकडे पाहण्याची एक विधायक दृष्टी आहे. 'वस्तू अनन्त धर्मात्मक' असते. तिचे संपूर्ण आकलन आपल्या मर्यादित बुद्धीने होत नाही. पण जे मर्यादित आकलन होते तेही खोटे असते असे नाही. त्यातही काही एक सत्यांश असतो. पण त्यालाच पूर्ण सत्य मानणे हा एकांत किंवा दुराग्रह होय. अंत याचा एक अर्थ निश्चित निर्णय. तेव्हा कोणत्याही गोष्टीसंबंधी एकांतिकपणे एकच एका निश्चित मताचा आग्रह न बाळगणे असाही अनेकान्तवादाचा एक अर्थ होतो. पण ही झाली नकारात्मक बाजू. प्रत्येक वस्तू अनन्त गुणांनी युक्त असते; कोणत्याही गोष्टीला वरवर परस्परविरोधी वाटणाऱ्या अशा अनेक बाजू असतात याचे भान ठेवून प्रत्येक मतातील सापेक्ष सत्यांश समजून घेणे म्हणजे अनेकान्त हा त्याचा विधायक अर्थ. या दोन्ही अर्थांनी अनेकान्त ही बाह्य वास्तवाचे व जीवनाचे यथार्थ स्वरूप समजून घेण्याची अत्यंत उदार, समन्वयात्मक व सर्वसमावेशक अशी सम्यक् दृष्टी आहे. आजच्या मतमतांतराच्या गदारोळात, दुराग्रही द्वेष-मत्सराच्या भयाकुल वातावरणात, जर व्यक्तिस्वातंत्र्याचा व विरोधी मतांचा समुचित आदर करणाऱ्या लोकशाहीची खऱ्या अर्थाने प्रतिष्ठापना करावयाची असेल व एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला, एका समाजाने दुसऱ्या समाजाला, एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राला अनाग्रही वृत्तीने योग्यप्रकारे 'समजून' घ्यायचे असेल तर या 'अनेकान्ता'चे भान जागृत केले पाहिजे.

सर्व शिक्षणाचे यापेक्षा अधिक व्यापक व उदार मानवतावादी असे दुसरे कोणते ध्येय असणार आहे? अनेकान्तानेच मानवाला त्याच्या 'श्रेया'ची सिद्धी प्राप्त होते. याच सर्वसमावेशक भूमिकेतून, 'सिद्धिरनेकान्तात्।' हे ब्रीदवाक्य संस्थेने स्वीकारले आहे.

**मुखपृष्ठ**

या वेळच्या मुखपृष्ठाचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे. शंकर्स वीकलीच्या जागतिक चित्रस्पर्धेमध्ये पारितोषिक मिळविणारी इयत्ता ११ वी तील एक विद्यार्थिनी कु. उज्ज्वला जगताप हिने हे मुखपृष्ठ आणि आतीलही दोन चित्रे एम्. इ. एस्. हायस्कूलमधील चित्रकला शिक्षक श्री. वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली रेखाटलेली आहेत. या क्षेत्रातील तिच्या भावी उज्ज्वल यशाची प्रसादचिन्हे या चित्रांतूनही रसिकांना प्रतीत होतील अशी खात्री वाटते. या चित्रांनी अंकाला एक आगळीच शोभा आली आहे.

**सहकार्य**

'अनेकान्त' चा हा अंक आता प्रसिद्धीसाठी सिद्ध झाला आहे. ही 'सिद्धी' अनेकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच लाभलेली आहे. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांची प्रेरणा व मार्गदर्शन आणि संपादक मंडळ व जाहिरात मंडळ यामधील माझे सहकारी प्राध्यापक मित्र, नियतकालिक प्रतिनिधी, या अंकात ज्यांना प्रसिद्धी मिळाली ते सर्व विद्यार्थि-लेखक, ज्यांनी ज्यांनी अंकासाठी साहित्य दिले ते सर्व विद्यार्थि-विद्यार्थिनी व जाहिरातदार या सर्वांच्या सहकार्याने या अंकाची उभारणी होऊ शकली. वेगवेगळ्या विषयांवरील लेख तपासून देण्यासंबंधी त्या त्या विषयाच्या प्राध्यापक मित्रांनी वेळोवेळी सहकार्य दिले. या सर्वांचा मी ऋणी आहे.

**आभार**

या अंकाला सरूप साकार करण्यासाठी 'मंदार प्रिंटर्स'च्या व्यवस्थापनाचे आभार मानण्यासाठी माझ्याजवळ योग्य शब्दही नाहीत. या नियतकालिकाच्या छपाईच्या कामाकडे एक व्यवहार म्हणून त्यांनी कधीच पाहिले नाही. अंक जास्तीत जास्त सुबक व देखणा कसा होईल याची चिंता सतत त्यांनीच वाहिली व त्या बाबतीत स्वतः त्यांनी लक्ष पुरविले. चित्रकार मित्र श्री. जयंत ताडफळे यांनी अतिशय देखणी अशी मांडणी करून दिली आणि 'मंदार प्रिंटर्स'च्या सर्व कामगारबंधूंनी उत्तम प्रकारे सहकार्य दिले, म्हणूनच अंक वेळेवर प्रसिद्ध होऊ शकला.

ब्लॉक मेकर्स व्ही. जोशी यांनी कामाच्या गर्दीतही वेळेवर सर्व ब्लॉक्स करून दिले.

या सर्वांचे मनापासून आभार.

●●●

---

## अपंग कल्याण वर्ष

**अपंग म्हणजे कोणी दयनीय, सहानुभूतिपात्र, कीव करण्याजोगी व्यक्ती नव्हे. असे जो कोणी समजेल तोच स्वतः दयनीय ठरेल.**

**अपंग म्हणजे कोणी तुच्छ, हीन, तिरस्करणीय व्यक्ती तर नव्हेच नव्हे. असे जो कोणी मानेल तोच स्वतः तिरस्करणीय वाटेल.**

**अपंग व्यक्ती ही शारीरिक मर्यादांवर मात करणाऱ्या जगण्याच्या धडपडीचे–जीवनाच्या ऊर्मीचे प्रतीक आहे.**

**एखादा आंधळा तुमचे डोळे उघडील. एखादा पांगळा तुम्हांला गिरिशिखरावर वाहून नेईल.**

**अपंग दिसणाऱ्या शरीरातील समर्थ मनाची जिद्द, धडधाकट वाटणाऱ्या व्यक्तींच्या दुबळ्या मनाला प्रेरणा देणारी ठरावी.**

Notice No.:
Al
f India Re
igin ID –

# माझे मनोगत

रसिक वाचकांनो व विद्यार्थी मित्रहो,

आपल्या कॉलेजचा हा १९ वा अंक सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. १९८०–८१ हे वर्ष भारतात व जगात आर्थिक व राजकीय दृष्टीने खूपच गाजले. अशा परिस्थितीत या अंकावर त्याचा परिणाम होणे साहजिक आहे. या अंकात सद्यस्थितीचे दर्शन घडविण्याचा यथाशक्ती प्रयत्न करण्यात आला आहे.

कॉलेजमधील घडामोडींचा चित्रपट दाखविणे हा ज्याप्रमाणे वार्षिक नियतकालिकाचा उद्देश असतो, त्याचप्रमाणे नवोदित साहित्यिकांना संधी देणे हाही एक उद्देश असतो. या नियतकालिकात विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कथा, कविता, लेख, विनोद इत्यादी विविध साहित्य-प्रकारांचा उत्कृष्ट समन्वय दिसून येईल. हा अंक विद्यार्थी-मित्रांच्या साहित्यिक कलागुणांना प्रोत्साहन देणारा ठरेल असा विश्वास वाटतो.

मोती गोळा करावयाचे असतील तर खोल समुद्रात बुडी मारावी लागते. त्यासारखेच नियतकालिक प्रतिनिधीचे काम असते त्याला भरपूर श्रम करावे लागतात. पण जेव्हा हे नियतकालिक तुमच्या हाती मिळेल व तुमच्या पसंतीस उतरेल त्यावेळी त्याच्या श्रमाचे सार्थक होईल.

या वर्षी प्रेम, विरह, प्रेमभंग, मीलन या सापळ्यातून विद्यार्थी-मित्रांनी बाहेर पडावे म्हणून त्यांना काही नवीन विषय दिले होते दलितांच्या समस्या, स्त्रियांचे प्रश्न, ग्रामीण विकास, शेतकऱ्यांच्या समस्या, विविध आंतरराष्ट्रीय समस्या इत्यादी विषय दिले होते, पण विद्यार्थ्यांनी त्याला फारसा प्रतिसाद दिला नाही. मात्र नेहमीप्रमाणेच ठराविक साच्याचे साहित्य भरपूर प्रमाणावर आले. त्यातूनच दर्जेदार साहित्य निवडण्याचा कसोशीने प्रयत्न करण्यात आला आहे.

सर्व लेखक-कवींनी या अंकाचे मूल्य वाढविले आहे. उत्कृष्ट अशा साहित्याचा आविष्कार या अंकात दिसून येईल. इंग्रजी व हिंदी साहित्य आल्याने त्यांचाही विभाग नियतकालिकात आहे. या नियतकालिकासाठी पुष्कळ साहित्य आले होते. पण कागदाच्या वाढत्या किमती, छपाईचे वाढलेले दर यामुळे या अंकाची पाने मर्यादित ठेवावी लागली. ज्यांच्या साहित्याचा आम्ही स्वीकार करू शकलो नाही, त्यांनी नाउमेद न होता आपली साहित्यसाधना चालू ठेवावी.

प्राचार्य डॉ. जे के. गोधा, प्रा बी बी पाटील यांनी या नियतकालिकासाठी मला अत्यंत सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. तसेच ज्या विद्यार्थी वर्गाने साहित्य पुरवून अंकाला बहुमूल्य सहकार्य दिले त्या सर्वांचे मी आभार मानतो. प्रा. आर. टी. शहा, प्रा. व्ही. ए. संगई, श्री. अशोक जगताप, श्री. सुनील महामुनी, नीतिन जगताप, बापू बंडगर, गजानन भोसले यांनी वेळोवेळी सहकार्य केल्याबद्दल त्या सर्वांचे आभार मानतो.

दोस्तांनो...

शेवटी आपल्या कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींचे आभार मानणे जरूर आहे. दोस्तांनो, आपण मला 'नियतकालिक प्रतिनिधी' म्हणून बिनविरोध निवडून देऊन नियतकालिक विभागासाठी सेवा करण्याची अमूल्य संधी दिल्याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानून हा अंक विद्यार्थी मित्रांसाठी सादर करतो.

●●●

सुनील कृष्णराव जगताप
नियतकालिक प्रतिनिधी

# श्रद्धांजली

जी बातमी ऐकल्यानंतर क्षणभर हृदयाचे ठोकेच बंद पडल्याचा भास झाला, ती बातमी आता दारुण नि विदारक सत्य बनून राहिली आहे. काळ जात आहे आपल्या गतीने. त्याच्या ओघात गतस्मृतींनाही धूसर-पण येणं स्वाभाविक असतं... नव्हे, हा अनुभव सार्वत्रिक आहे. पण काळाने आपली रौद्रभीषण अशी मुद्रा ज्या क्षणावर उमटवली आहे अशी डॉ. एस्. एन्. पुराणिकांच्या मृत्यूची घटना घडून काळ जसजसा पुढे सरकतो आहे तसतसे त्यांच्या संगतीत घालविलेले क्षण... त्या स्मृती अधिकाधिक स्पष्ट व प्रकाशमान होत जातात. त्या स्मृतींच्या फेऱ्यात मग, नकळत मन अजूनही आक्रंदून उठते.

'नाही, पुराणिक, तुम्ही इतक्या लवकर असा 'निरोप' घ्यायला नको होता ! अजून तुमच्या पूर्ण विकसित व्यक्तित्वाला आलेला कर्तृत्वाचा फुलोरा आम्हांला बघायचा राहूनच गेला आहे !'

सात वर्षांचाच सीमित सहवास काय तो अनुभवला आम्ही. पण विलक्षण खोल ठसा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा उमटला आहे प्रत्येकाच्या मनावर ! सदैव उंचीकडच झेपावणाऱ्या त्यांच्या विकासशील व्यक्तिमत्त्वाचे आम्हीच साक्षीदार आहोत. अनेक प्रसंगांतील विविध रूपांतील डॉ. पुराणिक आजही नजरेसमोरून हटत नाहीत.

रोज सकाळी सायकलवरून महाविद्यालयात आपल्याच नादात थोडेसे काही विचारांच्या तंद्रीत येणारे पुराणिक कॉलेजच्या फाटकापाशी अगर सायकल स्टँडवर अजून कधी-मधी दिसतात. ठेंगण्या देहाकृतीला नेटकेपणा देणारे आकर्षक असे त्यांचे पेहराव तर चटकन लक्ष वेधून घेणारे... ऋतुमानाप्रमाणे बदलणारे ! कधी पँट व टीशर्ट, कधी कोट-पँट, तर कधी चक्क जाकीट व पँट किंवा इजार, शिवाय थंडीच्या दिवसात पँट व जर्किन व तऱ्हेतऱ्हेचे गडद रंगाचे बुश-शर्टस् ही वेषभूषेतील विविधता जणू त्यांच्या सतत गतिमान व परिवर्तनशील व्यक्तित्वाचे बाह्य संकेतच होते. तो संशोधकदृष्टीचा मध्यम जाडीची भिंगे असणारा चष्मा, त्यांचा ग्रीक योद्ध्याची मुद्रा बक्कलवर असलेला चार इंच रुंदीचा कातडी पट्टा हे कुणावरही आपली विशिष्ट छाप सोडून जात असत. सोबत त्यांच्या व्यासंगाचे ओझं सतत वागविणारी व त्यांच्या कार्य-बाहुल्याची सतत साक्ष देणारी ती कातडी बॅग ! पुष्कळदा अशी एक विचित्र कल्पना डोक्यात चमकून जायची की या कातडी बॅगला वाचा फुटली तर... पुराणिकांचा व्यासंग, नीटनेटकेपणा, कामसूपणा आदि किती किती गोष्टी ती सांगेल कुणास ठाऊक ! पण आता ती बॅगही कायमची अबोल बनली असेल. पुराणिकांच्या हातात तिला जे एक खास 'व्यक्तित्व' लाभले होते तेच आता काळाच्या पड्याआड गेले ना ?

स्टाफरूममधले पुराणिक, त्यांची सहसा न बदलणारी टेबलाशी बसण्याची जागा व सतत कार्यमग्न स्थिती तर केवळ अविस्मरणीयच ! महाविद्यालयाच्या निवडणुकीचे काम, एखादी संशोधन कार्यातील प्रश्नावली, संस्थेच्या प्रशासनातील एखादी नियमावली, एखाद्या सेमिनारची सूत्रबद्ध योजना, नियतकालिकाचे संपादकीय कार्य इत्यादी अनेकविध कामांचा अफाट पसारा, याच बैठकीत सर्व सहाध्यायी प्राध्यापकांच्या समवेत चर्चा-हास्यविनोद करीत करीत. हातावेगळा केलेला या टेबलाने किती उत्सुकतेने पाहिला असेल ! कधी एकटेच काम करीत बसल्यावर त्यांची विशिष्ट पद्धतीने नाट्य-गीतांच्या चालीतील सुरेल शीळ त्यांच्या रूक्ष फायलींनी सुद्धा अगदी साठवून ठेवली असेल आपल्या पाना-पानात ! प्रश्न पत्रिका काढणे, उत्तरपत्रिका व ट्यूटोरिअल्स तपासणे ही कामे समय मर्यादेचे काटेकोर पालन करूनच व्हायची ! एखादे कार्यालयीन जुजबी कामसुद्धा अगदी गांभीर्याने पार पाडताना गप्पागोष्टीतही अनिच्छेचा उद्गार कधी बाहेर पडला नाही. एकदा पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना द्यावयाच्या निरोप-समारंभ प्रसंगी उपदेश करताना डॉ. पुराणिकांनी सांगितल्याचं आठवतं : 'जीवनात जे काम तुम्ही स्वीकाराल ते पूर्ण निष्ठेने आणि जीव ओतून करा– मग यश तुमच्यापासून दूर नाही. मला माझ्या प्राध्यापकांनी हाच उपदेश केला होता व तो मी पूर्ण लक्षात ठेवला आहे. तेच माझ्या जीवनाचे सूत्र मी ठरवून ठेवले आहे.' हे सर्व पुराणिकांचे व्यासपीठावरील व्याख्यानबाजीसारखे नव्हतेच. खरोखरच, पुराणिक

प्रा धनंजय शहा

याच पद्धतीनं जगले आणि लौकिक यश व सन्मानही प्राप्त करीत गेले.

डॉ. पुराणिकांचा पिंड मूळात संशोधकाचा! महाविद्यालयात अध्यापनाव्यतिरिक्त अनेक जबाबदाऱ्या सांभाळूनही आपल्या संशोधन कार्यात त्यांनी कुठे मरगळ येऊ दिली नाही. स्वीकृत कार्य म्हणून महाविद्यालयातील सर्व कामे ते अगदी 'सिन्सिअरली' व एका झपाटलेल्या अवस्थेत पार पाडीत व मग आपल्या आवडत्या क्षेत्रात–संशोधनात अगदी जीव ओतून गुंतून जात. महाविद्यालयाच्या नियतकालिकाची शान त्यांच्या संपादकत्वाखाली निश्चितच वाढली होती याचे कारण प्रत्येक अंकात त्यांचा एखादा विद्यार्थ्यांच्या जीवनाशी संबंधित सर्वेक्षण प्रकल्प व त्याचे निष्कर्ष यावरील संशोधनपर लेख असायचाच. राज्यशास्त्र अथवा अर्थशास्त्र या विषयांचे एखादे चर्चासत्र आयोजित केलेले असो; मग आमंत्रित करावयाच्या विद्वानांच्या यादीपासून चर्चासत्रात एखादा भारदस्त निबंध वाचून दाखवून चर्चासत्राची यशस्वी सांगता करेपर्यंत पुराणिकांना एक आगळेच बळ प्राप्त झालेले असे. एकदा त्यांना सहज विचारले, 'या सर्व गोष्टींसाठी तुम्हांला वेळ कसा मिळतो? तुमचा उत्साह कसा टिकतो?' यावर उत्तर म्हणजे एक विनयशील पण आत्मविश्वासपूर्ण असे स्मित!

'विद्या विनयेन शोभते' हे सूत्र पुराणिकांच्या जीवन कार्यात सर्वत्र अनुस्यूत आहे. गेल्या सात वर्षांत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकांतून त्यांचे काही लेख प्रसिद्ध झाले. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन, नवी दिल्ली; इंडियन कोन्सिल ऑफ सोशल सायन्स रीसर्च, नवी दिल्ली या संस्थांचे तर ते मान्यवर लेखकच झाले होते. इंटरनॅशनल पोलिटिकल सायन्स, पॅरिस (फ्रान्स) या संस्थेने त्यांच्या लेखातील उतारे घेऊन त्यांच्या संशोधनकार्याला आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रच जणू बहाल केले. पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन या विषयातील त्यांच्या व्यासंगाचा लाभ निरनिराळ्या संस्थांनी त्यांची व्याख्याने आयोजित करून, करून घेतला. पुणे विद्यापीठात गेल्याच वर्षी प्राध्यापकांच्या अभ्यास वर्गात 'पोलिटिकल पार्टिसिपेशन' या विषयावर दिलेली दोन व्याख्याने म्हणजे त्यांना विद्यापीठीय स्तरावर मिळालेली तज्ज्ञतेची पावतीच होती. शिवाय बदलत्या राजकीय, सामाजिक वातावरणात सामान्यांच्या जिज्ञासेचे व जिव्हाळ्याचे अनेक प्रश्न नेमके हेरून त्यांवरील अभ्यासपूर्ण लेख वेळोवेळी 'सकाळ' सारख्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध केले. एवढे शोध-निबंध आणि लेख प्रसिद्ध होत असताना त्यासंबंधी गैरवाजवी प्रसिद्धी मिळविण्याचा त्यांनी कधीही खटाटोप केला नाही. ज्यांना त्यांच्या कार्याबद्दल आपुलकी आहे आणि थोडीफार जिज्ञासा आहे अशा मित्रांजवळ मात्र ते सार्थ अभिमानाने व घरगुती वातावरणात या लेखांचा उल्लेख करीत.

एवढे सारे काम ते एकटे करीत. त्यांच्या ज्ञानसाधनेतील हे एक उल्लेखनीय मर्म होते. याच वैशिष्टयांमुळे त्यांचे बोलणे, वागणे हे नेहमीच भारदस्त वाटत असे. विचारात, उच्चारात वा आचारात किंचितही सैलपणा, छछोरपणा किंवा बेपर्वाई नसायची. महाविद्यालयात अगर बारामतीतील सार्वजनिक जीवनात जिथं जिथे त्यांचा संबंध आहे तिथे एखादी समस्या निर्माण झाली की डॉ. पुराणिकांचा सल्ला हा अत्यावश्यक नि उत्साहवर्धक वाटायचा. विद्यार्थ्यांच्या समस्यासुद्धा ते अत्यंत तत्परतेने सोडवीत. विद्यार्थ्यांमध्ये असणारी बेशिस्त प्राध्यापकाला स्वतःच्या वर्तनानेच घालवता येईल असा त्यांचा विश्वास होता आणि तसेच त्यांचे विद्यार्थ्यांशी संबंधही होते विद्यार्थ्यांचे त्यांनी कधी अवाजवी लाड केले नाहीत. गुणी, समजूतदार आणि कष्टाळू विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही इतकीच तत्त्वनिष्ठा व निष्ठुरपणा ते दाखवीत. त्यामळे त्यांच्याबद्दल सकौतुक आदराची भावना प्रत्येकाच्या अंतःकरणात वसत असे.

बारामतीसारख्या आत्मकेंद्री गावामध्ये अल्पावधीतच सामाजिक कार्याशीही ते समरस झाले होते, हे सांगूनही कोणाला खरे वाटणार नाही. मध्यम वर्गीयांच्या जीवनाचा सारा रस शोषून घेणाऱ्या वाढत्या महागाईवर उपाय म्हणजे सहकारी तत्त्वावर ग्राहकांचीच चळवळ उभारणे, हे त्यांना एकदा पटल्यावर आपल्या काही मित्रांच्या व गावातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या सहकार्याने त्यांनी 'ग्राहक संघटना' स्थापन केली. प्रथमपासून त्या संस्थेचे खजिनदारपदही सांभाळले. माल खरेदीपासून माल वाटपापर्यंत कसलीही परिश्रमांची कामे त्यांनी अथकपणे व निष्ठेने पार पाडली. एक राज्यशास्त्राचा पीएच्. डी. पदवी असलेला प्राध्यापक प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी काटा-तागडी हाती घेऊन डाळ, तेल, गूळ यांचे वाटप करीत असतो. हे दृश्यच सर्वसामान्य ग्राहकांना उत्तेजक व आश्वासकही वाटायचे. त्याचप्रमाणे प्राध्यापक मित्रांनी स्थापिलेल्या 'अकल्पित सहकारी गृहनिर्माण संस्थे'त प्रथमपासून उपाध्यक्षपद सांभाळले व संस्थेच्या बारीकसारीक कामात निष्ठेने व उत्साहाने सतत सहकार्य दिले. स्वीकृत जबाबदारी पार पाडताना हलके काम-उच्च काम असला भेद त्यांनी कधीच केला नाही. त्यामुळेच त्यांचा लोकसंग्रहही वाखाणण्यासारखाच झाला होता.

बौद्धिक व सामाजिक क्षेत्रात रमणाऱ्या पुराणिकांच्या व्यक्तित्वाचा एक विलोभनीय विशेष वेगळाच आहे. तो म्हणजे त्यांची कविवृत्ती आणि जाणकार रसिकता! पुराणिकांचे घराणे मुळात जातिवंत कलावंतांचे. कोल्हापुरातील नामवंत गायनकला विशारद अशी त्यांच्या पिताजींची ख्याती. सुरांचा कोमलपणा आणि लयबद्धता कदाचित घरच्या संगीतमय वातावरणात त्यांच्या रक्तातच भिनली असावी! राजाराम महाविद्यालयात शिकत असतानाच त्यांचा साहित्यकलेशी संबंध प्रस्थापित झाला तो कविता लेखनाच्या माध्यमातून. कवितांचा छंद याच काळात त्यांना लागला. अध्ययनाच्या कालावधीनंतर संशोधन व नोकरीसाठी औरंगाबाद, पुणे, कोसबाड, चाळीसगाव आदि ठिकाणी जी भ्रमंती त्यांना करावी लागली त्यातूनच त्यांच्या संवेदनशील व सौंदर्यग्राही मनाला निसर्गात रममाण होण्याची व आत्मस्थ होऊन जीवनानुभवांना सामोरे जाण्याची एक अंतरंग प्रेरणा जाणवू लागली. राज्यशास्त्राची तत्त्वे आणि समस्या यांच्यात गुंतून पडणारा हा कलावंत निसर्गाच्या सानिध्यात खुलू लागला. वाऱ्याशी बोलू लागला, बाळवाशी खेळू लागला, माळांशी व सावल्यांशी एकरूप होऊ लागला. कळ्यांबरोबर संवाद करू लागला. पक्ष्यांबरोबर उंच भरारी मारू लागला. त्यांच्या कवितांतून त्यांच्या तरल काव्यात्म भाववृत्तीची साक्ष पटते.

जीवनावरच्या उत्कट प्रेमाने त्यांना काव्यात्म व रसिक बनविले की जन्मजात रसिकतेतूनच त्यांना जीवनावर निःसंग होऊन प्रेम करायची 'दृष्टी' दिली याचे नेमके उत्तर देता येणे कठीण आहे.

फुफाट कुठे वादळ वारा
फुलांनाही जपत असतो,
त्यांची थोडी चाड ठेव
कधी कुठे रसिक असतो...
...प्रत्येकाच्याच अंतरंगात
सुंदर लेणे दडून असते,
फक्त तुला 'दृष्टि' यावी
सारेच काही फसवे नसते!

या काव्यपंक्ती किती बोलक्या आहेत!

तसेच;

आम्हाला जगायचे आहे
मरता येत नाही म्हणून?
छे! छे!
मरणं इतकं अवघड नाही
अवघड आहे जगणं– मानानं, जिद्दीनं!
मरण ठरलेलंच आहे
जगणं आम्ही ठरवायचं आहे
जीवन आम्हालाच लुटायचं आहे!
यशाच्या वेदीपर्यंत जे मरणंच जगले
तेच ठरले ना असामान्य?
असं रोज मरण येतं
तरीही आम्ही जगत असतो
का? कशासाठी?
मरता येत नाही म्हणून?
छे! ते तर रोजच घडत असतं,
मात्र ते असतं आव्हान

आमच्या पौरुषाला, जिद्दीला
आम्हाला ते समजत नाही
आम्ही म्हणतो
व्यथा आमचीच, कथा आमचीच !
ह्यातूनही फुलूं शकतं जीवन ?
स्विकारलं पाहिजे आव्हान
घेतलीच पाहिजे उडी
अनिश्चिततेच्या अंधारात
मेलीच पाहिजेत मरणं–

या कवितेत जगण्याचा दुर्दम्य आशावाद व मृत्युंजयाची जिद्द किती आवेशाने प्रकटली आहे ! डॉ. पुराणिकांच्या जीवनाचा सारा सारभूत अर्थंच या पंक्तीपंक्तीतून प्रकटतो आहे असं वाटतं !

मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात प्रपाठक पदी नेमणूक झाल्यानंतर आता इतर कामांचा व्याप सीमित होणार होता. व्यासंगी व रसिकमनाला वातावरणाची अनुकूलताही लाभणार होती. व्यासंगपूर्ण सशोधनपर लेखांबरोबरच त्यांच्या संवेदनशील काव्यात्म वृत्तीचा फुलोराही फुलला असता– बघता बघता त्यांच्या स्वीकृत कार्यातील 'तज्ञता' बंधनांना न जुमानता नवनवे भूप्रदेश आक्रमूनही गेली असती...

पण हे सारे घडायचे नव्हते–

त्यांच्या एका कवितेतील काही पंक्ती थोडा संदर्भ बदलून त्यांच्या 'भवितव्या'चे रूप कसे प्रकट करतात ते पाहण्यासारखे आहे.

उगविण्या आधीच कधी मावळतो तारा
ना तेज, ना प्रकाश !
झेपावण्या आधीच कधी गळतात पंख
ना गती, ना फडफड !
कधी कोमेजते फूल उमलण्या आधीच
ना रूप, ना गंध !
तशीच, अगदी तशीच
माझी आकांक्षा, माझी प्रेरणा
झाली आहे छिन्न-भिन्न, घडण्यापूर्वीच.
ना रूप, ना आकार !

॥ श्रद्धांजली ॥



स्व. डॉ. एस्. एन्. पुराणिक



स्व. सुरेश काळे



स्व. सुभाष इंगुले

## चर्चासत्रांच्या निमित्ताने उपस्थित मान्यवर



श्रीमान शेठ लालचंद हिराचंद यांच्या समवेत स्थानिक समितीचे सदस्य



मराठी चर्चासत्र




हिन्दी चर्चासत्र

## हार्दिक अभिनंदन



प्रा. डॉ. एस्. आर. काकडे
राज्यशास्त्रातील पीएच. डी. संपादन



प्रा. डॉ. एस्. एस्. शिंदे
प्राणिशास्त्रातील पीएच. डी. संपादन
व नागोया विद्यापीठ (जपान) येथे
पुढील संशोधनासाठी निवड

## महाविद्यालयाचे प्रथमश्रेणीत प्रथम क्रमांकाचे मानकरी



ए. डी. मालेगावकर, बी. ए.



एम्. एम्. जाधव, बी. कॉम.



व्ही. के. शहा, बी. एस्सी.



कु. प्रतिभा टाकसाळे
एम्. ए. (मराठी)



जी. एम्. ऊर्फ बच्चू शेख
Typewriting 1980 Merit Champion



ए. एम्. जाधव
एम्. कॉम.



एस्. ए. गाडे
गॅदरिंग सेक्रेटरी, विभागीय कुस्ती



ए. एस्. जगताप
विद्यापीठ प्रतिनिधी



ए. व्ही. घुले
आय. सी. एस्. आर. (मुले)
विभागीय कुस्ती



कु. शैला दरेकर
आय. सी. एस्. आर. (मुली)
विद्यापीठ कबड्डी, विभागीय बास्केटबॉल



एस्. के. जगताप
नियतकालिक प्रतिनिधी





कु. सुलभा शिंदे
विद्यार्थिनी प्रतिनिधी,
विभागीय कबड्डी



एच्. एम्. पाटील
सहल विभाग



कु. सुजाता शहा
विद्यार्थिनी प्रतिनिधी



जी. एस्. कुंभार
इंडियन गेम्स



ए. एम्. शेलार
ॲथलेटिक्स



एम्. एस्. ढेरे
क्रिकेट व मायनर गेम्स



डी. जी. शेंदरकर
बॉल गेम्स



एम्. एस्. कदम
ग्रंथालय



पी. बी. शहा
सांस्कृतिक कार्यक्रम



एस्. डी. महामुनी
वादविवाद व वक्तृत्व

## आंतरविद्यापीठ क्रीडा-स्पर्धक



कु. रंजना पोतेकर
कबड्डी (अमृतसर)
राष्ट्रीय कबड्डी (सांगली)
विभागीय बास्केट बॉल



कु. विजया पाटसकर
कबड्डी (अमृतसर)
विभागीय बास्केट बॉल



कु. प्रतिभा शिंदे
कबड्डी (अमृतसर)
विभागीय बास्केट बॉल



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी उपविजयी संघ



एस्. एम्. पोटे
कप्तान, पुणे विद्यापीठ कबड्डी संघ
(जळगाव व कुरुक्षेत्र)

## पुणे जिल्हा विभागातर्फे आंतरविभागीय क्रीडा-स्पर्धांत निवड



कु. मधुमती बोथरा
कबड्डी



कु. अंजली फडतरे
कबड्डी



कु. लता शेरकर
कबड्डी



कु. मालती सिंग
बास्केट बॉल



कु. अमिता धामणस्कर
टेबल टेनिस



व्ही. जी. तावरे
व्हॉलीबॉल



व्ही. एस्. शहा
टेबल टेनिस



एम्. पी. जोशी
टेबल टेनिस



एच्. पी. गोरे
टेबल टेनिस

Notice No.:
Al
f India Re
igin ID –

## पुणे जिल्हा विभागातर्फे आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धांत निवड



कु. छाया मोरे



कु. माया मिसाळ



कु. वर्षा पोळ



कु. उज्ज्वला वाघ



कु. कल्पना पोळ



कु. शुभांगी पाटील



कु. शुभांगी दुरुगकर



कु. अंजू वणजवाडे



कु. मंगला मुथा

## पुणे जिल्हा विभागातर्फे आंतरविभागीय क्रीडा-स्पर्धांत निवड



एस्. के. जाचक
कुस्ती



डी. बी. काळे
कुस्ती



पी. आर. चक्रनारायण
कबड्डी



एस्. आर्. माने
मल्लखांब



एस्. टी. गायकवाड
मल्लखांब



ए. ए. चंदनशिवे
मल्लखांब



एस्. एम्. खान
बास्केट बॉल



पी. डी. शेळके
बास्केट बॉल



ई. एन्. रूपनवर
मल्लखांब

## विजयी क्रीडा संघ



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी विजयी व विभागीय उपविजयी संघ



आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल विजयी संघ



आंतरमहाविद्यालयीन बास्केट बॉल उपविजयी संघ

## विजयी क्रीडा संघ



आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट विजयी संघ



आंतरमहाविद्यालयीन कुस्ती विजयी संघ



आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब विजयी संघ

## * राष्ट्रीय छात्र सेना *



एस्. डी. महामुनी
कॅडेट सि. अंडर ऑफिसर



एन्. एम्. घोळवे
ज्यु. अंडर ऑफिसर



ए. आर्. राक्षे
ज्यु. अंडर ऑफिसर



सी. आर्. महाडिक
ज्यु. अंडर ऑफिसर



मा. प्राचार्य डॉ. गोधा यांच्या समवेत रँक होल्डर्स

## राष्ट्रीय सेवा योजना



प्रोग्रॅम ऑफिसर व गट प्रमुख

## विविध कार्यक्रम



श्रीमान शेठ लालचंद हिराचंद पंच्याहत्तरीनिमित्त सत्कार



वाणिज्य विभाग– चर्चासत्राचे उद्घाटन





उपशिक्षण संचालक (उच्च शिक्षण) श्री. वाय्. एम्. दुबे यांची भेट



प्रा. गंगाधर गाडगीळ व मिस. टी. मॅथ्यू (डे. कलेक्टर)



प्रा. डॉ. एस्. आर्. काकडे यांचा सत्कार

Notice No.:
Al
f India Re
igin ID –

## विविध कार्यक्रम



मा. आ. शरच्चंद्रजी पवार व डॉ. दासवानी भाषाविज्ञान प्रयोगशाळेचे निरीक्षण



श्री. ॲड. धन्यकुमार दोशी





श्री. ए. एन्. कोल्हटकर – असिस्टन्ट इन्कमटॅक्स कमिशनर



मा. आ ग. प्र. प्रधान

– वृक्षारोपण –



समाजवादी नेते भाई वैद्य

## विविध कार्यक्रम



प्रा. डॉ. एस्. डी. पाटील, अधिष्ठाता - शास्त्रविभाग



प्रा. डॉ. प्रभाकर ताकवले, अधिष्ठाता - कला विभाग



डॉ. बाबा आढाव



प्राचार्य डॉ. हेमंत इनामदार



प्रा. वसंत वापट



शीघ्रकवी श्री. यशवंत तांदळे

## पारितोषिक - वितरण




कु. प्रतिभा टांकसाळे [प्रमुख पाहुणे : मा. डॉ. व. मा. कोठारी] व्ही. के. शहा



मिस्. टी. मॅथ्यू यांच्या हस्ते
पारितोषिक स्वीकारताना कु. प्रतिभा शिंदे



मा. डॉ. व. मा. कोठारी यांच्या हस्ते
पारितोषिक स्वीकारताना एस्. एम्. पोटे




कु. रंजना पोतेकर [प्रमुख पाहुणे : मिस्. टी. मॅथ्यू (डे. कलेक्टर)] कु. विजया पाटसकर

### कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वाद व वक्तृत्व स्पर्धा



वक्तृत्व ढाल : आर्. ए. बादरायणी
लॉ कॉलेज पुणे



वादविवाद ढाल : शैलेश सडेकर व प्रदीप टिल्लू
के. जोशी आर्टस्, एन्. जी. बेडेकर कॉमर्स कॉलेज, ठाणे

प्रमुख पाहुणे : प्राचार्य डॉ. एस्. डी. पाटील

## वर्ग प्रतिनिधी



ए. जी. शेंडे
एस्. वाय्. बी. एस्सी.



व्ही. बी. जाधव
टी. वाय्. बी. एस्सी.



आर्. आर्. वोबडे
टी. वाय्. बी. कॉम्. (अ)



यू. आर्. शहा
टी. वाय्. बी. कॉम्. (ब)



आर्. एम्. इंगळे
एम्. ए.

## वर्ग प्रतिनिधी



पी. आर्. आटोळे
एफ्. वाय्. बी. ए. व विभागीय कुस्ती



एस्. एस्. भराटे
एफ्. वाय्. बी. कॉम् (अ)



जी. वी. घुले
एफ्. वाय्. बी. कॉम् (ब)



एस्. वाय्. जगताप
एफ्. वाय्. बी. एस्सी.



वी. एस्. खोमणे
एस्. वाय्. बी. ए. (अ)



एस्. बी. धायगुडे
एस्. वाय्. बी. ए. (ब)



ए. व्ही. जगताप
एस्. वाय्. बी. कॉम्. (अ)



आर्. एम्. देडे
एस्. वाय्. बी. कॉम्. (ब)

## कनिष्ठ महाविद्यालय – यशाचे मानकरी



एच्. यू. आटोळे



कु. माधुरी खटावकर



कु. उज्ज्वला जगताप
पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते
पारितोषिक स्वीकारताना



एस्. डी. इंगुले
भालाफेक
महाराष्ट्र राज्य सुवर्णपदक



कु. सुप्रिया चाफेकर



एस्. डी. इंगुले

Notice No.:
Al
f India Re
igin ID –

## महाविद्यालयात प्रथमश्रेणीत प्रथम



कु. माधुरी पावसकर
१२ वी सायन्स



एच्. यू. आटोळे
१२ वी आर्टस्



कु. माधुरी खटावकर
१२ वी कॉमर्स

## वर्ग-प्रतिनिधी



ए. एस्. सावळे
१२ वी शास्त्र (अ)



पी. बी. खटके
१२ वी वाणिज्य (अ)



सी. एस्. बोरकर
१२ वी वाणिज्य (ब)



एस्. पी. येळे
१२ वी वाणिज्य (क)



एस्. एस्. काळे
१२ वी कला (ब)



बी. डी. वाबळे
११ वी वाणिज्य (क)



एम्. बी. बोरा
११ वी कला (अ)



व्ही. एन्. पाटील
११ वी कला (ब)

# साहित्याविष्कार



● 'जी आमची मातृभाषा, ती आम्हांस स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ असायला हवी. ती आम्हांला मातेसमान पूज्य असली पाहिजे. पण आम्ही तिचा उचित तो आदर करतो का ? की अजून आम्ही तिला इंग्रजीची दासी-बटकी म्हणूनच वागवितो ?
सभ्य हो ! दुर्दैवानं अशा निष्कर्षावर यावं लागतं की तेवढंही मोल आम्ही स्वभाषेला देत नाही .. कित्येक सुजन मला असे माहीत आहेत, की जे मातृभाषेत बोलायला लाजतात...मराठी साहित्य वाचता का ? असा प्रश्न केला असता ते तुसडेपणानं सांगतात, की नाही बुवा, आम्हांला मराठी भाषेतलं नाही काही आवडत ! आम्ही आपलं इंग्रजीच वाचतो.
ध्यानी घ्या, की हे केवळ करंटेपण आहे.'

गो. नी. दांडेकर
अकोला येथे झालेल्या अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून.

● नवे साहित्य नवी जाणीव निर्माण करू पाहत आहे. भयावह परिस्थितीशी सरळ-सरळ झगडण्याचे सामर्थ्य साहित्यात वा कलेत कितीही क्षीण असो, मनुष्याच्या संवेदनाविश्वाला ते ढवळून टाकू शकते. चटका देऊन त्याला ते जागे ठेवू शकते. त्याच्या डोळ्यांवरचे अभ्र बाजूला सारते.

त्र्यं. वि. सरदेशमुख



॥ श्री राम प्रसन्न ॥

प्रेमळ बंधु-भगिनींनो,

आपल्या कॉलेजमधील वार्षिक निवडणुकीत मी आपल्या वर्गातून वर्ग-प्रतिनिधी पदासाठी उभा आहे. तरी आपण आपले बहुमोल असे मत देऊन मला आपली सेवा करण्याची संधी द्यावी ही विनंती.

आपला,

(टीप– **मतदान तारीख ३१–७–८० रोजी सकाळी ८॥ ते १०**)

**वा**चकहो, वरील जे काही आहे ते कॉलेज निवडणुकीतील पोस्टर्सचा एक नमुना आहे. जुलै महिना गाजतो तो कॉलेज निवडणुकीमुळे. तर ह्या कॉलेज निवडणुका आहेत कशा आणि त्या होतात कशा या संबंधीचे काही विचार मी आज तुमच्यापुढे मांडत आहे.

निवडणुका म्हटले की पॅनल तयार करणे, पोस्टर्स छापणे, मुलांना पार्टी देणे, प्रचारासाठी गाडी फिरवणे इत्यादींसाठी आज कित्येक कॉलेजांमध्ये हजारो रुपयांचा खर्च होतो. पैशासाठी इतर मुलांकडे मागणी करणे व ते न दिल्यास त्यांना धमक्या देणे असे प्रकारही चालतात. राजकीय पक्षांचा पाठिंबा घेऊन काही कॉलेजांमध्ये निवडणुका लढवल्या जातात. त्यांच्याबरोबर भाडोत्री गुंडही येतात. विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी म्हणे निवडणुका लढवायच्या व निवडून यायचे. पण हे प्रतिनिधी निवडून आल्यावर 'मी कोणी तरी मंत्री आहे' या आविर्भावात वावरतात.

आपल्या भारतीय लोकशाही राज्यपद्धतीमध्ये सर्वाधिक महत्त्व आहे ते निवडणुकीला. निवडणुकीद्वारे जनता आपला प्रतिनिधी लोकसभेवर व विधानसभेवर पाठवत असते. विद्यार्थीदशेतच त्यांना ही ओळख झाली तर पुढे मोठे होऊन निवडणुका लढविणे आणि आपल्या प्रतिनिधींची निवड करणे त्यांना सोयीचे जाईल या हेतूने शाळा आणि महाविद्यालये या शैक्षणिक संस्थांमधून निवडणुका सुरू करण्यात आल्या आणि त्या सध्या चालू आहेत.

निवडणुकीच्या काळात महाविद्यालयाचे वातावरण फारच तापलेले असते. शहरी भागातील मुले आणि ग्रामीण भागातील मुले असे दोन तट बहुतेक सर्व महाविद्यालयांत असतात.

निवडणुकीच्या काळात उमेदवाराचे तोंड पाहण्यासारखे असते. पैसा खर्च करून तो जवळजवळ वाकलेलाच असतो. पोस्टर्स हा या निवडणुकीतील प्रचाराचा सर्वांत जास्त वापराचा प्रकार. ही पोस्टर्स भरपूर पैसा खर्च करून तयार केलेली असतात. काय तो कागद ! आणि तो रंग ! जिकडे तिकडे पोस्टर्सच पोस्टर्स ! काही महाविद्यालयांतून तर प्रचारासाठी टॅक्सी, मोटारसायकल, स्कूटर्स यांचा वापर केला जातो. यासाठी अक्षरशः हजारो रुपयांचा चुराडा केला जातो. ज्यांच्याकडे पैसा भरपूर आहे असे 'लक्ष्मी-पुत्रच' या निवडणुकीच्या रिंगणात उतरतात.

३ ऑक्टोबर १९८० : पुणे विद्यापीठ विद्यार्थि-निवडणुकांसाठी गजबजलेलं होतं. या निवडणुका येतात तशा जातात. परंतु यावर्षी मात्र त्या फारच गाजल्या. विद्यापीठात मंत्री म्हणून विद्यार्थी निवडून दिले जातात, त्याची पद्धत अशी :

विद्यापीठाच्या कक्षेतल्या सर्व कॉलेजेसमधून प्रथम त्या त्या वर्गाच्या विद्यार्थ्यांमधून सी. आर्. निवडले जातात. या सी. आर्. मधून एक यू. आर्. कॉलेजतर्फे निवडला जातो. नंतर विद्यापीठ सिनेटमधील विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी पदासाठी यू. आर्. उभे राहतात. निवडून आलेले यू. आर्. हे चेअरमन, सेक्रेटरी व इतर जागांसाठी विद्यार्थी निवडून देतात.

विद्यापीठ-कायद्याप्रमाणे निवडून आलेल्या यू. आर., चेअरमन, सेक्रेटरी या प्रतिनिधींचे हक्क काय हा वेगळा विषय आहे. कारण त्यांना विशेष असे काही हक्क नाहीतच.

या वर्षी पुणे विद्यापीठाच्या निवडणुकीच्या रिंगणात कॉंग्रेस आय, कॉंग्रेस अरस व आयसो (ऑल इंडिया स्टुडंट्स ऑर्गनायझेशन) हे तीन पक्ष उतरलेले होते. मतदानाची वेळ होती दुपारी बाराची. त्याअगोदर साडेअकराला सर्व विद्यापीठप्रतिनिधींची मीटिंग असते.

**अजित जगताप**
**टी. वाय्. बी. ए., विद्यापीठ प्रतिनिधी**

# कॉलेज निवडणुका

त्या मीटिंगला फक्त एक विद्यापीठप्रतिनिधी हजर होता. हळू हळू विद्यापीठासमोर गर्दी वाढू लागली. पण मीटिंगला जायचे नाव कोणी घेईना. हॉल रिकामाच. मग बाहेरची गर्दी कोणाची ?

गाड्या लागत होत्या. एवढ्यात एक गाडी येते. गाडीतली मुले आवाज देत असतात, 'इंदिरा गांधी झिंदाबाद !' दुसरी गाडी येते. त्या गाडीतली मुले आवाज देत असतात, 'शरद पवार झिंदाबाद !' मनात येतं, चेअरमन, सेक्रेटरी या जागांसाठी कोण उभे आहेत ? आणि या राजकीय नेत्यांची नावे हे विद्यार्थी का घेत आहेत ? मग या निवडणुका विद्यार्थि-निवडणुका कशा ? अन् एवढ्यात आवाज येतो, 'आयसो झिंदाबाद'. यांचा आवाज इतरांचे लक्ष वेधून घेत असतो.

मतदान-केंद्रावर एकच धावपळ सुरू असते. कॉंग्रेस अरसचे नेते, कॉंग्रेस आयचे नेते, आयसोचे नेते उपस्थित असतात. विद्यार्थ्यांचे उमेदवार सर्व गंमत पाहत असतात. आयवाले, अरसवाले लोक मुलांच्या बाजूला कडे करतात व साखळी करून एक एक मुलास मतदान-केंद्रावर उभे करतात. खेचाखेची, दमदाटी सुरू असते. लोकशाही मूल्ये पायदळी तुडवली जातात. यू. अरा.च्या मनावर एकप्रकारचे दडपण आलेले असते.

हजारो रुपयांचा खर्च झालेल्या अशा निवडणुकीने विद्यार्थ्यांमध्ये कोणती लोकशाही मूल्ये रुजवली ? त्यातून काय साधले ? हे पक्षीय राजकारण या मुलांना अशाच विचित्र वाटेला लावणार काय ?

तर अशा या कॉलेज-निवडणुकीत मारामाऱ्या होतात, बाहेरचे गुंड येऊन दमदाटी करतात, मुलांना पळवून दूर कुठेतरी लपवून ठेवले जाते. बोगस मतदान केले जाते. काही ठिकाणी मुलींची छेड काढली जाते. मुला-मुलींच्या आईवडिलांना घरी जाऊन धमकी दिली जाते असे अनेक गैरप्रकार कॉलेजमध्ये सुरू होतात. विद्यार्थी-विद्यार्थिनी एका चुकीच्या मार्गाला लागतात. हजारो-लाखो रुपयांचा चुराडा होतो.

खरोखर या कॉलेज-निवडणुकीतून देशाला तर काही मिळणारच नाही. विद्यार्थ्यांच्या मनावर लोकशाही मूल्यांचा कसलाही संस्कार होत नाही. उलट निवडणुकीतील गैरप्रकारांची मात्र या वयातच ओळख होते. म्हणून प्रथम या कॉलेज-निवडणुका बंद करण्याचे उपाय योजावेत असे माझे प्रामाणिक मत आहे.

●●●

'समाजपरिवर्तनात युवकांची भूमिका कोणती ?' या अत्यंत ज्वलंत आणि जिव्हाळ्याच्या प्रश्नावर मत मांडण्यासाठी आज मी प्रवृत्त झालो आहे. प्रथम 'समाज-परिवर्तन' म्हणजे नेमकं काय ? या भल्या मोठ्या प्रश्नचिन्हाला उत्तर द्यावं लागेल. म्हणून तिथूनच मी माझ्या विषयाला आरंभ करतो. मानवी समाजाच्या इतिहासाचा विचार केला, तर एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते आणि ती म्हणजे मानवी समाज हा 'परिवर्तनशील' आहे. संक्रमण ही त्याची सहजप्रवृत्ती आहे. रीती-रिवाज, आचार-विचार, जीवन पद्धती यात सातत्याने बदल होत गेलेला दिसेल. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे प्राप्तकालात स्थिरता वा निश्चितता लाभावी म्हणून मानवी समाजाच्या विविधांगांत होणारे बदल म्हणजे समाजपरिवर्तन. In its basic sense social change means change in social structure या डॉ. हेन्री जॉन्सन यांनी केलेल्या व्याख्येप्रमाणे समाजातील ज्या बदलांमुळे समाजरचनेत फरक होतो, त्यासच आपण समाजपरिवर्तन म्हणू शकू. ही झाली समाजपरिवर्तनाची मूलभूत कल्पना.

एक कोटीहून अधिक वर्षांपूर्वी कोणी एक मर्कट आपल्या पाठीमागच्या पायावर पाठीचा कणा ताठ करून उभा राहिला त्यानंतर १० लाख वर्षे जावी लागली आणि आजच्या मानवाचा आदिम पुरुष अस्तित्वात आला. मानवी मन किंवा जाणीव ही अशी उत्क्रमणशील आहे. त्याची बुद्धी ही देखील अशीच सतत उत्क्रान्त झाली आहे. आज तर काही शास्त्रज्ञ मानवाच्या बुद्धीचा पूर्णपणे विकास झाला आहे असेही म्हणतात. कदाचित सध्याचा कालखंड हा संपूर्ण इतिहासातला महत्त्वाचा टप्पाही असेल.

अर्थातच ही परिवर्तनाची प्रक्रिया सतत चालू असल्याने दोन पिढ्यांमधील संघर्ष ही एक अटळ बाब असते. कारण परिवर्तनाचा अर्थच मुळात रीति-रिवाजांना कलाटणी असा आहे. जुन्या परंपरा कवटाळणारे पारंपारिकतेच्या शृंखलात अडकलेले रूढींचे आणि सवयींचे गुलाम आणि याविरुद्ध 'Youth is he who carries young head on his young shoulders' या बाबा आमटे यांच्या व्याख्येशी मिळतेजुळते असणारे उफाळते तारुण्य खांद्यावर घेऊन नवनवीन क्षितिजे धुंडाळणारी तरुण पिढी यांमधील हा संघर्ष असतो. आता प्रश्न असा उद्भवेल की, या सर्व बदलात युवक नेमका कुठे येतो ?

मला अभिप्रेत असणारे तारुण्य केवळ शरीराचे नाही. कारण तारुण्य किंवा वृद्धत्व शरीराशी निगडित नसून वृत्तीशी निगडित आहे. ऐन उमेदीत सुद्धा टिचभर छातीची, किडक्या मनाची आणि पिचक्या मनगटाची दिशाशून्य तरुण पिढी समाजपरिवर्तनाच्या नव्हे, तर बेलबॉटमच्या घोळात सापडलेली आपण पाहतो. त्या वाढलेल्या झुलुपाखालील विचारगंगेचे झरे आटून गेलेले आहेत हे पाहताच तिथं केवळ शरीर तरुण आहे, असंच कुणीही म्हणेल. याउलट जेव्हा एखादा कार्ल मार्क्स लंडनच्या लायब्ररीमध्ये बसून सिगारेटीवर सिगारेटी ओढीत विचार करतो व आपल्या विचारांच्या साहाय्याने रशियन क्रांतीला प्रेरणा देतो, तो तरुण नव्हे काय ? जुन्यातले नेमके पुष्ट-पोषक, वर्धिष्णू स्वीकारून त्याच्याशी नव्या क्रांतिकारी विचारांची सांगड घालून, तो विचार समाजाच्या उत्कर्षासाठी वापरू इच्छिणारे ते सर्व तरुण; त्यासाठी वेळप्रसंगी स्वप्राणांचे बलिदान करणाऱ्या वृत्ती बाळगणारे ते सर्व तरुण आणि असेच तरुण आणि तरुणच फक्त समाज-परिवर्तन करू शकतात. समाजपरिवर्तन म्हणजे प्रवाहाच्या विरुद्ध पोहावयाचे आहे. त्यासाठी त्याने हात मारणे अधिक महत्त्वाचे आहे. तो थांबला तर तसाच वाहत जाईल. शेवटी समाजपरिवर्तन युवकां-शिवाय होणे अशक्य. कारण तरुणाईला लाभलेली संघर्षाची जाण, ती त्याच्या गाभ्यात खोलवर असते. हाच संघर्ष जुन्या पिढीने हरवलेला असतो. म्हणूनच उन्नत माथ्याची, पाणीदार डोळ्यांची, युवाशक्तीच केवळ हे कार्य करू शकेल.

आता आपण आपल्या समाजाकडे वळू. तिथं अनेक सामाजिक प्रश्न भुकेल्या नजरेनं परिवर्तनाची केव्हाची वाट पाहत आहेत. पण उणीव ही आहे की जो उठतो तो चर्चाच करतो. तेव्हा प्रारंभी मी सांगितल्याप्रमाणे परिवर्तनाचा केंद्रबिंदू जर युवक असेल तर हे सारे प्रश्न-उपप्रश्न आपणच सोडविले पाहिजेत. त्यासाठीच राजहंसाची शोधकता, चातकाची निष्ठा आणि गरुडाची झेप जोपासली गेली पाहिजे.

तर मी उल्लेखलेले सामाजिक प्रश्न केवळ युवकच सोडवू शकेल हे माझे विधान कदाचित अतिशयोक्ती-चेही ठरेल. पण वर्गकलहासारखा, हुंड्यासारखा प्रश्न आज शेकडो वर्षे झाली सुटत नाही. याचे कारण म्हणजे अंध रूढींचा आणि रिवाजांचा पगडा. मानवतेची सूक्ते गाणाऱ्या आम्ही या अन्यायाला वाचा फोडायची ठरवलं तर ते अशक्य का आहे ? आंतरजातीय विवाहा-मुळे तर हे सहज शक्य होईल. कारण विवाह हे केवळ दोन मनांचे, दोन शरीरांचे मीलन नसते, तर ते दोन कुटुंबांतील संस्कारांचे, रूढींचेही मीलन असते. हाच विवाह जर आंतरजातीय पद्धतीने करण्यात आला आणि तोही अट्टाहासाने, तर त्यामुळे दोन जातींतील संस्कारांचीही देवाण-घेवाण होऊन हा वर्गकलह, जातिभेद, हुंडा हे नष्ट होणे सहज शक्य होईल. पण त्यासाठी खंबीर वृत्ती हवी. आजच्या जातिपद्धतीच्या उच्चाटनास असेच कडवे युवक पाहिजेत.

आता दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दारिद्र्य आणि बेकारीचा. आमच्या देशाची जर कीव करण्यासारखी परिस्थिती असेल, तर युवकांची भूमिका काय, प्रश्न-चिन्हात गुरफटून बसण्याची असणार आहे ? नाही, नाही. युवकांनो, स्वार्थाचे कंस बाजूला करून पुढे या. अन् त्यागाचा विचार करा. त्यागाचा विचार केला तर बेकारीचा पर्यायाने दारिद्र्याचा प्रश्नही सुटेल. लघु-उद्योगांची भरभराट, स्वनिर्मित उद्योगधंदे, एक ना दोन कितीतरी उपायांनी या प्रश्नावर प्रकाश पाडणे सहज शक्य होईल. आम्हांला फक्त अंग झटकायचीच सवय आहे. त्यामुळे प्रश्न सुटत नाहीत. तेव्हा या प्रश्नाबाबतीतही युवकांनीच भूमिका बनवायची आहे.

शेतीकडे जरा पाहिलं तर प्रत्येक शेतकरी हा कर्जातच आहे. तो कर्जातच जन्म घेतो, जीवन जगतो

**जयराम रायते**
एस्. वाय्. बी. ए.

# समाजपरिवर्तन व युवाशक्ती

आणि कर्जातच मरतो. त्याच्या शेतमालाला किंमत अल्पशी आणि त्याला लागणारे बी-बियाणे, खते, औषधे, अवजारे ही मात्र त्याला परवडणार नाहीत अशा किमतीची. तेव्हा त्याचे देखील प्रश्न अनेक आहेत व ते आंदोलनानेच सुटू शकतील.

आता थोडंसं राजकीय घटनांकडे वळू. कारण राजकीय घडामोडींचे दूरगामी परिणाम हे समाजरचनेवर निश्चितपणे होत असतात– नव्हे होत आहेत. देशासाठी प्राण द्या म्हणणारे घोषणाबाज 'कसे जगावे' या साध्यासुध्या प्रश्नाचे उत्तरही देऊ शकत नाहीत ते स्वराज्याचं सुराज्य काय करणार ? त्यांच्या घोषणेत जोर आहे; पण धक्का देण्याचं चैतन्य नाही. सत्तेसाठी वळवळणारे हे किडे समाजाच्या सर्व प्रश्नांचे मदांधतेने उकीरडे बनवत आहेत. या राजकारणी लोकांनी फेकलेल्या तुकड्यावर लाचारीचं जिणं न जगता त्यांचीच लक्तरे ओढून या विश्वासघातक्यांना धडा शिकविणे आणि अप्रत्यक्षपणे राजकीय परिवर्तनाद्वारे समाजपरिवर्तन घडविणे हेही या सळसळत्या रक्ताच्या पिढीचेच कार्य आहे.

आता थोडं शिक्षणाकडे वळू. शिक्षण हे जीवनाला आकार देण्याचं साधन. मनाचा सर्वांगीण विकास ज्यानं साधता येतो असं हे शिक्षण. पण आमच्या शिक्षण पद्धतीकडे पाहता मला अतिशय कीव येते. आज हे शिक्षण आमच्यावर लादलं जातंय. मनुष्याच्या हृदयाच्या, बुद्धीच्या, मनाच्या, देहाच्या गरजा-भुका कोण बघतो ? कारण आज अभ्यासाची परीक्षा नाही, तर केवळ परीक्षेचा अभ्यास करून घेतला जातोय, आणि म्हणूनच आजचे विद्यार्थी पदवीची धोंड गळयात बांधून नोकरी मागत लाचारीचं जिणं जगत हिंडताना दिसतात. सहानुभूतीने प्रश्न सुटत नसतात. आपल्या संघटनशक्तीला कुमार्गाला न लावता जीवनाभिमुख बनविले पाहिजे.

समाजपरिवर्तनाच्या या बाबींचा विचार करून तरुणांनीच आपल्या विधायक सामर्थ्याने नव्या समाजाची जडणघडण करावयाची आहे.

●●●

परीक्षा संपली. निकाल लागला. पस्तीस टक्के मार्क्स मिळाले. पास झालो. गंगेत घोडं न्हालं ! एखाद्यानं विचारलं कसा काय परीक्षाचा निकाल ? 'थर्टीफाइव्ह झिंदाबाद !' असे म्हणणारे अनेक कॉलेजकुमार किंवा विद्यालयांतील मुले आपण पाहत असतो. शिक्षणाबाबत कुमारांचे असे निराशपणाचे वागणे का ? असे खटचाळपणाचे वर्तन कुमार का करतात ? ते इतर प्रौढ व्यक्तीप्रमाणे सभ्य, सहनशील का दिसत नाहीत ? कुमारांना शिक्षणामध्ये अभिरुची नाही काय ? असे अनेक प्रश्न समाजासमोर निर्माण होतात.

कुमारांचे वर्तन असे का घडावे यासंबंधीचा विचार फक्त मानसशास्त्रच करू शकेल. मानसशास्त्रामध्ये व्यक्तिवर्तनाचा अभ्यास केला जातो. कोणत्या अवस्थेमध्ये व्यक्ती कशी वागेल हे मानसशास्त्राशिवाय इतर शास्त्राला सांगणे कठीण आहे. समाजातील मोठी माणसे फक्त म्हणत असतात कुमारांचे वागणे बेडौल आहे, समाजाला धरून नाही. पण कुमारांचे वर्तन असे का असावे याचा या लोकांना नीट विचार करता येत नाही. कुमारावस्था हा वादळाचा काळ आहे. इतर लोक कुमारांचे बाह्य वर्तन पाहू शकतील, जखम झाली तरी ती बरी करू शकतील, समुद्राच्या तळाशी जाऊ शकतील, चंद्रावर जाऊ शकतील पण यांना कुमाराच्या मनाच्या महासागरात प्रवेश करता येणार नाही.त्यामुळे कुमाराच्या मनाला नेमकं काय हवं आहे हेच त्यांना कळत नाही. याची जाण फक्त मानसशास्त्रज्ञांनाच असू शकेल.

लोक नेहमी म्हणत असतात की कुमारावस्थेमध्ये मुले-मुली बिघडतात. वास्तविकरीत्या समाजच या मुला-मुलींना बिघडावयास कारणीभूत असतो. ही अवस्था साधारणतः वयाच्या तेराव्या वर्षापासून सुरू होऊन विसाव्या वर्षी तिचा अस्त होतो. समाज या वयाकडे पाहून चेष्टा करतो. कुमाराकडे तुच्छतेने पाहतो. आज तर शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षण घेत असणाऱ्या कुमारांना समाजाकडून मार्गदर्शन मिळण्याऐवजी त्यांच्या शिक्षणाची टिंगल, हेटाळणी केली जाते. लोक म्हणत असतात, शिक्षणाला महत्त्वच नाही. विद्यार्थ्याने पुस्तकी किडा होऊ नये. समाजातील लोकांच्या मताचा प्रभाव कुमार-कुमारिकांवर पडतो. त्यामुळे त्यांना वाटत असते खरोखरच शिक्षणाचा फायदा नाही; व ते देखील शिक्षणाची थट्टा करू लागतात. त्यामुळेच त्यांचे वर्तन बेढब होते, आणि त्यांची शिक्षणाची अभिरुची कमी होऊ लागते.

कुमार-कुमारिकांमध्ये असे उद्धटपणाचे वर्तन घडविण्यासाठी फक्त समाजच कारणीभूत आहे असे मात्र म्हणता येणार नाही. कुमारांचे वर्तन असे सैरावैरा हुंदडणाऱ्या जनावराप्रमाणे का असावे ? या प्रश्नाला कारणीभूत असे अनेक घटक आहेत. कुमारावस्थेचा कल हा व्यक्तिजीवनातील आणीबाणीचा कालखंड मानला जातो. या वयात व्यक्तीची शारीरिक व मानसिक वाढ झपाट्याने होत असते. या बदलत्या परिस्थितीत अनेक समस्या निर्माण होत असतात.

कुमारावस्था ही दोलायमान अवस्था असते. या वयात व्यक्तीचे बालपण संपूर्ण संपलेले नसते, आणि प्रौढावस्थेचे संपूर्ण ज्ञान झालेले नसते. त्यामुळे कुमाराची ही अवस्था म्हणजे दोरी तुटलेल्या पतंगासारखी असते. या वयात स्वप्नाळू आशा-निराशेचे खेळ सतत चालत असतात. प्रौढावस्थेत प्रवेश करेपर्यंत या वयातील व्यक्ती सतत अंधारात चाचपडत असतात. आपण कसे वागावे म्हणजे समाजाला रुचेल हे कुमारांना कळत नाही. कुमाराने लहान मुलाप्रमाणे वर्तणूक केली तर 'तू लहान राहिला नाहीस आता ! तुला हे कळायला पाहिजे' असे वडीलमंडळी म्हणत असतात. जर कुमाराने प्रौढ व्यक्तीप्रमाणे वर्तन करण्याचा प्रयत्न केला तर तुला यातले काही कळत नाही, मोठ्यांमध्ये असे बोलू नये' या शब्दांत त्याची नेहमीच खरडपट्टी केली जाते. त्यामुळे कुमाराची ही अवस्था म्हणजे 'इकडे आड आणि तिकडे विहीर' याप्रमाणे होते.

कुमारावस्था म्हणजे परिपक्वनाचा कालखंड मानला जातो. या अवस्थेतील सर्वांत महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे लैंगिक विकास होय. शरीरातील विविध स्राव स्रवू लागल्याने कुमार-कुमारिकांच्या शरीराला बेडौलपणा येऊ लागतो. विचारप्रक्रियेचा विकास झाल्यामुळे मनात क्षणाक्षणाला वेगवेगळे विचार येतजात असतात. कुमारावस्थेत मनात विचारांचे वादळ थैमान घालू लागते. याचवेळी भिन्नलिंगी व्यक्तीविषयी आकर्षण निर्माण होऊ लागते. मात्र या काळात समाज कुमार-कुमारिकांवर अनेक बंधने लादत असतो. कुमारांच्या तुलनेने कुमारिकांवर फारच बंधने असतात. ही बंधने मुला-मुलींना नकोशी वाटतात. त्यांना मोकळीक हवीशी वाटते. पण समाज त्यांना स्वातंत्र्य द्यायला तयार नसतो. त्यामुळे कुमार-कुमारिकांच्या मनात वैफल्य निर्माण होते. भिन्नलिंगी व्यक्तीच्या सहवासासाठी कुमार कुमारिका आसुसलेले असतात. पण त्यांना आपल्या इच्छा पूर्ण करता येत नाहीत केवळ सामाजिक बंधनामुळे. त्यावेळी त्यांच्यात अतिशय ताण निर्माण होतो. तापलेली जमीन पावसाची वाट पाहत असते, आकाशातही ढग आलेले असतात पण पाऊसच पडत नाही. फक्त झाकाळलेलं वातावरण निर्माण होतं. अशी स्थिती कुमार-कुमारिकांची होते. कुमार-कुमारींना नेहमी वाटत असते की आपल्यावर कोणीतरी प्रेमाचा वर्षाव करावा. म्हणूनच अनोळखी कुमार-कुमारिकांमध्ये नुसते सामान्य बोलणे झाले तरी पुन्हा एकमेकांची गाठ पडावी अशी भावना निर्माण होते. कुमारवयातील सुखद भावना म्हणजे 'रखरखीत वाळवंटातील हिरवळ असते.'

आपल्या इच्छांची, अपेक्षांची पूर्ती न झाल्याने आलेली निराशा जगाला दिसू नये, यासाठी ते समाजमान्य अशा यंत्रणेचा वापर करतात. त्यासाठी महत्त्वाची संरक्षण यंत्रणा म्हणजे 'दिवास्वप्न' होय. समाजाने कुमारांवर निर्बंध लादल्याने त्यांचा अपेक्षाभंग होतो. ते आपल्या दिवास्वप्नाद्वारे अपेक्षा पूर्ण करतात. मानसशास्त्रीय संशोधनात जेव्हा कुमार-कुमारिकांच्या मुलाखती घेतल्या जातात, तेव्हा त्यांच्या स्वप्नात भिन्नलिंगी आकर्षणाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते. कुमार-कुमारिका दिवसादेखील जागृत अवस्थेत स्वप्ने पाहतात, त्यांना दिवास्वप्न म्हणतात. ते आपल्या जीवनाचा विचार कल्पनांच्या मनोराज्यात रमत

अडसूळ आर. के.
एस्. वाय्. बी. ए.

## कुमारावस्था : मनोचिकित्सा

असताना करतात. त्यांची ही दिवास्वप्ने चित्रविचित्र असतात. दिवास्वप्नातदेखील भिन्नलिंगीच्या प्रेमाचे जास्त प्रमाण आढळते. या दिवास्वप्नाचा उपयोग मानसिक ताण कमी करण्यासाठी काही प्रमाणात विधायक असतो. पण अतिरिक्त दिवास्वप्ने पाहिली व त्यांचाच नेहमी विचार केला तर त्याचा परिणाम विघातक होतो. असे कुमार विकृत बनतात व ते अधिकच असामान्यपणाचे वर्तन करू लागतात.

विद्यालयातील किंवा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्यावरून असे दिसून येते की बालपणी त्यांचा जो देवावरचा विश्वास होता तो आता काही प्रमाणात कमी झाला आहे. ते देवाकडे तुच्छतेने पाहत नसले तरी अप्रत्यक्षरीत्या हेटाळणी करीत असतात. म्हणजे कुमारावस्था धर्माला जवळ जवळ स्थान देत नाही.

कुमारावस्था काही प्रमाणात युद्धाचा कालखंड मानला जातो. परंतु ही युद्धे कुटुंबांतर्गत असतात. याचे तात्कालिक कारण म्हणजे पिढीतील अंतर. पालकांना नवीन गोष्टीं-पेक्षा जुन्या गोष्टी जास्त आवडतात. कारण ते जुन्याला विसरायला तयार नसतात. पण कुमार-कुमारिका हे बाह्य नवीन पिढीत वावरत असल्याने त्यांचा अहम्, त्यांची विचारसरणी व दृष्टिकोन बदललेला असतो. त्यांना जुनं हे नकोसं वाटतं व नव्याचा स्वीकार करावासा वाटतो. पालकांचा जुन्यावरील विश्वास व कुमारांचे आकर्षण यामुळे पालक व कुमार यांच्यातील संबंध बिघडतात. हे संबंध बिघडवण्यासाठी फॅशन्स-देखील कारणीभूत होतात. कारण कुमारावस्थेतील मुला-मुलींना फॅशन्सचे विशेष आकर्षण असते. काही कुमारिका इतक्या भडक (विचित्र) फॅशन्स करतात की कदाचित त्यांनीच स्वतःच्या फॅशनबद्दल विचार केला तर त्यांनादेखील त्या आवडणार नाहीत.

या वयात भावनांचा विकास झालेला असला तरी भावनिक प्रक्रियांवर नियंत्रण नसते. मुली केव्हा रडा-वयास लागतील सांगता येत नाही. कुमार-कुमारिकांचा प्रेमभंग झाला, काही दुःखद घटना घडली तर कुमार वयातील मुला-मुलींना ते सहन करणं अशक्य वाटतं. अपमान होणे ही गोष्ट त्यांच्या मनाला फार खटकते. कुमारिकांचा राग तर नाकाच्या शेंड्यावर असतो. त्यामुळे आपणाला नेहमी ऐकावयास मिळते की अमक्याने प्रेमभंगामुळे रेल्वेखाली जीव दिला! अमकीने स्वतःला पेटवून घेतले ! त्यांच्या भावना या काळात वादळासारख्या असतात. त्यामुळे कुमारांचे जीवन हे जहाजात होकायंत्र नसावे त्याप्रमाणे होते.

कुमारावस्थेच्या शेवटच्या कालखंडात पूर्वी पाहिलेली स्वप्ने पूर्ण करण्याचा कुमार प्रयत्न करतात. काही यशस्वी काही अयशस्वी असे अनेक प्रकारचे अनुभव कुमारांना येत असतात. कुमारावस्थेमध्ये तो प्रौढांच्या-कडे चांगल्या दृष्टीने पाहतो, त्याला प्रौढ जीवन हवंसं वाटतं, कारण कुमाराला त्यातील फक्त सुखेच दिसत असतात. जबाबदाऱ्या, कुटुंबाचा बोजा याची त्याला जाणीव नसते. आपल्या जीवनाची नौका आपल्या एकट्यालाच हाकावयाची आहे अशी जाणीव कुमारा-वस्थेच्या शेवटी शेवटी होते.

कुमारावस्थेच्या या कालखंडात विचारांचे, कल्पनांचे, भावनांचे वादळ व्यक्तिजीवनात सहन करावे लागते. आशा-निराशेच्या खेळाला साथ द्यावी लागते. यादृष्टीने कुमारावस्था हा जीवनातील महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल.

जीवनातील नंतरच्या कालखंडामध्ये हळूहळू ही वादळे आणि तणाव विरून जातात व एकप्रकारचे मानसिक स्थिरत्व लाभते.

•••



इराक-इराण युद्धाला सप्टेंबर १९८० मध्ये प्रारंभ झाला. या युद्धामुळे आशिया खंडातील परिस्थिती अत्यंत स्फोटक झाली आहे. पश्चिम आशियातील अरब विरुद्ध इस्रायल यांच्यामधील लढा, इराणने अमेरिकन वकिलातीतील ओलीस ठेवलेले ५२ कर्मचाऱ्यांचे प्रकरण, रशियाची अफगाणिस्तान मधील लष्करी कारवाई इत्यादी घटनांमुळे आशिया खंडातील परिस्थिती चिंताजनक बनली आहे.

इराक-इराण युद्ध होण्याची महत्त्वाची कारणे म्हणजे सीमा संघर्ष व पंथभेद ही होत. पर्शियन सम्राटांच्या व अरब खलीफांच्या कालापासून या दोन राष्ट्रांत सीमा-प्रश्नावरून युद्धे होत. शत-अल-अरब हा इराकचा सागरी हद्दीत प्रवेश करण्याचा एकमेव मार्ग इराणने लष्करी बळावर बंद केल्यामुळे या संघर्षात भर पडली. तसेच शत–अल–अरब या जलप्रवाहाच्या दोन्ही बाजूस तेलसाठे सापडल्यामुळे हा संघर्ष वाढला आहे. २०० कि. मी. लांबीच्या नदीवरील प्रभुत्वासाठी या दोन देशांत युद्ध सुरू झाले आहे.

इराक-इराण युद्धाचे दुसरे कारण म्हणजे पंथभेद हे होय. इराणमध्ये शियापंथीय बहुसंख्यांक आहेत, तर इराकमध्ये सुन्नीपंथीय बहुसंख्यांक आहेत. आखाती प्रदेशातील निःशुल्क नौकानयन, इराकला या भागात प्रवेश करण्याचा कायदेशीर हक्क इराणने मान्य केला पाहिजे असे इराकला वाटते. इराकचे परराष्ट्रमंत्री सादून हम्मादी यांनी इराकची ही भूमिका स्पष्टपणे संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस डॉ. कुर्त वाल्डहाइम यांना पत्राद्वारे कळविली आहे. जोपर्यंत शत–अल–अरब वरील इराकचे वर्चस्व इराण मान्य करत नाही, तोपर्यंत इराक इराण युद्ध चालूच राहील असे इराकचे अध्यक्ष सद्दाम हुसेन यांनी सांगितले आहे.

इराक-इराण ही दोन्ही राष्ट्रे तेलसंपन्न असल्यामुळे फारच श्रीमंत बनली आहेत व त्यांनी फार मोठ्या प्रमाणावर शस्त्रांचा साठा केला आहे त्यामुळे हा संघर्ष अधिकच तीव्र बनलेला आहे. युद्धबंदी होण्यासाठी अद्यापपर्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली नाही. भूदल, नौदल, वायुदल यांच्यामध्ये तुंबळ युद्ध चालू आहे. इराक-इराण यांच्यामध्ये मुख्यतः भूमीवर युद्ध चालू आहे. या युद्धात उभय पक्षांचे फार मोठे तेल साठे उध्वस्त झाले आहेत. इराणला अनुकूल परिस्थिती नसतानासुद्धा धार्मिक नेते आयातुल्ला खोमेनी यांच्या नेतृत्वाखाली इराण चिवट झुंज देत आहे. इराकने या युद्धात मध्यम प्रतीच्या क्षेपणास्त्रांचा वापर केला आहे. विशेष म्हणजे लीबिया या अरब राष्ट्राने इराणला पाठिंबा देऊन इराकला धक्काच दिला आहे. सीरिया व उत्तर कोरिया यांनी इराणला पाठिंबा दिल्यामुळे १०–११–८० रोजी इराकने सीरिया, उत्तर कोरिया, लीबिया या देशांशी असलेले राजनैतिक संबंध तोडले आहेत. जॉर्डनचे राजे हुसेन यांनी इराकला पाठिंबा देऊन सर्व लष्करी मदत देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे या युद्धाची व्याप्ती वाढलेली आहे. इराणच्या

सुनील जगताप
टी. वाय्. बी. ए., नियतकालिक प्रतिनिधी

# इराक-इराण युद्ध

खुर्रम व आबादान या शहरांवर ताबा मिळविण्यासाठी इराकने फार मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. अखेर इराकने बाजी मारली व २५–१०–८० रोजी इराणच्या खुर्रम शहरावर इराकी सैन्याने कब्जा मिळविला. हा इराकचा महान विजय आहे, असे इराकच्या अध्यक्षांचे मत आहे. इराकने आक्रमक कार्यवाही करून डेझफूल, इस्फाहान या औद्योगिक शहरांवर जोरदार बाँबवर्षाव केला. जगातील सर्वांत मोठ्या म्हणून गणल्या गेलेल्या आबादान या तेलाच्या साठ्याचावरच्या शहरावर जोरदार बाँबवर्षाव करून इराकने हे शहर काबीज केले. इराणने आखात व होर्मुझची सामुद्रधुनी या जलविस्तारात पाणसुरुंग पेरण्याची धमकी दिली आहे.

इराक-इराण युद्ध संपुष्टात आणण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस डॉ. कुर्त वाल्डहाइम, पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल झिया-उल्-हक्, पॅलेस्टाईन मुक्ति संघटनेचे अध्यक्ष यासर अराफत इत्यादी नेते व संयुक्त राष्ट्रसंघाची सुरक्षा समिती प्रयत्न करीत आहेत. पण अद्यापपर्यंत या प्रयत्नांना यश आलेले नाही. २८–१–८१ रोजी भरलेल्या इस्लामी शिखर परिषदेत इराकने सशर्त तयारी दर्शविली आहे. पण इराणचे धार्मिक नेते आयातुल्ला खोमेनी म्हणतात, की इराणची इंच न् इंच भूमी जोपर्यंत परत मिळत नाही तोपर्यंत हे युद्ध चालूच राहील. तसेच शत-अल-अरब वरील आपली सत्ता इराण मान्य करत नाही, तोपर्यंत हे युद्ध इराक चालूच ठेवणार आहे.

जागतिक राजकारण व अर्थकारण यावर इराक-इराण युद्धाचे फार मोठे दूरगामी परिणाम होणार आहेत. जागतिक तेलपुरवठ्यावर याचा फार मोठा परिणाम होणार आहे. या युद्धामुळे या दोन्ही देशांची तेल निर्यात खुंटली आहे. या युद्धामुळे भारतीय आर्थिक परिस्थितीवरही ताण पडला आहे. कारण या युद्धामुळे तेलाचा मर्यादित प्रमाणावर पुरवठा भारताला होत आहे व तेलाच्या किमती वाढल्यामुळे परकीय चलनाचा साठा तेल आयात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे.

या युद्धामुळे आणखी एक दूरगामी परिणाम म्हणजे इराकचे महत्त्व पश्चिम आशियाच्या व जगाच्या राजकारणात वाढत आहे. इराकची प्रतिष्ठा या विजयामुळे फार मोठी वाढली आहे. तसेच जगातील दुर्मिळ असा पेट्रोलचा साठा संपत आहे, ही फार मोठी धोकादायक परिस्थिति या युद्धामुळे निर्माण झाली आहे. अरब जगाचे नेतृत्व कोणाकडे जाणार याविषयीच्या तर्कवितर्कालाही सुरुवात झाली आहे. काळच याचे उत्तर देईल.

●●●



# 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाचे परीक्षण

सदाशिव कृष्णाजी गाठे
एम्. ए. (मराठी)

महात्मा जोतिराव फुले यांनी केलेले कार्य महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. अव्वल इंग्रजी अमदानीमधील समाजाची एकूण परिस्थिती विचारात घेऊन त्यांच्या सुखदुःखांचे चित्रण जोतिरावांनी आपल्या साहित्यात केले. त्या काळात बहुजनसमाज शिक्षणापासून वंचित राहिलेला होता. शिक्षणाचे महत्त्व त्यांना समजत नव्हते. ते समजावून देणारा कोणीही त्याकाळात नव्हता. अशा परिस्थितीत इंग्रजांच्या राजवटीत जे मूठभर लोक सत्तेवर होते, त्यांच्याकडून बहुजनसमाज नाडला जात होता. त्यांची गळचेपी केली जात होती. त्यावेळचा बहुजनसमाज हा शेतकरी आणि मजूर अशा स्वरूपाचा होता. या शेतकऱ्यांचे आणि मजुरांचे जीवन अतिशय उपेक्षेचे होते. त्यांना कोणीही वाली नव्हता. अशा या अज्ञानी समाजाला कोणत्याही तऱ्हेचे मार्गदर्शन न करता त्याला अज्ञानाच्या अंधारात ठेवून पापपुण्याच्या धार्मिक भावना त्याच्या मनावर बिंबवून त्याला त्यावेळचे भटभिक्षुक अक्षरशः नाडत असत.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जोतिरावांनी महाराष्ट्रातील बहुजनसमाजात जागृतीचा गजर करून समाजक्रांतीचा झेंडा रोवला. आणि समाज जागृत करण्याच्या निमित्ताने त्यांनी वाङ्मयाची निर्मिती केली. त्यांनी 'गुलामगिरी' (इ. स. १८७३), 'शेतकऱ्याचा आसूड' (इ. स. १८८२), 'इशारा' (इ. स. १८८५), 'सत्सार अंक १ व २', 'सार्वजनिक सत्यधर्म' (इ. स. १८८९) आणि 'अखंडादी काव्यरचना' इत्यादी ग्रंथरचना केली. जोतिरावांनी या लेखनात त्यावेळच्या बहुजनसमाजाच्या परिस्थितीचे अत्यंत पोटतिडकीने वर्णन केलेले आहे. आणि त्याद्वारा त्यांनी आपली मते अत्यंत परखडपणे मांडली.

'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकाची सुरुवातच त्यांनी पुढीलप्रमाणे केली आहे :

विद्येविना मती गेली । मतिविना नीति गेली ।
नीतिविना गति गेली । गतिविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

त्यावेळचा शेतकरी इतके उपेक्षित जीवन जगत होता की, त्याचा कोणी वाली नव्हता. आणि अशा त्या शेतकऱ्याला त्याच्या परिस्थितीची जाणीव करून द्यावी या हेतूने हा ग्रंथ लिहिला असून त्याला 'शेतकऱ्याचा आसूड' असे अन्वर्थक नाव दिलेले आहे. त्या काळातील शेतकरी जीवनाचे प्रत्ययकारी चित्र, त्याच्या अवनत स्थितीची केलेली मूलगामी मीमांसा आणि त्याची स्थिती सुधारण्यासाठी सुचविलेली उपाय-

योजना हा या ग्रंथाचा नावीन्यपूर्ण भाग मानावा लागेल. शेतकरी हा अज्ञानी आहे, अंधश्रद्ध आहे, या गोष्टींचा फायदा घेऊन पुरोहितवर्ग त्याच्या षष्ठीपासून अंतेष्टीपर्यंत त्याला पुरता नागवीत असतो. त्यातच शेतकरी वर्गावर सरकारने करांची ओझी लादलेली आहेत. त्यामुळे तो कर्जबाजारी होऊन व्याजबट्टा करणाऱ्या सावकारांचे फावले आहे. सर्वप्रकारची गांजवणूक होत असलेल्या या शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणावी म्हणून जोतिरावांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या त्यांच्या द्रष्टेपणाच्या द्योतक आहेत.

त्यावेळच्या भटभिक्षुकांच्या आणि जुलमी नोकरशाहीच्या विरुद्ध आपली कैफियत मांडताना फुले अतिशय संतापतात. या जुलमी सत्तेच्या सोंगा-ढोंगाचा खरपूस समाचार घेताना फुल्यांच्या अंगात मूर्तिभंजकाचा संचार होतो. अनीतीविरुद्ध ते कठोर प्रहार करतात. त्या काळात धर्माच्या नावावर अनैतिक गोष्टी खपवून घेतल्या जात होत्या. त्यांची त्यांना मनस्वी चीड होती. कथा-पुराणे, अंधश्रद्धा वाढवितात; आणि नाटक-तमाशे, अनैतिकता पसरवितात. म्हणून या दोन्ही गोष्टींना त्यांचा कडवा विरोध आहे. ब्राह्मणांच्या ढोंगी अनैतिकतेचे आणि शूद्रांच्या अडाणी अनैतिकतेचे त्यांनी सारख्याच आवेशाने वाभाडे काढलेले आहेत. फुले भटभिक्षुकांचा कसा उपहास करतात याची पुढील दोन उदाहरणे लक्षात ठेवण्याजोगी आहेत : 'रुईच्या पानांच्या माळा मारुतीच्या गळ्यात घालून गवताच्या जुड्या गणपतीच्या माथ्यावर रचून सीधे दक्षिणा आपण घेतात. तांदूळ पदरी आवळून गणपतीसही (सुपारी-सह) घरी फोडून खाण्याकरिता कडोसरीस लावतात.' हे भटभिक्षुक ज्या पद्धतीने सर्वसामान्य शेतकरी कामगार यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडतात, त्यासंबंधी फुले म्हणतात, 'असले नि:संग दांडगे भिकारी दुसऱ्या देशात अथवा जातीत सापडतील काय ?'

शेतकऱ्याची स्थिती कशी दयनीय आहे याचे वर्णन करताना त्यांची भाषा जिव्हाळ्याने बोलू लागते. आणि शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे प्रत्ययकारी चित्र आपल्या समोर उभे राहते. ते म्हणतात, 'ज्यांच्या श्रमांवर सरकारी फौजफाटा, दारुगोळा, गोऱ्या कामगारांचा वाजवीपेक्षा जास्त ऐषाराम व काळ्या कामगारांचे वाजवीपेक्षा जास्त पगार, पेन्शनी आणि सोवळे-ओवळे यांचा बडेजाव आहे, त्याला चारचौघांत पानविड्यापुरता मान मिळू नये काय ? अहो जो सर्व देशांतील लोकांचे सुखांचा पाया त्याचे असे बुरे हाल त्याला वेळचेवेळी पोटभर भाकर आणि अंगभर वस्त्र मिळत नसून त्याच्या उरावर सरकारी पट्टी देण्याची कट्यार लोंबत आहे. त्याच्या हालाला साहेब लोकांचा सरकारी कुत्रासुद्धा ढुंकून पाहिना. याला म्हणावे तरी काय ?'

शूद्रातिशूद्रांच्या, शतकानुशतकांच्या अज्ञानाबद्दल ते अत्यंत कळवळून लिहितात. या भट-ब्राह्मणांनीच त्याला विद्येपासून दूर ठेवले असा उघड आरोप करतात. 'बुडती हे जन न देखवे डोळा' अशाप्रकारचा हा अस्सल कळवळा आहे. शेतकरी लग्नकार्यात व्यर्थ खर्च करतात आणि कर्जबाजारी होतात. यालाही कारण भटभिक्षुकांनी दाखविलेला मार्ग होय, असे ते म्हणतात.

त्यावेळचे इंग्रज सरकार शेतकऱ्याला संरक्षण देण्याच्या दृष्टीने कायदे करू लागलेले होते. पण त्याचे फायदे प्रत्यक्ष शेतकरी कामगार यांना मिळत नव्हते. अशा या कायद्यांचे क्रांतिकारकत्व अचूकपणे ओळखण्यात महात्मा फुले अग्रेसर होते. या कायद्याचा पुरेपूर फायदा दरिद्री शेतकऱ्यांच्या पदरात पडावा याविषयी ते जागरुक असत. इ. स. १८८४ साली सरकारला सादर केलेल्या या आसूडाचा जन्महेतूसुद्धा शेतकऱ्यांच्या प्रश्नांची टोचणी सरकारला लागावी हाच होता. अशारीतीने भारतीय शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे सर्वप्रथम सरकारी वेशीवर टांगणाऱ्या महात्मा फुले यांना कृषि-क्रांतीचे अग्रदूत ही बिरुदावली खचितच शोभून दिसेल.

'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ एकूण पाच प्रकरणांत विभागलेला आहे. आणि त्यात त्यांनी प्रारंभी विद्येविना शूद्र कसे खचले यासंबंधीची आपली भूमिका मांडली आहे. नंतर पहिल्या प्रकरणात त्यांनी भट-ब्राह्मण धर्माच्या मिषाने अज्ञानी शेतकऱ्यांना व्रतवैकल्य, रूढी, परंपरा यांच्याद्वारे कसे नाडतात याचे वर्णन केलेले असून शिक्षणाचे महत्त्व शूद्रांना उमगत नाही; आणि आपल्या मुलाबाळांना शिक्षण द्यावे याची जाणीवही त्यांना राहत नाही याचे तपशीलवार वर्णन केलेले आहे.

दुसऱ्या प्रकरणात इंग्रज सरकारने शेतकऱ्यांच्याबद्दल अनेक कायदे केले, परंतु त्याचे फायदे प्रत्यक्ष त्यांना मिळत नाहीत; कारण सरकारी गोरे अधिकारी हे ऐषारामात गुंग असतात, ते शेतकऱ्यांची वास्तविक स्थिती जाणून घेत नाहीत, आणि त्यांच्या गाफिलपणाने परिणाम असा होतो की, ब्राह्मण कामगार त्याचा फायदा उठवितात. आणि शेतकरी लुटले जातात. त्यांना पोटभर भाकर आणि अंगभर वस्त्रही मिळत नाही असे विचार मांडले आहेत.

तिसऱ्या प्रकरणात आर्यब्राह्मण इराणातून भारतास कसे आले आणि शूद्रांची मूळची अवस्था यांचे वर्णन केलेले आहे.

त्यावेळच्या सरकारने त्यांच्या कामगारांना मनमानेल तसे पगार आणि पेन्शने देण्याच्या इराद्याने नित्य नवे कर शेतकऱ्यांचे बोडक्यावर बसवून त्यांचे द्रव्य मोठ्या हिकमतीने गोळा करू लागल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झालेले आहेत. मूळच्याच अज्ञान अंधकारात बुडालेल्या शेतकऱ्याला आणि त्याच्या मुलाबाळांना विद्येच्या शक्तीपासून मतलबी ब्राह्मण कामगारांनी युक्तीने बाजूला ठेवले आहे. आणि याचा परिणाम म्हणून झालेल्या शेतकऱ्यांच्या हीनदीन अवस्थेचे वर्णन चौथ्या प्रकरणात त्यांनी केलेले आहे. हे वर्णन अतिशय करुणाजनक आहे. मोठ्या तळमळीने त्यांनी शेतकरी कामगारांची कैफियत मांडलेली आहे. या वर्णनावरून त्यांची शेतकऱ्याविषयीची आस्था आणि त्यांचा मानवताविषयक दृष्टिकोन आपल्या प्रत्ययाला येतो. त्यांच्या सूक्ष्म वर्णनशैलीची ताकदही आपल्या लक्षात येते. भाषा ओबडधोबड असली तरी तिचे वैचारिक सामर्थ्य आपल्याला नजरेआड करता येणार नाही.

शेवटच्या पाचव्या प्रकरणात या शेतकऱ्याच्या एकूण अवस्थेत सुधारणा करण्यासाठी काय केले पाहिजे, सरकारने कोणकोणते उपाय योजावेत याचेही निवेदन केले आहे आणि ते एक साहित्य म्हणून पडून राहिलेले नाही, तर ते त्यांनी इंग्रज सरकारला सादर केलेले आहे.

म. फुल्यांनी हे सर्व आपल्या खास शैलीने व प्रभावीपणे सांगितले आहे. कारण त्यांचे व्यक्तित्व जसे प्रभावी आहे तशीच त्यांची शैलीसुद्धा अत्यंत ओजस्वी आहे. ती अत्यंत रांगडी, चढाईखोर आणि विलक्षण बोलघेवडी आहे. शूद्रातिशूद्रांच्या हीनदीन स्थितीकडे पाहून ती कळवळते आणि ब्राह्मणी दुटप्पीपणाला कठोरपणे शिव्याशाप देते. ब्राह्मणांच्या व्रतवैकल्यांची टर उडवते तर शूद्र लोकांच्या व्यसनीपणावर आग पाखडते. जोतिरावांचे हे सारे विवेचन हे त्यांच्या अनुभवाचे विवेचन आहे.

म्हणजे त्यावेळच्या रूढ अशा निबंधापेक्षा 'शेतकऱ्याचा आसूड' ची प्रकृती, विषय, आशय, मांडणी, प्रेरणा आणि प्रवृत्ती या सर्वच दृष्टीने आपल्याला वेगळी वाटते. अत्यंत तळमळीने त्यांनी उपेक्षित अशा शूद्र गरीब शेतकऱ्याचा कैवार घेतलेला असून शूद्र लोकांमधीलच खुशालचेंडू लोकांवरही त्यांनी कठोर टीका केलेली आहे. आणि शासनाला त्यांची स्थिती सुधारावी म्हणून उपाय सुचविले आहेत. म्हणजे या ग्रंथाला एक वैचारिक मूल्य प्राप्त झालेले आहे. आणि हेच या ग्रंथाचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

संदर्भ ग्रंथ– 'शेतकऱ्याचा आसूड'
लेखक– जोतिराव फुले

●●●

## सोनगाव

बारामतीजवळ कऱ्हा-नीरा संगमावर सोनगाव नावाचे एक छोटेसे गाव आहे. तेथे १९६५ साली उत्खनन करण्यात आले. त्यावेळी ताम्रपाषाणयुगीन वस्तीचे अनेक अवशेष तेथे मिळाले.

राखी व जाडच्या-भरडच्या पोताची तांबडी खापरे, राखी भांड्यातील दफनकुंभ, सगंड झाकण्या, कुंडे, वाडगे, रांजण इत्यादी तत्कालीन राहणीची कल्पना देणाऱ्या अनेक वस्तू सापडल्या.

पण विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे एका थरात जळालेला गहू फार मोठ्या प्रमाणावर सापडला. आणि महाराष्ट्रात सापडलेल्या ताम्रपाषाणयुगातील गव्हाच्या अस्तित्वाचा हा अत्यंत प्राचीन पुरावा मानला जातो. कार्बन १४ च्या गणनेनुसार या गव्हाचा काल इ. स. पूर्व १३७५-११० व १२९०-९५ असा ठरतो.

सोनगाव हे या दृष्टीने बारामती परिसरातील एक 'तीर्थस्थान' ठरावे.

आधार : महाराष्ट्र– एक पुरातत्त्वीय समालोचन
शां. भा. देव

बारामती हे ऐतिहासिक शहर आहे. ज्या कुलात आपण जन्मतो त्याचा पूर्वेतिहास आपण तळमळीने अभ्यासतो. ज्या नगरीत आपण राहतो तिचा इतिहास, तिचे प्राचीन महत्त्व, उज्ज्वल भूतकाळ आपणास माहीत असणे आवश्यक आहे.

बारामती तालुक्याला पूर्वी भीमथडी असे सरकार दप्तरी नाव होते. हे नाव २३-१-१८६७ च्या सरकारी ठरावाने दिले गेले असा उल्लेख आढळतो. प्रथम बारामतीचा समावेश इंदापूर विभागात केला होता. भीमा व नीरा या नद्यांमधील प्रदेश या अर्थाने भीमथडी हे नाव पडले असावे. गंगथडी, भीमथडी असे म्हणण्याचा पूर्वीपासून प्रघात आहे.

कऱ्हा नदीमुळे बारामती शहराचे स्वाभाविक असे दोन भाग पडले आहेत. ही नदी येथे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते. पुण्याहून सरळ आग्नेय दिशेस पन्नास मैलांवर बारामती आहे. येथे कऱ्हेच्या पश्चिम तीरावर काशी विश्वेश्वराचे देवालय आहे. त्याच्या रचनेवरून हे मंदिर इ. स. ७०० ते ९०० पर्यंतच्या काळात बांधले असावे असा अंदाज आहे. या देवालयासमोर एका शिलेवर राशिचक्र कोरलेले आहे. त्यावरून या देवालयाचा काल ठरविता येतो. याच देवालयात सुमारे तीनशे वर्षांपूर्वी श्रीधर स्वामींनी 'शिवलीलामृत' हा ग्रंथ लिहिला आहे.

कऱ्हा नदीच्या पूर्व किनाऱ्यावर बाबूजी नाईक यांनी शनिवारवाड्याच्या धर्तीवर आपला वाडा बांधलेला आहे. श्री छत्रपती शाहू महाराजांनी इ. स. १७४३ मध्ये बारामती महालाची जहागिरी बाबूजी सदाशिव नाईक यांना दिली. अठराव्या शतकात महाराष्ट्रात गाजलेल्या कर्त्या पुरुषांपैकी बाबूजी हे एक होते. परंतु त्यांची कीर्ती कविवर्य मोरोपंतांचे आश्रयदाते म्हणून चिरकाल टिकणारी आहे. बाबूजींनी आपल्या वाड्याच्या दक्षिणेस श्री सिद्धेश्वराचे देवालय बांधले आहे. या मंदिरातील नंदीची मूर्ती बैठी व भव्य आहे. या देवालयामागे गणपतीचे मंदिर आहे. हेच मोरोपंतांचे स्फूर्तिस्थान होते. याच देवालयात पंत नियमित जात व तेथे आर्या रचीत अशी आख्यायिका आहे.

गणपती मंदिराजवळचा वाडा बाबूजी नाईक यांनी मोरोपंतांना दान दिला होता. बाबूजी नाईक यांच्याकडे पुराणिक म्हणून मोरोपंत बारामतीस स्थायिक झाले. ते विशाल बुद्धीचे, सकलशास्त्र-पारंगत असे पुराणिक होते. त्यांच्या काव्यसंपदेमुळेच बारामतीचे नाव इतिहासात अजरामर झाले आहे.

पेशवे राघोबादादा यांची मुलगी, बाबूजी नाईक यांचा मुलगा पांडुरंग यास दिली होती. तोतया प्रकरणी एकवीस पंचांपैकी बाबूजी नाईक एक होते. सन १८०२ मध्ये दुसरे बाजीराव यांचा तळ बारामतीत पडलेला होता. त्यावर यशवंतराव होळकर यांचा सरदार फत्तेसिंग माने याने हल्ला करून पेशव्यांच्या सैन्याचा धुव्वा उडविला. सन १८०३ मध्ये जनरल वेलस्ली श्रीरंगपट्टणहून परतताना बारामतीला आला होता.

निजामांच्या दरबारी पेशव्यांचे वकील म्हणून बारामतीचे कृष्णराव काळे हे होते. बारामतीच्या पश्चिमेस चार मैलांवर माळेगाव येथील जहागीरदार जाधव घराणे शिवाजीमहाराजांच्या आजोळच्या घराण्यापैकीच आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल सैन्याला सळो की पळो करून सोडणारे प्रसिद्ध सेनानी धनाजी जाधव यांचे हे वारस आहेत व ते बहुमोल कार्य करीत आहेत.

बारामती येथील जैन मंदिर हे फार पुरातन आहे. हे अंदाजे दोनशे वर्षांपूर्वीचे आहे. १९३२ मध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार झाला. श्वेतांबरांचेही स्वतंत्र असे मंदिर आहे.

येथे चांदशावलीचा उरूस जवळ जवळ तीनशे वर्षे सुरू आहे. बारामतीच्या परिसरात पांढरीचा महादेव, माळावरची देवी, लक्ष्मीनारायणाचे मंदिर ही प्रसिद्ध पुरातन देवस्थाने आहेत.

अशा या थोर परंपरेबद्दल आपणास अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. परंतु रामदासांनी सांगितल्याप्रमाणे 'सांगे वडिलांची कीर्ती तो एक मूर्ख' या वचनाप्रमाणे बारामतीकर केवळ पूर्वजांची कीर्ती सांगण्यातच धन्यता मानीत नाहीत तर त्यांचा वारसा आजही बारामतीकर टिकवून आहेत. इतकेच नव्हे तर त्यात भरच घालीत आहेत.

येथील नगरपालिकाही शहरातील सुखसोयींसाठी जास्तीत जास्त प्रयत्नशील आहे. नगरपालिकेने बारामतीचा कायापालट मोठमोठ्या वास्तू व पुतळे उभारून केला आहे. पुणे जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाची नगरपालिका म्हणून तिचा उल्लेख करण्यात येतो.

या शहरात शिक्षण, क्रीडा व कला यांचा त्रिवेणी संगम झाला आहे. राजकीय क्षेत्रातसुद्धा बारामती आघाडीवरच आहे. बारामतीकरांना आमदार श्री. शरदचंद्रजी पवार यांचे तरुण, तडफदार नेतृत्व लाभलेले आहे. आमदार, राज्यमंत्री, शिक्षणमंत्री, शेतीमंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री अशा चढत्या क्रमाने त्यांचा उत्कर्ष होत आहे. त्यांचे दातृत्व, कर्तृत्व व दूरदर्शीपणा यामुळे बारामतीचे नाव भारतभर गाजले आहे.

अशा रीतीने ही शिवलीलामृताची जन्मभूमी, मोरोपंतांची कर्मभूमी म्हणून बारामती अजरामर राहील.

**संदर्भग्रंथ–** १. बारामती नगरपालिका– शताब्दी पूर्ती समाचार ग्रंथ. (प्रशासनकाल–१९६७)
२. रणसिंग साप्ताहिक – पुरवणी अंक (२९-११-१९८०)

●●●

सुनील महामुनी
टी. वाय्. बी. ए.

# ऐतिहासिक बारामती

कोणत्याही कलाकृतीतील किंवा वाङ्मयीन कृतीतील आशय व अभिव्यक्ती, आकृती आणि शैली यांचा जन्म लेखकाच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वामधूनच होत असतो. काणेकरांच्या लघुकथा, लघुनिबंध, प्रवासवर्णन, एकांकिका, नाटक, कविता इत्यादी वाङ्मयप्रकारांचे स्वरूप पाहिले असता हे विधान अधिक स्पष्ट होते. काणेकरांनी आपल्या लेखनाला सुरुवात केली ती कवितांनीच; आणि तीही वयाच्या तेराव्या वर्षी. काणेकरांच्या नावावर एकच काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. तो म्हणजे 'चांदरात व इतर कविता'. १९३३ साली हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. चांदरातीने काणेकरांना विलक्षण लोकप्रियतेबरोबरच साहित्यक्षेत्रात एक विशिष्ट स्थान प्राप्त करून दिले. त्यातील निसर्गचित्रणाइतकेच विडंबनात्मक रचनांचेही वाचकांकडून कौतुक झाले. त्यांच्या 'चांदरात' या चिमुकल्या काव्यसंग्रहातून झालेले त्यांच्या नवप्रतिभेचे पहिले नेत्रदीपक दर्शन महाराष्ट्राला विशेष रोमहर्षक वाटले. विविध रुचींच्या रसिकांना रंजविण्याचे सामर्थ्य त्यांच्या या संग्रहात आहे. त्यांच्या काव्यशैलीतील आकर्षक संक्षेप, केवळ आशयातून स्फुरून आशयाचाच विकास एका सरळ रेषेत साधण्यात दिसून येणारी तिची सार्थकता, तिच्यातील प्रत्यक्षता, कल्पनांचा किंवा भावनांचा व्याज-काव्यात्म फुलोरा टाळण्याची वृत्ती आणि एकूण आविष्कारालाच असलेला एक तऱ्हेचा सुटसुटीत आटोपशीरपणा प्रथमदर्शनीच वाचकांच्या मनावर वेगळा संस्कार करून जातो. तरुण, आकर्षक आणि संवेदनक्षम व्यक्तिमत्त्व असलेल्या एका कविमनाचे तारुण्यातील जे हृदयंगम भावविश्व साकार झाले आहे, त्याचे निखळ चित्र रसिकांच्या अंतःकरणावर तितक्याच उत्कट स्वरूपात सहजपणे उभे राहते. 'चांदरात'मध्ये आशेचे उद्गार आहेत. निराशेचे निःश्वास आहेत. विनोदाचा विलास आहे. विडंबनाचा विहार आहे. चांदरातीचा चमत्कार आहे. यात प्रेमगीतांची संख्या पुष्कळ असून त्यातील कोळ्याचे गाणे,

'चल ग सये रानामध्ये
चाफ्याचं फुल तुझ्या कानामध्ये'

आणि

'तू माझी अन् तुझा मीच'

यासारखी गीते प्रसिद्ध आहेत. त्यांच्या प्रेमकवितेत ताई भाईच्या नात्याला मुळीच थारा नाही. उलट या वृत्तीचे विडंबन करणाऱ्या त्यांच्या एका विनोदी कवितेतील नायक 'भगिनीप्रेमाने न्हाऊ' घालण्याची तिची भाषा ऐकताच संतापाने लालबुंद होऊन दात ओठ चावत उद्गारतो.

'घरी माझ्या आहेत खूप ताई
करा काळे बघण्यास दुजे भाई'

तारुण्यात माणसांना बेभान, वेडेपिसे करून टाकणारी एक भावना याच दृष्टीने त्यांच्या कवितेत प्रेमभावनेचा आविष्कार होतो. प्रेमाचे तत्त्वज्ञान त्यांच्या वृत्तीत बसणारे नाही. प्रेम या कल्पनेभोवतीचा गोड गुंजारवही त्यांच्या कवितेत नाही.

ही दोन हृदयाविण जादू न चालायची
प्रीत ना अशी वाऱ्यावर वाढायची

असे ते एका कवितेत स्पष्टच म्हणतात. त्यात तारुण्यातील प्रेमभावनेचे चित्रण असूनही त्या भावनेला एक प्रकारचा रोखठोकपणा, स्पष्टपणा आहे. प्रेमगीताला निसर्गाची पार्श्वभूमी मिळवून देऊन निसर्गाचे वातावरण मानवी भावनांना पोषक करण्यात काणेकर कुशल आहेत. त्यांचे 'आला खुषीत समिंदर' हे निसर्ग-प्रेमगीत यादृष्टीने वाखाणण्याजोगे आहे. 'नळावर तणतणून भांडणाऱ्या एका बाईस' आणि 'प्रेम आणि पतन' अशा प्रकारची विडबन गीतेही त्यांनी लिहलेली आहेत.

जीवनाचे आकलन पूर्णांशाने करून घेण्याची ओढ काणेकरांच्या वृत्तीत आहे. त्यांच्या व्यक्तित्वात उपजत ध्येयवादित्व आहे. याचीही साक्ष आपणास त्यांच्या कवितेत मिळते. आपण आयुष्यात काहीतरी करावे अशी त्यांची इच्छा असते. आणि ती इच्छा '३१ डिसेंबर १९२६ ची मध्यरात्र' या कवितेत व्यक्त करताना ते म्हणतात,

असेल काळाहाती मरणे
परी आमच्या हाती जगणे !
कां नच मग वीरोचित जगणे
अभिमानाने हांसत मरणे ?...

व्यक्तित्वाची वाढ आणि त्याचबरोबर जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी यात घडून येणारा स्वाभाविक विकास याचा संकलित ठसा त्यांच्या काव्यरचनेत पाहवयास मिळतो. त्यांची भाषा ही सहजगत्या अलंकृत आहे. त्यांच्या भाषेत पौरुष आहे, पण त्याचा दर्प नाही, तिच्यात एक प्रकारचा घरगुतीपणा असूनही भारदस्तपणा आहे.



काणेकरांनी कवितांबरोबरच ललित निबंधही लिहिलेले आहेत. १९२० नंतर ललित निबंधाचा खरा प्रारंभ झाला. खांडेकरांनी 'वैनतेया'त व फडक्यांनी 'रत्नाकरा'त नवीन प्रकारचे लेख लिहून लघुनिबंधाला चालना दिली. त्यांच्याबरोबर तिसरे सुप्रसिद्ध लघुनिबंधकार म्हणजे काणेकर होत. ललित निबंध हा वयाने लहान आहे परंतु त्याच्यामागची प्रेरक शक्ती ही पुरातन व चिरतन आहे. आत्मपरता आणि आत्माविष्कार हा लघुनिबंधात आढळून येतो. ललित निबंधाला गद्यातील भावगीत म्हणण्याचा प्रघात आहे. भावकाव्यात असणारी आत्मपरता, भावनार्तता आणि कल्पनारम्यता ही ललित निबंधात असतात. ललित निबंधाला विषय निमित्तमात्र असतो. त्याचा खरा विषय एकच असतो आणि तो म्हणजे स्वतः लेखक. जीवनाचा अनुभव प्रकट करणारी, त्यावर आत्मचिंतनाचे संस्कार करणारी, ते अनुभव विशिष्ट प्रकारे अभिव्यक्त करणारी लेखकाची एक स्वतंत्र धाटणी किंवा पद्धती ही ललित निबंधात आढळते. ललित निबंध हा कित्येकदा काव्यात्म असतो. कारण त्याला कल्पनारम्यतेची व संवेदनाक्षमतेची जोड मिळालेली असते. ललित निबंधात वैयक्तिक आवडीनिवडी, आठवणी आणि अनुभव हे व्यक्त होतात. त्यात अधून मधून बुद्धि-पुरस्सर केलेली विषयांतरे असतात. विनोदही मधून मधून असतो. तसेच या ललित निबंधाची भाषा ही साधी, सहज, खेळकर, एखाद्या मित्राने आपल्या जिवलग मित्राला सांगितलेल्या गुजगोष्टीप्रमाणे खाजगी स्वरूपाची असते.

काणेकरांचे लघु निबंध आकाराने लघूच असतात. बाह्यांग मनोरंजक लालित्यपूर्ण असते. विषयांतरे, आत्मकथनात्मक आठवणी, चमकदार वाक्ये, विनोदी गोष्टी आणि जगावेगळा विषय ह्या सर्व गोष्टी असतात. परंतु त्यांच्या लघु निबंधाचा आत्मा किंवा केंद्रबिंदू खुद्द लेखक हा नसतो तर एखादा विचार असतो. आत्मानुभवापेक्षा उद्बोधक विचारच अनुभवाचे रूप आणि वेष घेऊन आलेला असतो. कधीकधी त्यात लेखकाचे व्यक्तिमत्त्वही प्रकट झालेले असते, पण पहिले स्थान विचाराला व गौण स्थान लेखकाला असते. काणेकरांच्या लघुनिबंधाची जात अशीच विचारात्मक आहे. 'देवदारू आणि चक्रवाक', 'दुरून आकाश साजरे' यांसारखे त्यांचे काही निबंध हे खऱ्या अर्थाने ललित निबंध आहेत. काही सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समस्या आणि मानवी जीवनात आठवणाऱ्या काही संस्मरणीय घडामोडी यांमधून काणेकरांच्या लघुनिबंधाचा जन्म होतो. काणेकरांना काही विचार सुचतात व ह्या विचारांच्या एकच नव्हे तर अनेक बाजू लक्षात येतात व या सर्वांचा समतोल हसत खेळत साधून काणेकर आपली वैचारिक भूमिका मनोरंजकपणे मांडतात. विचाराची दुसरी बाजू मांडण्यासाठी काणेकरांनी गणूकाका हे पात्र निर्माण केले आहे. लेखक आणि गणूकाका यांच्या मतभेदांमधूनच सत्याचा किंवा योग्य विचाराचा विकास होतो. त्याकाळी काणेकर साम्यवादी विचारसरणीने भारले गेले होते. सभोवार पसरलेल्या तारुण्याच्या दाट धुक्यामधून काणेकरांना समाजवादी विचारांचा लाल तारा दिसत होता. आणि आकर्षितही करीत होता. त्यामुळे समाजवादातील विरोध-विकासाचा सिद्धांत कळत म्हणा किंवा नकळत म्हणा काणेकरांच्या अनेक लघुनिबंधाचे वैचारिक स्वरूप निश्चित करतो. आकर्षक भाषेत आणि मनोरंजक पद्धतीने मांडलेला विचार हा काणेकरांच्या लघुनिबंधाचा आत्मा आहे. 'मोठे शून्य', 'दोन मेणबत्त्या' हे त्यांचे विशेष प्रसिद्ध असे लघुनिबंध आहेत.

काणेकरांच्या लघुनिबंधात विस्तार किंवा विषयांतरे अपवाद म्हणून सुद्धा नसतात. एखादेच सुभाषित असते पण तोच अनेकदा लघुनिबंधाचा विचार असतो व शीर्षक म्हणून तो बहुधा त्या लघुनिबंधाच्या 'डोक्यावर' बसलेला असतो. मराठी वाङ्मयात आज जी ललित निबंधाला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे ती फडके, खांडेकर आणि काणेकर या तिघांच्या प्रतिभेचा व परिश्रमाचा परिपाक आहे. या तीन ललित निबंधकारांच्या पावलावर पाऊल टाकूनच वि. पां. दांडेकर, ना. मा. संत, गो. रा. दोडके, कुसुमावती देशपांडे, वि. ल. बर्वे इत्यादी ललित निबंधकारांची पिढी पुढे सरसावली.

●●●

कु. शामला भुंजे
एस्. वाय्. बी. ए.

## काणेकरांचे ललित व्यक्तिमत्त्व

कॉटवर पडल्या पडल्या शिरीष विचार करीत होता. दुपारची स्वस्थ वेळ होती. त्याचे मन आज अतिशय अस्वस्थ होते. दहाबारा दिवसांपूर्वीचा प्रसंग त्याला आठवत होता. तो प्रसंग त्याच्या मनात कोरून बसल्यासारखा झाला होता. जसाच्या तसा तो प्रसंग त्याला डोळ्यांसमोर दिसू लागला.

त्या दिवशी सकाळीच तो मंडईत गेला असताना त्याला डॅनी भेटला होता.

'ए यार ! काय ओळखबिळख दाखवायची बात आहे की नाही ?'

अचानक पडलेल्या जोरदार थापेमुळे शिरीष भलताच दचकला. मागे वळून पाहतो तो सहा फूट उंचीचा, भरलेल्या अंगाचा डॅनी उभा होता.

'हॅं ! काय दचकलो रे ! आधी हाक तरी मारायचीस !' शिरीष म्हणाला.

डॅनी म्हणजे बड्या बापाचा बहकलेला पोरगा होता. त्याच्यासारख्याच आणखी काही मुलांचा ग्रूप होता. त्यांच्यामध्ये मिसळायला, खरे म्हणजे शिरीषला आवडत नसे. पण त्यांना तो आवडत असल्यामुळे आणि विशेषत: स्वत:च्या गरिबीमुळे त्याला त्यांच्यात मिसळणे भाग होते.

'दोस्त ! आता ख्रिसमस जवळ आला आहे. विल्यमकडे ३१ डिसेंबरला New year ची पार्टी आहे. तू अगदी आलेच पाहिजे हं ! You must come. तुझ्याशिवाय पार्टी म्हणजे...' डॅनी सांगत होता.

'बास बास ! जास्त तारे तोडू नका. आपण काय सांगणार ते मी ओळखले आहे. मेहेरबानी करा आणि फुटा आता !' शिरीष.

'पण तू येणार ना नक्की ? नाहीतर आयत्यावेळी करशील राडा. मी काय सांगू विल्यमला ?' डॅनी.

'येईन रे ! काय उगाच पिटपिट लावली आहे. आता कुठे निघालास ? चल, येतोस घरी ?' शिरीषने विचारले.

घरी म्हटल्यावर डॅनी एकदम वळला. त्याला शिरीषच्या घरी कोंडल्यासारखे वाटत असे. त्याच्या मते तो 'सभ्य' भाषा वापरी. पण शिरीषचे घर वाळबोध वळणाचे असल्याने त्याची 'सभ्य' भाषा ऐकूनच शिरीषचे घर हादरून जाई. डॅनी म्हणाला,

'छे छे ! मी कसला येतो आता ! चल, घरापर्यंत लिफ्ट देतो तुला. पण घरी येण्याबद्दल, आणि तुझ्या ? नो नो.'

शिरीषला त्याच्या गाडीतून जायला आवडत नसे. पण 'स्कॉलर लोक भलताच भाव खातात' हा शेरा घेण्यास तो तयार नव्हता. तो मुकाट्याने निघाला. डॅनीला पुन्हा एकदा पार्टीला न विसरता येण्याचे वचन देऊन तो घरी आला.

शिरीष कॉलेजमध्ये एक हुषार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होता. पण त्याच्या घरची अगदी गरिबी होती. वडिलांच्या मागे आईने मोठ्या कष्टाने त्याला वाढवले होते. आईचे कष्ट तो जाणून होता. आईदेखील त्याचे यश पाहून आनंदी होत होती. शिरीष बारावी अगदी उत्तम मार्कांनी पास झाल्यावर त्याच्या आईला अतिशय आनंद झाला होता. आपला मुलगा शिकून मोठा व्हावा ही त्याच्या दिवंगत वडिलांची इच्छा ती पूर्ण करणार होती. शिरीषही आपल्याकडून होईल तेवढा हातभार लावत होता. दिवसभर कॉलेज, निरनिराळी कामे करून तो दमत होता. तरीही अभ्यासात त्याची प्रगती वाखाणण्याजोगी होती. एफ्. वाय्. ला त्याने कॉलेज मध्ये प्रवेश घेतल्यावर वर्गातल्या मुलांनी त्याची हेटाळणी केली होती. पण जेव्हा का सेमिस्टर फर्स्ट अँड सेकंड चे त्याचे मार्क्स त्यांनी बघितले तेव्हा तो हुशार असल्याचे त्यांना कळून चुकले. आज तो टी. वाय्. ला होता. एस्. वाय्. ला असल्यापासून वर्गातल्या बड्या बापांच्या मुलांनी त्याची हुशारी बघून त्याला आपल्या कामासाठी राबवायला सुरुवात केली होती. प्रथम प्रथम त्याला आश्चर्य वाटले. गरिबाबद्दल आजही लोकांना दया वाटते असे त्याला वाटत होते. तसा तो लाचार नव्हता. या मुलांकडून फुकटची मदत घेऊ नये असे वाटत असल्यामुळे तो प्रत्येक गोष्ट मोबदला चुकवूनच घेत होता. ती मुलेही आपल्या बुद्धीची कुवत जाणून होती.

आपल्या मित्रांची गरिबांबद्दल काय भावना आहे, ते त्यांना कशी वागणूक देतात हे त्याने वेळोवेळी त्यांच्या घरातील नोकरांशी वागण्यावरून समजून घेतले होते. मग आपल्याच बाबतीत ते एवढे मऊ का ? हे कोडे त्याला अजून सुटले नव्हते. पण गेल्या पंधरा दिवसांत त्याच्या भ्रमाचा भोपळा फुटला होता.

प्यारे, विल्यम, डॅनी, चंदू, अवी इत्यादी मुलांच्या त्या ग्रूपकडे पैसा चिकार होता. पण डोक्याचा मात्र पूर्णपणे अभावच होता. पोरींची टिंगल करणे, प्रोफेसरांची टवाळी करणे आणि वर्षाच्या शेवटी कुणाच्यातरी हातापाया पडून किंवा धाक दाखवून पास होणे एवढेच त्यांचे उद्योग होते. एखाद्या वर्षी नापास झाले तरी त्याची फिकीर करण्याचे त्यांना काहीच कारण नव्हते.

कोणत्याही कारणाने त्या ग्रूपमध्ये पार्टी झाली तरी त्या पार्टीला त्याला बोलावणे असेच. पैशानेसुद्धा न भरून काढता येणारी– पाहुण्यांना एंटरटेन करण्याची– कामगिरी शिरीषवर असे. त्याला जमेल तेवढ्या चांगल्या तऱ्हेने तो ती कामगिरी पार देखील पाडत असे. खुस-खुशीत जोक्स ऐकवून, सध्याचे राजकारण कोणत्या दिशेला जात आहे त्यासंबंधी चर्चा करून साहित्य-कला-शास्त्र इत्यादी विषयांवरही तो उत्तमपणे बोलू शकत असे. त्याच्या या कामावरच डॅनीचा ग्रूप खूष होता. कारण त्यांच्या बुद्धिमत्तेची उणीव शिरीषमुळे भरून निघत असे. त्यामुळे कोणत्याही प्रकारे न कुरकुरता ते शिरीषला मदत करण्यास तयार असत. अर्थात या मदतीचेसुद्धा शिरीषला उपकार वाटत असत. त्याला कधी कधी हा मिंधेपणा अतिशय तीव्रतेने जाणवत असे.

आता परवाचीच गोष्ट. ख्रिसमसच्या पार्टीला तो नेहमीप्रमाणे हजर राहिला होता. आणि त्याचवेळी त्याच्या भ्रमाचा भोपळा फुटला होता.

रात्री साडेनऊ-दहाची वेळ. पार्टी नुकतीच सुरू झाली होती. गाड्यांचा मोठा ताफा विल्यमच्या घरासमोर जमला होता. खरी-खोटी प्रशंसा होत होती. मंद मंद दिव्यांच्या प्रकाशात पार्टीला रंग भरत होता. नाजुक सौंदर्य नाजुक आवाजात बोलत होते. मधून मधून हास्याचे फवारे उडत होते. एवढी पन्नास-साठ माणसे असूनही अजिबात गडबड गोंधळ नव्हता. रात्रीचे अकरा वाजत आले होते. New Year ची वेळ जवळ येत होती.

ड्रिंक्सचा पहिला राउंड संपवून दुसरा राउंड सुरू झाला होता. माणसांच्या मनातील खऱ्या गोष्टी हळूहळू बाहेर पडत होत्या. तोंडावरचा ताबा सुटत चालला होता. गावातील प्रतिष्ठित, धनिक वर्गाचे खरे स्वरूप उघडे पडत होते. या सर्व गोष्टींची शिरीषला सवय झाली होती. मनाशीच हसत तो हातामध्ये जीनचा ग्लास घेऊन नर्म-विनोदी बोलत पार्टीला रंग भरत होता. सगळ्यांची विचारपूस करत होता. एवढ्यात त्याला डॅनी आणि प्यारे एकमेकाशी बोलताना दिसले. त्यांच्या बोलण्यात आपला उल्लेख झालेला ऐकताच तो, त्यांना समजणार नाही अशा बेताने, त्यांचे बोलणे ऐकू लागला.

डॅनी प्यारेला म्हणत होता– 'त्या साल्या स्कॉलर-मुळे आपली पार्टी रंगतदार होते खरी ! पण यार, किती दिवस तो आपल्या पैशाने जगणार ? साल्याकडून पार्टीची अपेक्षा करणे बिनडोक माणसाचे काम आहे. तो असाच आपल्या पैशावर चरत हिंडणार ! जाने दो !'

'स्साला ! तुम तो बिलकुल सच बोलते हो। मगर हमे उसका क्या लेना है ? फोकटका माल मिलता है। जाने दो ना !' प्यारे.

'पण एकदा तरी त्याच्याकडून पार्टी उकळलीच पाहिजे. बघू तरी तो काय करतो ते !' डॅनी.

आणि ते त्याच्याकडे बघून उपेक्षेने हसले होते. वरवर दाखवत नसले तरी बाकीच्यांची देखील आपल्या-बद्दल हीच कल्पना असणार हे शिरीषने जाणले. त्या दिवशीच्या प्रसंगापासून तो अतिशय अस्वस्थ होता. काय करावे हे त्याला सुचत नव्हते. आज शेवटी त्याने आपल्या मनाशी एक निर्णय घेतला होता.

संध्याकाळी आपल्या आईशी बोलताना तो तिला म्हणाला,

कर्वे एस्. डब्ल्यू.
टी. वाय्. बी. कॉम.

## पार्टी

! आई, आज एकदाच मी काय मागतो ते मला दे. पुन्हा मी तुझ्यापाशी काहीही मागणार नाही. मी मागितलेल्या वस्तूचा उपयोग काय करणार आहे हे मी तुला नंतर सांगेन. '

त्याच्या मागणीप्रमाणे शिरीषच्या आईने आपला राहिलेला एकच दागिना म्हणजे दोन तोळ्याच्या सोन्याच्या बांगड्या त्याला दिल्या. आपला मुलगा याचा काहीही दुरुपयोग करणार नाही याची त्या मातेला खात्री होती.

आज शिरीष मोठ्या गडबडीत दिसत होता. त्याने ' हॉटेल गुलमर्ग ' मध्ये एक पार्टी अॅरेंज केली होती. आपल्या मदतकर्त्या ग्रूपला त्याने पार्टीला बोलावले होते. ती सर्व मुले, ' काय स्कॉलर लोक, आज पार्टी, काही विशेष दिसतेय ! ' असे म्हणत उत्सुकतेने पार्टीला आली होती. सगळीकडून ' पार्टीचे कारण काय ? ' म्हणून विचारणा केली जात होती.

'Wait a minute, please ! I will tell you at the end of the party. It will be the clymax of my party.' शिरीष हसून सर्वांना उत्तर देत होता. पार्टीला रंग भरत होता. पार्टी ऐन रंगात आलेली असताना...

' लेडीज अँड जंटलमेन ! ' शिरीषने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तो बोलू लागला, ' ही पार्टी माझ्या जीवनातील बहुतेक फस्ट आणि लास्ट पार्टी असेल ! आजपर्यंत मी आपणा सर्वांकडून अनेक शानदार पार्ट्या स्वीकारल्या. प्रत्येकवेळी त्या सर्वांची परतफेड करणे मला शक्य झाले नाही. आजच्या या पार्टीद्वारे ही परतफेड करण्याचा मी अल्पसा प्रयत्न केला आहे. मात्र ही पार्टी आपणा सर्वांना साजेशी नाही याची कल्पना मला आहे. ही पार्टी कशा-बद्दल आयोजित केली आहे याची तुम्हांला उत्सुकता आहे. यापुढे आपल्या कडील एकही पार्टीत मी सहभागी होऊ शकणार नाही हे ऐकताना आपल्याला धक्का बसेल याची मला कल्पना आहे. मी गरीब असलो तरी लाचार नाही. पण आपण मला माझे खरे स्थान काय हे दाखविल्याबद्दल मी आपला अतिशय आभारी आहे.'

सर्वजण सुन्न होऊन ऐकत होते. गरिबीतही स्वाभिमान बाळगून राहणाऱ्या आपल्या वर्गबंधूकडे ते पाहत होते. आपल्या एवढ्याशा बोलण्याचा एवढ्या दूरवर परिणाम होईल याची प्यारी आणि डॅनीला कल्पना नव्हती. ते लज्जित झाले होते.

मात्र शिरीषच्या ओठांवर समाधानाचे स्मित फुलले होते. आईला हे सर्व सांगितल्यावर ती देखील आपले कसे कौतुक करील याची स्वप्ने त्याच्या डोळ्यांसमोर तरळत होती.

●●●



आज सतीशला खूपच अस्वस्थ वाटत होते. आणि वाटणे साहजिकच होते. कारण आज त्याचा बी. ए. चा शेवटचा पेपर होता. पण... पण त्याचा त्या पेपरचा अभ्यासच झाला नव्हता. आणि त्याला कारणही होते म्हणा. कारण तो एका खाजगी कंपनीत नोकरी करीत शिकत होता. तो आणि त्याचा भाऊ दोघेच घरखर्च चालवत होते. आणि ते दोघे शिकून मोठ्या किंवा बऱ्यापैकी नोकरीला लागेपर्यंत तर त्यांना असेच दिवस काढावे लागणार होते.

पण त्याला उद्याच्याच पेपरची काळजी होती. कारण हा जर पेपर सुटला नाही तर मात्र पुन्हा एक वर्ष घालवावे लागणार होते आणि ते त्याला काही परवडणारे नव्हते. त्यामुळे खरोखरच तो इतका अस्वस्थ झाला होता की त्याला काय करू अन् काय नको असे झाले होते. पण करणार काय ? पेपर तर उद्या सकाळी नऊ वाजता होता आणि त्यासाठी त्याला फक्त दिवसा-तले काही तास आणि आजची पूर्ण रात्र मिळणार होती. पण तेवढ्यात तो काय करणार होता ? त्याला काहीच सुचत नव्हते. आणि वेळ तर एक एक क्षणाने कमी होत चालला होता. तो मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करीत होता. पण ते मन एकाग्र होत नव्हते. मनामध्ये येऊ नये तो विचार येत होता. कॉपी करण्याचा... पण तो विचार नुसता मनामध्ये आला आणि त्याला घामच फुटला. हा विचार त्याने झटदिशी मनातून काढून टाकला आणि पुन्हा मन एकाग्र करण्याचा प्रयत्न केला. पण छे... आज त्याचे मन ठिकाणावर नव्हतेच मुळी. त्याच्या डोळ्यांसमोर वही असली तरी त्याच्या डोळ्यांना भलतेच चित्र दिसत होते. त्याच्या पुढचाच मुलगा कॉपी करताना दिसत होता. आणि विशेष म्हणजे आतापर्यंतच्या सर्व पेपर्सच्या वेळी तो यशस्वी झाला होता. त्याची कॉपी अजीबात पकडली गेली नव्हती. अगदी आरामात तो कॉपी करून पेपर लिहीत होता. पण ते नुसते बघूनच त्यावेळी सतीशला घाम फुटला होता आणि छातीमध्ये धडधड सुरू झाली होती. जसे काही तोच कॉपी करीत होता. पण त्यावेळी त्याने स्वत:ला सावरले होते. न जाणो कदाचित सुपर-वायझरला आपलाच संशय यायचा आणि आपणच पकडले जायचो. म्हणून त्याने पुन्हा एकाग्र होऊन पेपर लिहिला होता.

पण आज त्याला त्यादिवशीसारखे एकाग्र होता येत नव्हते. सारखे विचार, विचार आणि विचार... यातच त्याचा वेळ चालला होता आणि आता तर रात्र झाली होती. आता ह्या एका रात्रीत तो काय करणार होता ? काहीच करू शकणार नव्हता. पण तेवढ्यात...

' अरे सतीश, असा नुसता बसलायस काय विचार करीत ? अभ्यास कर ना मन लावून. उद्या पेपर आहे

**सूर्यवंशी संजय ब.**
एस्. वाय्. बी. ए.

# मोह

ना शेवटचा ?' कोणीतरी म्हटले. केवढ्यांदा दचकला सतीश. कोण बोललें बरे ?

'अरे, त्याचे कसले मन अभ्यासावर एकाग्र होतेय आता. आणि काय करणार आहे तो एका रात्रीत आता ? 'ती' गोष्ट केल्याशिवाय आता त्याला पर्यायच नाही.' तेवढ्यात दुसरा आवाज आला.

त्यावर पहिल्या आवाजाचा त्याला उपदेश,

'नाही, नाही सतीश, तुला हे जमणार नाही आणि तू नसत्या भानगडीत पडू नकोस. रात्रीतल्या रात्रीत जेवढा जमेल तेवढा अभ्यास कर आणि उद्याचा पेपर शांतचित्ताने लिही.'

त्यावर दुसरा आवाज, 'नाही सतीश, तुला लवकरात लवकर नोकरीला लागले पाहिजे. आणि जर उद्याचा पेपर तुला नीट लिहिता आला नाही तर तुझे एक वर्ष वाया जाईल. तेव्हा तू कॉपीच करून पेपर लिही. अरे, तो देसाई नाही का करीत असेच. आला नाही एखादा प्रश्न की काढतो कॉपी अन् लिहितो आणि तेसुद्धा न घाबरता. कधी पकडला गेलाय का तो ? आणि तुला काही सगळेच प्रश्न कॉपी करून लिहायचे नाहीत. अगदी महत्त्वाचे असेच प्रश्न घे आणि न घाबरता लिही. अरे, तो देसाई रोज कॉपी करतो आणि तुला या शेवटच्या एका पेपरला करायला काय हरकत आहे ?'

आता मात्र सतीश अगदीच गोंधळून गेला होता. त्याच्या दोन मनांतच संघर्ष चालला होता. पण त्या संघर्षाचा शेवट, त्यालाही माहीत नव्हता. त्या प्रश्नावर त्याला निर्णय घेता येत नव्हता. पण शेवटी काय झाले कोणास ठाऊक. त्याने ठरविले; नाही, नुसते ठरविलेच नाही तर तो एक लहानसा कागद घेऊन कॉपीची तयारी करायला बसला. अखेर वाईट मनाचाच विजय झाला होता.

सर्व व्यवस्थित जवळ ठेवून सतीश पेपरला बसला. विशेष म्हणजे त्याला आज काहीच वेगळे वाटत नव्हते. तो घाबरलेला दिसत नव्हता की त्याला घाम फुटत नव्हता. आणि जेव्हा प्रश्नपत्रिका वाटल्या गेल्या तेव्हा त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. त्या प्रश्नपत्रिकेत त्याने आणलेल्या चार प्रश्नांपैकी तीन प्रश्न विचारले होते. आता तो पेपर लिहिल्यानंतर बी. ए. पास होणार होता, अगदी चांगल्या मार्कांनी. नंतर त्याला नोकरी लागणार होती आणि त्याचे दारिद्र्य हटणार होते.

त्याने लगेच पेपर लिहायला सुरुवात केली. एका तासात त्याने दोन प्रश्न अगदी व्यवस्थित लिहून काढले. आतापर्यंत तरी त्याची कॉपी पकडली गेली नव्हती आणि सुपरवायझरने त्याच्याकडे पाहिलेसुद्धा नव्हते ! त्याने तिसऱ्या प्रश्नाची कॉपी काढली आणि लिहायला सुरुवात केली. आणि ती जवळजवळ अर्ध्याच्या वर लिहिली अन् काय झाले कोणास ठाऊक, सुपरवायझर त्याच्याजवळ येऊन उभे राहिले, अन् म्हणाले,

'मिस्टर उठा, द्या तो कागद.'

सतीशला काय झाले ते क्षणभर कळलेच नाही. पण जेव्हा तो भानावर आला तेव्हा मात्र त्याला वस्तुस्थितीची जाणीव झाली.

त्याच्या डोळ्यासमोर अंधारच अंधार दाटून आला. क्षणाच्या मोहाने त्याला भूल पाडली होती आणि दुर्दैव त्याच्याकडे पाहून हसत होते.

•••



# वीज टंचाई : एक उग्र समस्या

**स्वातंत्र्योत्तर भारत**

आज भारताला स्वातंत्र्य मिळून ३३ वर्षे पूर्ण होत आहेत. इंग्रजी राजवटीत असताना जे प्रश्न निर्माण झालेले होते ते प्रश्न स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुटतील असे वाटत होते; परंतु ते सुटलेले नाहीत. उलट ते अधिक बिकट होत चालले आहेत. भारतातील प्रमुख समस्येत वीज टंचाई ही एक उग्र समस्या निर्माण झाली आहे.

**परिस्थितीचा आढावा**

भारतामध्ये वीज टंचाईमुळे गेल्या तीन-चार वर्षांत सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आणि उद्योग व शेती क्षेत्रांत निर्माण झालेल्या संकटाची तीव्रता वाढली आहे. १९७९ मधील एप्रिल-मे मध्ये केरळ, हिमाचल प्रदेश, मेघालय व मिझोराम वगळता अन्य सर्वच राज्यांतील उद्योगांस १० ते ६० टक्के वीज टंचाईची कपात सहन करावी लागत आहे. तर घरगुती वापरातही १५ ते ३० टक्के कपात सहन करावी लागत आहे. प्रतिवर्षी वाढत जाणाऱ्या वीज टंचाईच्या समस्येमुळे लाखो कामगारांना बंद चे संकट सहन करावे लागत आहे. तर ऑफमुळे अनेकांचे उत्पन्नाचे साधन नाहीसे झालेले आहे.

## कारण मीमांसा

**१. निष्क्रीय उत्पादनक्षमता**

भारतात वीज टंचाईचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याची अनेक कारणे आहेत. सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे औष्णिक प्रकल्पांची अपुरी कार्यक्षमता होय. वीज उत्पादन केंद्रातील ४० ते ४५ टक्के यंत्र-क्षमता उपयोगात आणली जात नाही. या यंत्रांची दुरुस्ती व साफसफाई यात औष्णिक प्रकल्पातील ८ ते १० टक्के वेळ वाया जातो. तसेच यंत्रे आकस्मिक बंद पडतात यामुळे वीज टंचाई निर्माण होते.

**२. मान्सूनचा पाऊस वेळेवर न पडणे**

दुसरे कारण अपुरा पाऊस. भारतात गेल्या तीन-चार वर्षांत विशेषतः मान्सूनचा पाऊस वेळेवर पडत नाही अथवा गरजेच्या मानाने अपुरा पडत आहे. पाऊस अपुरा पडत असल्यामुळे वीजनिर्मितीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्यामुळे वीज कपातीचे मोठे संकट निर्माण होत आहे. याची झळ सर्वसामान्य नागरिक, उद्योग व शेती क्षेत्र यांना बसत आहे.

**३. निकृष्ट प्रकारची यंत्रसामग्री**

औष्णिक प्रकल्पांना जी यंत्रसामग्री उपलब्ध होते ती कमी दर्जाची आहे. त्यामध्ये जनरेटिंग सेट्स, सुटे भाग यांचा पुरवठा वेळेनुसार न होणे यामुळे वीज उत्पादनात अनेक अडचणी उद्भवत आहेत. तसेच प्रकल्पातील कार्यवाहीमध्ये निर्माण होणाऱ्या उणिवांनी लागणारा विलंब यामुळेही वीज टंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**४. कमी उत्पादन**

भारतात ज्या तीन पंचवार्षिक योजना राबविल्या त्या तिन्ही योजनांत इष्टांक व साध्य यात तफावत पडत गेली. पहिल्या योजनेद्वारे १.४० मेगा किलोवॅट्स, दुसऱ्या योजनेद्वारे ३.४८ मेगा किलोवॅट्स व तिसरीद्वारे ७.०४ मेगा किलोवॅट्स वीज उत्पादनाचे उद्दिष्ट होते. परंतु प्रत्यक्षात मात्र तेवढे उत्पादन होऊ शकले नाही. त्यामध्ये घट होत गेली. १९७९-८० मध्ये ही घट १७ टक्क्यांवर जाईल असा अंदाज होता.

**नंदकुमार आर्. निंबाळकर**
टी. वाय्. बी. ए. (अर्थशास्त्र)

**५. अपव्यय**

खरोखर ज्याठिकाणी वीज वापरण्याची गरज आहे अशा ठिकाणी वीज उपयोगात आणली जात नाही. अनावश्यक कारणांसाठी वीज वापरली जाते. उदाहरणार्थ– घरगुती वापरासाठी, करमणुकीवरील साधनांसाठी, तसेच खेड्यांत अनावश्यक ठिकाणी विजेचा वापर केला जातो. मूलतःच वीज उत्पादन कमी प्रमाणात आहे व त्यातच अनुत्पादक कारणांसाठी जवळजवळ १७ टक्के विजेचा अपव्यय होत आहे.

**६. विकासाच्या दृष्टीने उत्पादनाकडे दुर्लक्ष**

भारतातील विकासासाठी विद्युतशक्ती हा महत्त्वाचा घटक आहे. त्यामध्ये नियोजित उद्दिष्टापेक्षाही वीज उत्पादन अधिक झाले पाहिजे. वीज उत्पादनक्षमता जास्त असली पाहिजे. परंतु प्रत्यक्षात त्याकडे दुर्लक्ष केले जाते. वीज टंचाईचे हे महत्त्वाचे कारण मानले जाते. प्रकल्पातील उभारणीमध्ये विलंब, यंत्रसामग्रीचा क्षमतेपेक्षाही कमी वापर, प्रकल्पांना होणारा निधीचा अपुरा पुरवठा, त्यामध्ये वक्तशीरपणा नसणे ही कारणेही ध्यानात घ्यावी लागतात.

## पंचवार्षिक योजनेतील तरतुदी

भारतातील वीज उत्पादनासाठी सार्वजनिक क्षेत्रात ज्या तरतुदी केल्या त्या पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होतात :

| योजना | योजनेचा काळ | सार्वजनिक क्षेत्रातील नियोजनाची एकूण टक्केवारी | सार्वजनिक क्षेत्रातील नियोजनाची एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| १ ली | १९५१–५२ ते १९५५–५६ | २२.२% | १४९ कोटी रुपये |
| २ री | १९५६–५७ ते १९६०–६१ | ९.२% | ४५२ ,, |
| ३ री | १९६१–६२ ते १९६५–६६ | ७.८% | १२५२ ,, |
| ४ थी | १९६९ ते १९७४ | ८.६% | २९३२ ,, |
| ५ वी | १९७५ ते १९७७–७८ | ८.५% | ३५१३ ,, |

'इंडिया १९७७–७८', भारत सरकार प्रकाशन १९७७–७८, पृष्ठ १९५

वरील नियोजनानुसार उत्पादनाचा पुढीलप्रमाणे अंदाज केला होता; परंतु ते उद्दिष्ट साध्य होऊ शकले नाही. उलट घटत गेले. त्याची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे :

| योजना | अपेक्षित उत्पादन मेगॅकिलोवॅट्स | झालेले उत्पादन मेगॅकिलोवॅट्स | घट–टक्के |
|---|---|---|---|
| १ ली | १.४० | १.१२ | २०% |
| २ री | ३.४८ | २.७३ | ३६% |
| ३ री | ७.०४ | ४.५२ | ३५% |
| ४ थी | ४.१३ | २.६० | ३७% |

वा. न. साठे, 'वीज टंचाईच्या समस्येस जबाबदार कोण ?' दैनिक 'तरुण भारत' १६-१२-८०

यामुळे पुढे दिलेले परिणाम दिसून आले.

## परिणाम

या वीज टंचाईमुळे भारतातील सर्व घटकांना अनेक परिणाम सोसावे लागत आहेत. महाराष्ट्र व बंगाल मधील शेकडो लघु उद्योगांना बंदचा मार्ग स्वीकारावा लागला. महाराष्ट्रातील गिरण्या जून १९७९ मध्ये सतत ५ दिवस बंद ठेवाव्या लागल्या होत्या. या वीज टंचाईमुळे सुमारे १६ ते १७ लाख कामगारांना बंदचा फटका बसला. तसेच घरी आलेल्या तारेमधून वीज पुरवठा कधी येतो याचा नेमका अंदाज आतुरतेने वर्षानुवर्षे वाट पाहत असलेल्या लक्षावधी ग्रामीण जनतेला आलेला नाही. तसेच मार्च-एप्रिल १९८० मध्ये निर्माण झालेल्या वीजकपातीमुळे सर्व देश टंचाईग्रस्त झालेला आहे. विशेषतः शेती क्षेत्राला वीज पंपासाठी होणारा अपुरा पुरवठा व त्यामुळे होणारे पिकांचे नुकसान फार भयानक स्वरूपाचे आहे. त्याचप्रमाणे उत्पादनात होणारी तूट, सुशिक्षित बेकारांत होणारी वाढ इत्यादी दुष्परिणाम झालेले आहेत.

## उपाययोजना

वीज टंचाई कमी होण्यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या जातात.

**१. औष्णिक प्रकल्पांची कार्यक्षमता वाढविणे**

देशात जे काही औष्णिक प्रकल्प उभारलेले आहेत, ते गरजेच्या मानाने कमी पडत आहेत. नद्यांवर धरण योजना अमलात आणून औष्णिक प्रकल्पात वाढ करून प्रत्येक प्रदेशासाठी क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणातील शक्ती निर्माण करणाऱ्या प्रकल्पांची उभारणी करणे आवश्यक आहे. यामुळे वीज टंचाई काही प्रमाणात कमी होईल.

**२. उत्कृष्ट प्रकारची यंत्रसामग्री वापरात आणणे**

वीज उत्पादनासाठी लागणारे जनरेटिंग सेट्स, तसेच अनेक प्रकारचे सुटे भाग वेळेवर पुरवून बंद पडणाऱ्या यंत्रांची तावडतोब दुरुस्ती करून ती कार्यक्षम केली जावीत व यासाठी वाया जाणारी शक्ती, वेळ यांची बचत करून वीज टंचाई कमी होण्यास हातभार लावावा.

**३. विद्युतउत्पादनातील तफावत कमी करणे**

पहिल्या तीन योजनांच्या उत्पादनात जी तफावत दिसून आली आहे, ती कमी करून आखलेल्या अपेक्षांची पूर्तता कशी होईल व घटीचे प्रमाण कशाप्रकारे कमी होत जाईल, या दृष्टीने प्रयत्न करणे व वीज टंचाई ज्या मार्गाने कमी होईल, त्या मार्गात येणाऱ्या अडचणी दूर करणे, विशेषतः उत्पादनात निर्माण होणारी दरी कमी करणे व उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

**४. अपव्यय कमी करणे**

अपव्यय कमी करणे ही एक महत्त्वाची उपाययोजना ठरते. कारण जिथे विजेची फार आवश्यकता आहे, त्याठिकाणी योग्य वापर केल्यास, तसेच घरगुती अपव्यय कमी केल्यास, करमणुकीवरील विजेचा वापर मर्यादित केल्यास, सरकारी कार्यालयामधील अपव्यय कमी केल्यास वीज टंचाई कमी होण्यास मदत होईल.

अशाप्रकारे वीज टंचाई कमी करण्यास वर सुचविलेल्या उपाययोजना उपयोगी पडतील असा विश्वास वाटतो.

●●●



# श्री गोमटेश्वर

महावीर माणिकचंद शहा
टी. वाय्. बी. ए.



हे चावुंडराजें करविले
की पूर्व पुण्याईने प्रगट केले
का आपोआप प्रकाशा आले
जे असे उभे ॥
हे नव्हे शिलायुगातील शिल्प
यापुढे तदितर शील अल्प
हे अखंड अनंत कल्पानुकल्प
ऊर्ध्वगामी ॥
ही भव्य सौंदर्याची मूर्ती
ही अहिंसा-यागाची कीर्ती
ही अलोट त्यागाची पहिली भरती
अद्यापि नोसरेजी ॥

कन्नड महाकवी
द. रा. बेन्द्रे

जैन शास्त्राप्रमाणे जैनांचे प्रथम तीर्थंकर भगवान आदिनाथ (ऋषभदेव) यांचे चिरंजीव भरत हे अयोध्येचा राज्यकारभार पाहत होते, त्याचवेळी त्यांचे कनिष्ठ बंधू बाहुबली पोदनपुरीचा राज्यकारभार पाहत होते. पूर्वसंचित पुण्याईने भरतेश यांच्या आयुधशाळेत चक्ररत्न व दंडरत्न प्रगट झाले. त्यांच्या कार्यपूर्तीकरता भरतेश दिग्विजयास निघाले. दिग्विजय करून ते परत आले तरीही चक्ररत्न अयोध्यानगरीत प्रवेश करेना. तेव्हा पोदनपूरचे महाराज बाहुबली यांच्याकडे खास दूताकरवी संदेश पाठविला व आपले मांडलिकत्व पत्करण्यास सुचविले. महाराज बाहुबली यांना ही गोष्ट मनोमन खटकली. त्यांनी नकार दिला. अर्थातच युद्धाला तोंड फुटले... दोन्हीकडील सैन्य तळ ठोकून सुसज्ज झाले. परंतु राजाधिराज भरतेश्वर तद्वतच महाराज बाहुबली यांच्या संस्कारक्षम, अहिंसक मनाला बंधुबंधूतील कलहीं करता लाखो लोकांचे रक्त सांडणे न रुचल्यामुळे त्यांनी एकमेकास द्वंद्व युद्धाचे आव्हान केले. महाराज बाहुबली राजाधिराज भरतेश यांच्यात जलयुद्ध, दृष्टीयुद्ध व मुष्टीयुद्ध अशी तिन्ही प्रकारची युद्धे होऊन त्यामध्ये महाराज बाहुबलींचाच विजय झाला. त्यायोगे चिडून गेलेल्या भरतानी चक्ररत्नास बाहुबलीवर सोडले. परंतु ते चक्ररत्न आप्तस्वकीयांवर चालत नसल्यामुळे महाराज बाहुबली यांच्या डोक्याभोवती तीन प्रदक्षिणा घालून स्थिर झाले. त्याचवेळी बाहुबलींचे मन संसारातून विरक्त झाले आणि संसाराचा त्याग करून कठीण तपश्चर्या करण्यास ते वनात निघाले. पोदनपूरच्या दाट अरण्यात त्यांनी बारा वर्षे अन्नपाण्यावाचून कठीण तपश्चर्या केली. पायाशी वाढणारी वारुळे, अंगावर चढलेल्या लतावेली यामुळे सुद्धा त्यांच्या तपश्चर्येत खंड पडला नाही. तरीही हृदयाच्या गाभाऱ्यात अहंकार रुतून बसला होता व म्हणून त्यांना केवलज्ञान प्राप्त होत नव्हते. याची जाणीव राजाधिराज भरत यांना होताच ते स्वत: आपल्या दोन्ही भगिनी ब्राह्मी व सुंदरी यांच्यासह अरण्यात गेले व महाराज बाहुबलींच्या चरणी नम्र होऊन त्यांनी निवेदन केले की, 'हे तपस्वीन्, या धरणीवर कोणीही स्वत:चा अधिकार गाजवू शकत नाही. तू तपश्चर्या करीत आहेस ती भूमी ज्याप्रमाणे तुझी नाही तद्वतच ती माझीही नाही.' या शब्दांनी मनातील शल्य नाहीसे होताच बाहुबलींना केवलज्ञान प्राप्त झाले.

जैन धर्मशास्त्राप्रमाणे वर्तमान युगातील ते प्रथम मोक्षगामी असल्याने त्यांना 'भगवान बाहुबली' ही संज्ञा प्राप्त झाली.

काळ लोटत होता आणि भगवान बाहुबलींच्या-बद्दल अनेक आख्यायिका प्रचलित होत होत्या. असे म्हणतात की, भगवान बाहुबलींच्या तपश्चर्येने प्रभावित होऊन भरतेश्वराने त्यांची एक अतिभव्य अशी सुवर्ण प्रतिमा बनवून ती पोदनपूरच्या पावन भूमीवर प्रतिष्ठापित केली. कालांतराने पोदनपूर हे घनदाट जंगल झाल्याने मानवास त्या प्रतिमेचे दर्शन दुर्लभ झाले. पुढे कर्नाटकाचे (म्हैसुर) गंगवंशीय राजे 'राचमल' यांचे पराक्रमी महामंत्री चामुंडराय यांच्या मातोश्रीने त्या सुवर्णप्रतिमेच्या दर्शनाची मनीषा चामुंडरायापाशी व्यक्त केली. मातृभक्त चामुंडराय आपल्या लवाजम्यासह पोदनपुरी निघाले. अनेक दिवसांच्या कष्टप्रद यात्रेनंतर त्यांचा मुक्काम श्रमणबेळगोळ (श्रवणबेळगोळ) येथे पडला असता चामुंडरायाची मातृनिष्ठा व भक्ती यांनी प्रभावित झालेली ग्रामदेवता कुष्मांडिनी या देवींनी चामुंडरायाच्या स्वप्नात येऊन सांगितले की, 'हे भव्य जीवा, पोदनपुरातील मूर्तीपर्यंत मानवास जाणे शक्य नसल्याने तू तो ध्यास सोडून दे. पण भगवान बाहुबलींचे दर्शन तुला याच स्थळी होईल. उदईक प्रात:काली शूचिर्भुत होऊन या छोट्या पर्वतावरून समोर दिसणाऱ्या मोठ्या पर्वताच्या शिखरावर बाण सोड म्हणजे तुला भगवान बाहुबलींचे मनोज्ञ दर्शन होईल.' स्वप्नातील घटनेची प्रचिती पाहण्यासाठी चामुंडरायाने सकाळी स्नानसंध्या, पूजाविधी उरकून देवीने सुचविल्याप्रमाणे त्या जागी बाण सोडताच पर्वताच्या शिखराचे पाषाण एखाद्या पुष्पपाकळीप्रमाणे विलग झाले व भगवान बाहुबलींच्या अतिभव्य कायोत्सर्ग भावातील मूर्तीचे मनोज्ञ दर्शन चामुंडराय व त्यांच्या मातोश्री यांना झाले. भक्तिभावाने मूर्तीस नमन करून चामुंडरायाने मोठ्या समारंभपूर्वक मूर्तीची प्रतिष्ठापना करवली. आणि तेथे शिलालेख खोदविला. 'श्री चामुंडराये करवियले...' मराठीतील हा आद्यतम शिलालेख मानला जातो.

या गोष्टीस १३ मार्च १९८१ रोजी सहस्र वर्षे पूर्ण होतात; म्हणूनच यावर्षी २२ फेब्रुवारी ते १८ मार्च पर्यंत ५७ फूट उंचीच्या या अतिभव्य मूर्तीचा महामस्तकाभिषेक सोहळा अखिल भारतीय दिगंबर जैन समाज, केंद्र सरकार व कर्नाटक राज्य सरकार यांच्या सहकार्याने अत्यंत भव्य प्रमाणावर उत्साहाने साजरा झाला. सदरच्या सहस्राब्दी महामस्तकाभिषेक सोहळचासाठी हजारो परकीय पर्यटक उपस्थित होते. कमीतकमी पंधरा लाख भाविक जमतील अशी अपेक्षा होती व त्यादृष्टीने श्रवणबेळगोळ येथे सर्व व्यवस्था करण्यात आली होती. या सोहळयाच्या निमित्ताने भारत सरकारच्या पोस्टखात्याने भगवान बाहुबलींचे चित्र असलेले खास तिकीट छापले आहे. सदरच्या अभिषेकाकरिता एका भव्य अशा मंगल कलशाचे प्रसारण प्रधानमंत्री श्रीमती इंदिराजी गांधी यांनी २९ सप्टेंबर १९८० रोजी दिल्लीतील लालकिल्ल्यामधून एका सुशोभित रथातून केले. हा मंगलकलश भारतातील १६७ प्रमुख मोठी नगरे फिरून २० फेब्रुवारी १९८१ रोजी श्रवणबेळगोळला पोहोचला. हा सहस्राब्दी महामस्तकाभिषेकाचा सोहळा भट्टारक चारुकीर्तीजी स्वामी व जैनमुनी एलाचार्य विद्यानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांनी भारतीय जनतेतर्फे हवाईरथातून भगवान बाहुबली यांच्या अतिभव्य अशा मूर्तीवर पुष्पवृष्टी केली. ही ५७ फूट उंचीची अखंड पाषाणातील प्रतिमा जगातील एक 'आश्चर्य' म्हणून गणली जाते.

●●●



वैराण माळरानावर जर समाजाने परित्यक्त केलेला, तुच्छ लेखलेला माणूस, हातापायांचे खंडहर झालेला माणूस नवे जीवन उभारू शकतो, जीवनात नवा जोश, उमंग तो आणत असतो, तर हे तरुण धट्टेकट्टे हात असे का करू शकत नाहीत ? का म्हणून ह्या तरुणाईला काही करता येत नाही ? रोगी शरीरात मी अतीव निरोगी मनाचा आविष्कार पाहिला. मग निरोगी शरीरात खूप रोगट मन का पाहावयास मिळावे ?

बाबा आमटे

# संपूर्ण क्रांतीची आवश्यकता

अशोक गायकवाड
एस्. वाय्. बी. कॉम

आज आपण आपल्या देशाच्या परिस्थितीकडे बारकाईने नजर टाकली असता आपणास असे दिसेल की शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय या सर्व क्षेत्रांत प्रचंड गोंधळ आहे. या सर्व क्षेत्रांत सध्याच्या परिस्थितीत असणारा गोंधळ व त्यात कोणते अपेक्षित बदल घडून यावेत व हे बदल घडून येण्यासाठी आपल्याला कोणते उपाय योजता येतील यासंबंधाने माझे काही विचार प्रस्तुत लेखात मांडणार आहे.

शैक्षणिक क्षेत्राचा विचार करीत असताना आपणास असे दिसते की या क्षेत्रातून जे निर्माण व्हायला हवे किंवा जे फलित मिळावे अशी किमान अपेक्षा आहे, तेही मिळत नाही, हे दुर्भाग्य आहे. वास्तविक पाहता या क्षेत्राला देशाच्या संपूर्ण रचनेत महत्त्वाचे स्थान आहे. याच क्षेत्रातून नवीन तरुण पिढी उदयाला येणार असते व पुढे देश घडविण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडणार असते. त्या पिढीला जे ज्ञान या क्षेत्रात मिळणे आवश्यक आहे ते पुरेसे ज्ञानही या ठिकाणी मिळत नाही. जे संस्कार बाल मनावर किंवा तरुण मनावर होणे आवश्यक आहेत ते होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. या सर्व परिस्थितीत आणखी भर म्हणजे सदोष शिक्षणपद्धती. त्यामुळे या चाकोरीतून बाहेर आलेला तरुण हा काही संस्काराशिवाय, नीतिमूल्ये घेतल्याशिवाय बाहेर येतो. त्याला देशापुढील सामाजिक प्रश्न महत्त्वाचे वाटत नाहीत. त्याला हवी असते लगेच नोकरी व नोकरी नाही मिळाली की पश्चात्ताप. परंतु या तरुणाच्या मनात असा विचार येत नाही की, देशाकडून नोकरीची अपेक्षा करीत असताना मी देशासाठी काय केले ? याच तरुणाला पुढे मोठ्या हुंड्याची अपेक्षा असते. पण पडेल ते कष्ट करण्याची तयारी नसते.

आज समाजामध्ये चौफेर नजर टाकली असता असे दिसते की आमचा समाज हा चारित्र्यहीन होत चालला आहे. प्रामाणिकपणा, निष्ठा, सचोटी, देशभक्ती यांचा कुठे पत्ता लागत नाही. देशाच्या कुठल्याही क्षेत्रात आपल्याला भ्रष्टाचार, लाचलुचपत, स्वार्थीपणा दिसत नाही असे उदाहरण सापडणे मुष्किल होऊन बसले आहे. समाजाला योग्य मार्गावर आणणारी अनेक माध्यमे असतात. परंतु आज ही सर्व माध्यमे लुळी पडली आहेत. त्याचा योग्य प्रभाव राहिलेला नाही. सिनेमा-नाटकांचा विकृत परिणाम समाजावर झालेला दिसून येतो.

आज आपणाला धार्मिक क्षेत्रामध्येही भ्रष्टाचार, लाचलुचपत आढळते. देवाच्या दर्शनासाठीही लाच स्वीकारली जाते. अधिक पैसे दिल्यास देवळात पुढे प्रवेश मिळतो. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात भाविक जनतेची कशी पिळवणूक केली जाते, हे नव्याने सांगण्याची अवश्यकता नाही. समाजातील बऱ्याच मोठ्या वर्गाला आज ईश्वरी शक्तीचा विसर पडलेला दिसतो. आपली कौटुंबिक व्यवस्था ढासळलेली दिसते. घरात मुलगा आईचे मुलगी वडिलांचे ऐकत नाही. एकमेकांच्यात सतत चकमकी चालतात. काही नरपशू काही क्षुल्लक कारणांवरूनही माता-पित्यांचा घात करावयास कमी करीत नाहीत आईचा मुलाने खून केल्याचे आपण पेपरमध्ये वाचतो. हृदय हेलावून जाते.

सर्व गोष्टींचा अतिरेक आपणाला कोठे पाहावयास मिळत असेल तर तो आपल्या भारतीय राजकारणात. आमच्या राजकारणी नेत्यांना समाजाचा प्रश्न महत्त्वाचा वाटत नसतोच. त्यांना साधायचा असतो तो त्यांचा वैयक्तिक स्वार्थ. त्यासाठी ते समाजसेवेची, समाजउद्धाराची झूल अंगावर घेऊन देशभक्त म्हणून हिंडत असतात. आमच्या राजकारण्यांच्या निष्ठा एका ठिकाणी कधी स्थिर राहत नाहीत. राजकारणी माणसाला वैयक्तिक प्रतिष्ठा व आपला बँक बॅलन्स याचीच जास्त चिंता असते. असे स्वार्थी राजकारणी हे गरीब जनतेचे काय कल्याण करणार ?



वरील सर्व गोष्टींवरून आपणाला एक निश्चित गोष्ट समजते ती म्हणजे मनुष्याच्या स्वभावामध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे, समाजामध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. त्यासाठी संपूर्ण क्रांती होणे आवश्यक आहे. जयप्रकाजींच्या मते आमूलाग्र सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक परिवर्तन व्हायला हवे आहे. आजच्या समाजातील वाईट गोष्टी नाहीशा होऊन अगदी वेगळा असा नवा समाज यातून निर्माण व्हायला हवा आहे. संपूर्ण क्रांतीचा अर्थ आहे समाजामध्ये परिवर्तन ! समाजातील चालीरीतींचे परिवर्तन. समाजातील एखादे अंग बदलायचे आणि बाकी सारे शरीर तसेच सडत कुजत ठेवायचे आणि पुढे जायचे असे होऊ शकणार नाही. ते बदललेले अंगसुद्धा सडल्याशिवाय राहणार नाही. यासाठी संपूर्ण समाजाचे सारे शरीर बदलायचे आहे. त्याचा आत्माही बदलायचा आहे. जोपर्यंत समाजाची आतून तयारी होत नाही तोपर्यंत क्रांती होत नाही. क्रांतिशास्त्राचा एक स्वयंसिद्ध सिद्धांत आहे की जुनी समाजरचना आतून पोखरून जर्जर होऊन जाते तेव्हा परिस्थिती परिपक्व बनते आणि क्रांती घडून येते. एका विशिष्ट मर्यादेच्या बाहेर जेव्हा समस्या वाढत जातात तेव्हा त्या घातक बनतात. कार्ल मार्क्सने सांगून ठेवले आहे की Quantity change in to Quality –समस्यांच्या संख्येचा अतिरेक परिस्थितीमध्ये गुणात्मक बदल घडवून आणतो. आजच्या परिस्थितीतून वाट काढण्यासाठी प्रथम राजकीय पक्षांच्या संकुचित मतवाल्यांच्या संकीर्ण तटबंदीमधून बाहेर पडले पाहिजे. आम्ही जुन्या चांगल्या गोष्टींचा अवश्यमेव स्वीकार केला पाहिजे. पण वाईट आहेत त्या गोष्टी सोडल्याच पाहिजेत.

आमूलाग्र बदल घडून येण्यासाठी सर्व क्षेत्रांत नैतिकता, प्रामाणिकपणा, निष्ठा, त्याग, सचोटी यांचा कस लागण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीवर नित्य योग्य ते संस्कार होणे आवश्यक आहे. बालकापासून वृद्धापर्यंत सर्वांनीच यात भाग घेणे आवश्यक आहे. आदर्श नागरिक, निष्ठावान नागरिक, देशभक्त नागरिक हा केवळ संस्कारातूनच निर्माण होऊ शकतो. शारीरिक गरजा भागविणे हेच केवळ देशापुढील उद्दिष्ट असत नाही. केवळ भौतिकवादावर आधारित समाजात कधीही सुख नांदू शकत नाही. आज अमेरिकेमधील नागरिकांच्या सर्व भौतिक गरजा प्रायः पूर्ण होतात. अशा समाजातही सुख दिसत नाही. सर्वत्र विपुलता असूनही तेथे आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे. कारण तेथील माणूस केवळ भोग्य वस्तूच्याच पाठीमागे धावतो. माणसाच्या मनाची तेथे कोणी काळजी करीत नाही. मनःशांती नाही म्हणून तेथील लोक मोठ्या उत्सुकतेने आमच्या देशात येतात, आमच्या संस्कृतीचा अभ्यास करतात व आपल्या देशातही तसे घडवण्यासाठी प्रयत्नशील असतात. परंतु आपणाला मात्र आपल्याजवळ असणाऱ्या वैशिष्टयांचा विसर पडलेला दिसतो. आपण मात्र पाश्चात्य पद्धतींचा वापर करण्याचा अट्टाहास करतो; ही दुर्भाग्याची गोष्ट आहे. आपली संस्कृती केवळ भौतिकतेवर आधारित नाही. आपण शरीराबरोबरच मनाचीही काळजी घेतो. म्हणूनच आजच्या कठीण परिस्थितीत मनावर आदर्श नीतिमूल्यांचे नित्य संस्कार होणे आवश्यक आहे. त्याच वेळी समाजात समाधान नांदू शकेल. असा सु-संस्कारित समाजच देशाचे भविष्य उज्ज्वल करू शकतो. नित्य संस्कार करणाऱ्या संघटना नव्याने उदयाला आल्या पाहिजेत व सध्या अस्तित्वात असणाऱ्या अशा प्रकारच्या संघटनांची खूप वाढ होणे आवश्यक आहे. त्यामुळेच माणसाच्या मनात क्रांती होणार आहे. समाजात क्रांती होणार आहे– जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतीचे स्वप्न तेव्हाच साकार होणार आहे.

●●●

## दृष्टिभेद

मनुष्याने गुलाबाला म्हटले, तुझ्यात फक्त फूलच असते आणि काटे नसते तर ?
मग समुद्राला म्हटले, तुझं विशाल समृद्ध पाणी खारं नसतं तर ?
मग तो कोकिळेला म्हणाला, तुझा रंग काळा नसता तर किती सुंदर दिसली असतीस !
शेवटी चंद्राला तो म्हणाला, तुझ्या शांत–शीतल रूपावर काळे डाग नसते तर ?
गुलाब, समुद्र, कोकीळ, चंद्र हे मनुष्याला म्हणाले, तुझ्यात दृष्टिभेद नसता तर ?

व्ही. ए. क्षीरसागर १२ वी (वाणिज्य)

## मद्यपी

जीवनमद्य पिणारा
मी तर एक मद्यपी,
नशापाणी करीत आलो
करतो आहे अद्यापी !
जगाच्या या मद्यालयात
चषक आहेत रंगारंगांचे–
काही आशेचे काही निराशेचे
अन् काही सुखदुःखांचे !
वाटचास माझ्या येईल तो
चषक मी घेत असतो;
भरभरून त्यातून नित्य
नूतन मद्य पीत असतो.
कारण ... ... ...
मद्यप्यास मुळी कर्तव्यच नसतं
चषकामारख्या मद्याशी,
असतं ते फक्त त्यातील
काव्यमय मद्याशी !
काचेचेच चषक ते !
केवळ दिखाऊच असतात;
निमित्त मात्र होऊन काही
क्षणभरात फुटून जातात !
म्हणून काही–, खरे मद्यपी
मद्यानंदास मुकत नसतात;
मिळेल त्या चषकामधून
पुरेपूर लुटत असतात !

●●●

प्रमोद दि. वडगावकर
एस्. वाय्. बी. ए.

## जीवन मार्ग

प्रत्येकाच्या पाठीवर
स्वतःचे ओझे असते
वाटेत थकवा आला तरी
घ्यायला दुसरे कोणीच नसते.
जीवनाचा मार्ग शोधण्यासाठी
स्वतःलाच भटकावे लागते
मार्गच सापडला नाही तर
दाखवायला कोणीही येत नसते.
जीवनाचे ध्येय गाठण्यासाठी
प्रत्येकाला धावायचे असते
आणि ते सापडल्याशिवाय
मध्ये कोठेच थांबायचे नसते.
एकटयाला भीती वाटत असते
तरीही पुढे जायचेच असते
पाऊल थकले त्राण संपले
तरीही चालत रहायचे असते
तरीही चालत रहायचे असते.

●●●

पी. ए. बंडगर
एफ्. वाय्. बी. कॉम्.



# कविता

## ‘डिसेक्शन’

बायॉलॉजीच्या लॅबोरेटरीत
असंख्य जीव हेलकावे घेतात...
क्लोरोफॉर्मच्या वासात
धुंद होऊन पडलेली असतात
त्यांची अर्धमृत शरीरं–
ज्यावर घडणार असतंय अनेकांचं जीवन...
मरणाच्या दरीत कोसळतात धाड्कन
निरागस, निष्पाप असंख्य जीव
भतकाळ विसरून–
अनेकांच्या भविष्याचा पाया रोवीत...
‘ Pindrop Silence ’
जणू त्यांच्या आत्म्यांना श्रद्धांजली वाहतात
हे चालते-बोलते जिवंत देह !
खणण्ऽऽ बेल वाजते, शांतताभंग होतो
आणि तीन तास मृतदेहांशी
कापाकापी करणारे गुदमरलेले जीव
‘लॅब’च्या बाहेर पडतात
आपल्याच भविष्याचा विचार करीत...

●●●

उज्ज्वला मुथा
एस्. वाय्. बी. एस्सी.

## तू एकटाच

दूर दूर पसरणाऱ्या काटेरी वाटेवर
आसवांची फुले अंथरून
तू एकटाच चालत जा
भीतीने लपेटून जाताना
आपल्याच छातीतल्या आत्म्यास
न भिता साद देत जा
आणि सूर्य अस्तास जाताना
पिवळे मोती विसरू नकोस
मात्र अंधारल्या डोहात बुडताना
निळे डोळे मिटू नकोस

●●●

मिराज मुलाणी
टी. वाय्. बी. ए.

## एका हळव्या संध्याकाळी

जाता वाऱ्याच्या वेगाने
त्या फसव्या वळणाच्या वाटे;
अवचित येऊन दृष्टिपथामधी
ती कनकांगी मजला भेटे.
बावरलो मी पाहून तेव्हा
तसल्या दैवी लावण्याला;
परी हरवली होती कोठे
ती कमला यौवनबाला ?
स्मित करता पाहुनिया मजला
झणी उलगडला मोरपिसारा;
–एका हळव्या संध्याकाळी
श्रावणस्पर्शे भिजला वारा !

●●●

दिलीप ज्ञानेश्वर पांढरपट्टे
टी. वाय्. बी. एस्सी.

## पौर्णिमा

चांदण्यात...? छे !
प्रणयात न्हात होती
विरहार्त ती धरती !
प्रेमरस वर्षवीत होता
प्रेमस्निग्ध चंद्रमा तिजवरती !
अजुनी स्मरते अती
स्वप्नरम्य पौर्णिमा ती–
होतास चंद्र तू अन्
होते मी धरती !

●●●

प्रमोद दि. वडगावकर
एस्. वाय्. बी. ए.

## शपथ वाहतो

शपथ वाहतो
जीवनाच्या प्रभातकाळी
सर्व काही शिकण्याची
शिकून लक्षात ठेवण्याची
पण लवकरच विसरतो
सर्व काही, शपथेसह
शपथ वाहतो
जीवनाच्या दुपारी
स्वप्नमयी जग खरे करण्याची
त्यातच जीवनघडी बसविण्याची
पण,
जीवनाचं एकही टोक हाती लागत नाही
घडीही बसत नाही
सर्व तेथेच संपते, शपथेसह
शपथ वाहतो
जीवनाच्या सायंकाळी
अंधुक प्रकाशातील सांजवातीकडे पाहून
भूतकालीन स्मृतीत अडकून
नवं काही निर्मिण्याची
जुन्यात सुधारणा करण्याची
पण काहीच जमत नाही
कारण,
'मी'देखील संपत आलेलो असतो
सर्वासह

●●●

दिलीप पाठक
एस्. वाय्. बी. कॉम्.

## नव्या युगाची नवी वाट ही

नव्या युगाची नवी वाट ही
निघते पिचत पडलेल्या झोपड्यांतून
चक्काचूर करण्या
गुलाबी धुंदीतील गगनचुंबी इमारती
आणि बुजविण्या
विषमतेची खोल दरी.
नव्या युगाची नवी वाट ही
नवचैतन्याची घेऊन धगधगती मशाल
जाते सामोरी श्रमास
करण्या 'सुजलाम् सुफलाम्' देश विशाल
नव्या युगाची नवी वाट ही
तोडून मोडून टाकण्या सळसळते
मानव-निर्मित अनंत जाती
'एक गाव-एक पाणवठा' ची हाक देते.
हाय् ! आजचा युवक मनातच पिचला
क्षणभंगुर प्रेमाच्या मोहात अडकुन पडला
अंधळचा स्वार्थात स्वैर भोगात गुंतुन राहिला
नव्या युगाची नवी वाट विसरून गेला.

●●●

दादाराम रघुनाथ सायकर
एस्. वाय्. बी. एस्सी.



## आठवण

चाळीत वाढलो, गल्लीत खेळलो
वारा पाऊस वगैरे शोधीत राहिलो,
ढगावर बसून राजा बनलो,
शाळेत गेल्यावर विद्यार्थी झालो
एकदा गुरुजी
वेडयाची गोष्ट सांगत होते
शिव्या देणे, दगड मारणे वगैरे वगैरे
ऐकून हे सारे अनावर मी हसलो
तशी गुरुजींनी भडकावली
रागातच उठलो
तोपर्यंत दुसरी ठेवून दिली
तसा मग शांत झालो
फाटकी विजार वर ओढून
खाली बसत बसत विझून गेलो
त्यानंतर कधी रागावलोच नाही
शपथ ! अगदी आजपर्यंत

●●●

एम्. टी. शेंडगे
एस्. वाय्. बी. ए.

## स्पर्श

स्पर्शात काय आहे ? स्पर्शात काय नाही ?
स्पर्शात आग पेटे, स्पर्शात चांदण्याही
प्रेमात रंगलेली स्पर्शात ऊब आहे
स्पर्शात पेट घेती थंडावले ऋतूही ॥१॥
स्पर्शात धुंदी आहे, स्पर्शात बंदी आहे
स्पर्शात कैफ दाटे, मद्यातली नशाही
स्पर्शात मोह आहे, स्पर्शात आई आहे
स्पर्शात गुंग होती, जाग्या दिशाही दाही ॥२॥
स्पर्शात भूल आहे, स्पर्शात भान आहे
स्पर्शात मूर्त होती अदृश्य जाणिवाही
स्पर्शात मौन आहे स्पर्शात सर्व भाषा
स्पर्शात ब्रह्म-माया, स्पर्शात सर्व काही ॥३॥

●●●

दत्तात्रय घोंबरकर
टी. वाय्. बी. ए.

## असा मी...कसा मी

विचारांच्या जाळ्यात
कल्पनांच्या मळ्यात
भरकटत जातो कसा
माझे मलाच कळेना.
स्वप्नांच्या दुनियेत
निसर्गाच्या गारुडात
तल्लीन होतो मी कसा
माझे मलाच कळे ना
एकांतात उगाच लटपटतो
मनातल्या मनात होलपटतो
विचारांच्या तंद्रीत सटपटतो
भावनांच्या भोवऱ्यात गरगरतो
कोण मी कुठे मी
जगात अन् मनात
असा मी कसा मी
माझे मलाच कळेना

●●●

प्रभाकर शांताराम खडके
टी. वाय्. बी. कॉम्.

## एकदा तू आली होतीस !

एकदा तू आली होतीस
ओंजळीमध्ये फुलं घेऊन
आयुष्यातील प्रत्येक क्षण
सुगंधित करण्यासाठी...
एकदा तू आली होतीस
ओठांमध्ये हसू घेऊन
मोत्यांच्या दाण्यांची
मुक्त उधळण करण्यासाठी...
एकदा तू आली होतीस
उष्ण अश्रूंचा थेंब घेऊन
माझ्या साऱ्या व्यथा-वेदना
विरघळवून टाकण्यासाठी...

●●●

एन्. डी. शेंडगे
एम्. ए.

# शिक्षा क्षेत्र में हिन्दी का स्थान

हमारे भारत देश की राष्ट्रभाषा हिन्दी है। यह भाषा काफी पुरानी है। आम तौर पर भारत के बहुत सारे लोग हिन्दी अच्छी तरह जानते हैं। विभिन्न भाषाओं के लोगों में परस्पर विनिमय की यह भाषा है। इसीलिए हिन्दी को राष्ट्रभाषा का पद प्राप्त हुआ है। राष्ट्रभाषा हिन्दी का प्रचार शिक्षा के माध्यमसे ही सम्भव है। किन्तु दुर्भाग्यवश शिक्षा के क्षेत्र में हिन्दी की घोरतम उपेक्षा हो रही है।

भारत की वर्तमान शिक्षा प्रणाली में त्रिभाषा सूत्र को अपनाया है। त्रिभाषा सूत्र में मातृभाषा के रूप में मराठी को, राष्ट्रभाषा के रूप में हिन्दी को तथा आन्तर-राष्ट्रीय भाषा के रूप में अंग्रेजी को स्वीकारा गया है। वास्तव में त्रिभाषा सूत्र के अनुसार उपर्युक्त तीनों भाषाओं को समान स्थान प्राप्त होना चाहिए, परन्तु प्रत्यक्षतः अन्य दो भाषाओं की अपेक्षा हिन्दी का स्थान अत्यन्त गौण है। यही हिन्दी की सब से बडी त्रासदी है। वास्तव में आज की सिक्षा-प्रणाली हिन्दी के लिए मानो अभिशाप बन गयी है।

महाराष्ट्र में हिन्दी का अध्यापन माध्यमिक शिक्षा के स्तर से आरम्भ होता है। परन्तु वहाँ भी हिन्दी की उपेक्षा ही होती हुई नजर आती है। किसी भी माध्यमिक विद्यालय की समय-सारिणी इस वस्तुस्थिति की गवाही दे सकती है। उसमें हिन्दी के लिए उचित स्थान नही दिया गया है। हिन्दी के लिए तासिकाएँ बहुत कम होने से हिन्दी का स्थान नगण्य-सा होता जा रहा है। तासिकाएँ कम होने से हिन्दी के अध्यापकों पर विपत्तियाँ आयी हैं। वस्तुतः हिन्दी उपेक्षणीय भाषा नहीं, वरन् अपेक्षणीय भाषा है। माध्यमिक शिक्षा में हिन्दी अध्यापकों को बे-रोजगार होना पडा है। उन अध्यापकों की स्थिति 'धोबी का कुत्ता, न घर का न घाट का' ऐसी हुई है।

दूसरे, कुछ माध्यमिक विद्यालयों में हिन्दी+संस्कृत इस प्रकार का संयुक्त अभ्यासक्रम पढाया जाता है। वहाँ तो हिन्दी की स्थिति और भी भयानक है। संयुक्त अभ्यासक्रम में हिन्दी का प्रश्नपत्र पचास अंकों का और संस्कृत का पचास अंकों का होता है। अंक प्राप्त करने की दृष्टि से संस्कृत सुविधाजनक है। अतः विद्यार्थी और अध्यापक दोनों संस्कृत पर अधिक बल देते हैं और हिन्दी की उपेक्षा करते हैं। परन्तु बाद में विद्यार्थी संस्कृत को भी भूल जाते हैं। इस तरह विद्यार्थियों को न संस्कृत आती और न ही हिन्दी।

उच्च माध्यमिक विद्यालयों में हिन्दी की अवस्था अत्यन्त दयनीय है। वहाँ हिन्दी अनिवार्य विषय नहीं। माध्यमिक विद्यालय में ही विद्यार्थियों के मन में अरुचि की भावना होने के कारण उच्च माध्यमिक विद्यालय में विद्यार्थी हिन्दी विषय छोड अन्य विषय का अध्ययन करना पसन्द करते हैं। कुछ उच्च-माध्यमिक विद्यालय तो ऐसे हैं जहाँ हिन्दी के अध्यापन की सुविधाएँ हैं ही नहीं।

महाविद्यालयों में तो हिन्दी की स्थिति अत्यन्त करुण है। विद्यार्थियों का झुकाव हिन्दी की ओर न होने से वहाँ हिन्दी नगण्य ही है। हिन्दी की वर्तमान अवस्था देख कर विद्यार्थी अगर यह सोचें कि 'हिन्दी पढकर क्या करेंगे?' तो यह अस्वाभाविक नहीं।

शिक्षा के क्षेत्र में हिन्दी की स्थिति देख राष्ट्रभाषा की इस अवस्था पर दया आती है। वास्तव में देश की एकता बनाये रखने के लिए तथा परस्पर सामंजस्य की भावना निर्माण करने के लिए हिन्दी की ओर ध्यान देना अत्यन्त आवश्यक है। इस दिशा में माध्यमिक स्कूलों से ही प्रयत्नों की आवश्यकता है।

•••

**रमेश पिंगळे**
एम्. ए. I (हिन्दी)



# समाजदीप प्रेमचन्द

आधुनिक हिन्दी साहित्य के अध्वर्यु के रूप में प्रेमचन्दजी का नाम सर्वज्ञात है। प्रेमचन्दजी का जन्म निम्न मध्य वर्ग में हुआ था। इसलिए उन्हें इस वर्ग की मनोवृत्ती का ज्ञान अत्यन्त निकटता से था। प्रेमचन्द का असली नाम 'धनपतराय' था। सो पिता ने उन्हें अपनी अतृप्त इच्छा के परिणामस्वरूप 'धनपतराय' नाम की सचाई को वास्तविक रूप में देखना चाहा, पर वे अपनी अतःप्रेरणा तथा प्रकृति के अनुकूल 'प्रेमचन्द' ही बने।

प्रेमचन्दजी ने सम्पत्ति की गुलामी को पराधीनता से भी अधिक माना। अतएव आभूषण लालसा, तथा सम्पत्ति के रोग की व्यापकता पर उन्होंने 'गबन', 'गोदान', 'रंगभूमी' आदि उपन्यासों में तथा 'कफन', 'पूस की रात' जैसी कहानियों में दुःख व्यक्त किया है। उनके कथा-उपन्यासों में पात्रों की केवल वेषभूषा तथा मुख-मुद्रा का चित्रण नहीं तो अपनी परिस्थिति के प्रति अपनी क्रिया-प्रतिक्रियाओं का प्रतिपादन, अन्त-र्भावना का चित्रण है। प्रेमचन्दजी ने अपने उपन्यासों में कहानियों में मध्य वर्ग के कई चित्र खींचे हैं जो आज भी प्रासंगिक हैं।

प्रेमचन्दजी की दृष्टि में साहित्य केवल लेखक की कल्पना या विचार नहीं, तो जीवन की आलोचना करनेवाला, मानव-संस्कार का एक सशक्त अस्त्र है। साहित्य समाजोन्नति में साधक होना चाहिये ऐसा उनका मत था। इसीलिए प्रेमचन्दजी के पात्र कठपुतलियों के समान निर्जीव नहीं हैं। वे अपने आपमें आदर्श हैं। सामान्य जन के प्रतिनिधि हैं। इसीलिए प्रेमचन्दजी को कथा-जगत् मानव को प्रतिष्ठापित करनेका श्रेय दिया जाता हैं। प्रेमचन्द का मत था कि 'मानव के लिए मानव की कहानी से अधिक रुचि का विषय और क्या हो सकता है?' यही कारण है कि प्रेमचन्दजी को पाठकों के मन आकृष्ट करने के लिए कल्पनारम्य अथवा प्रेम कथानकों का सहारा नहीं लेना पडा।

प्रेमचन्दजीने अपने साहित्य में अपने आस-पास के वातावरण का और पात्रों का अत्यन्त सशक्त एवं प्रतीतिकारक चित्रण किया है। इसके पीछे उनकी अपनी अनुभूति थी। प्रेमचन्द स्वयं गरीबी में पले और बडे हुए। इसीलिए उन्होंने अपने साहित्य में मूक गरीब जनता को वाणी प्रदान की।

हिन्दी उपन्यास के जगत् में पात्रों में प्राण फूंकने का सर्वप्रथम श्रेय मुंशी प्रेमचन्दजी को ही है। प्राण यानी उनका भाव जगत् तथा अन्तर्मन की गहराई व स्थिति की सच्चाई! प्रेमचन्दजी के सभी पात्र अपने इस वैशिष्टय के कारण पाठकों से साक्षात् सम्बन्ध स्थापित कर लेते हैं।

मुंशी प्रेमचन्द शोषितों के लेखक हैं। उनके साहित्य की मूल प्रेरणा जनकरुणा की भावना है। उनकी यह भावना समूचे साहित्य में प्रतिबिंबित हुई है। उनके साहित्यिक यशोमन्दिर का कलश 'गोदान' है। वे एक तरफ यथार्थ के सहारे समाज की करुण दशा की, तो दूसरी तरफ दुःखमुक्त आदर्श समाज की झलक पेश करते हैं। यही उनकी सशक्त लेखनी का उपहार है।

•••

**दयानंद मिसाळ**
एस्. वाय्. बी. ए.

## प्रेमचन्द की सूक्तियाँ

- जिससे दूसरों का भला हो वही सच है, जिससे दूसरों का नुकसान हो वही झूठ है।
- आदमी मन में दया बनाये रखे, यही सौ धर्मों का एक धर्म है।
- देवता वह है जो न्याय की रक्षा करें और उसके लिये प्राण दे दे।
- आजकल कानून और धर्म उसका है, जिसके पास पैसा है।
- संसार में रहना है, तो जिंदों की तरह क्यों न रहें। मुर्दों की तरह जीने से क्या फायदा?
- जिसकी आत्मा जितनी ही विशाल है वह उतना ही महापुरुष है।
- भाषा-सुंदरी को कोठरी में बंद करके आप उसका सतीत्व तो बचा सकते हैं, लेकिन उसके जीवन का मूल्य देकर।
- साहित्य की आत्मा आदर्श है, और उसकी देह यथार्थ चित्र।
- जीवन की भिन्न भिन्न अवस्थाओं में भिन्न भिन्न वासनाओं का प्राबल्य रहता है। बचपन मिठाइयों का समय है, बुढापा लोभ का, यौवन प्रेम और लालसाओं का समय है।
- जो मनुष्य कभी पहाड पर नहीं चढा है, उसका सिर छोटे से टीले पर भी चक्कर खाने लगता है।
- आजकल धर्म तो धूर्तों का अड्डा बना हुआ है। इस निर्मल सागर में एक से एक मगरमच्छ पडे हुअे है।
- साहित्य आदमी-आदमी के पास के भेद को मिटाकर उनकी मौलिक एकता को व्यक्त करता है।
- कौम की जबान वह है, जिसे कौम समझे, जिसमें कौम की आत्मा हो, जिसमें कौम के जजबात हो।

संकलन

घोळवे एन्. एम्.
टी. वाय्. बी. ए.

'देख! सभी लोग मेरे लिए पागल हुए हैं! मेरे लिए पार्टी छोड रहे हैं! पैसे बाँट रहे हैं! झूठ बोल रहे हैं! चापलूसी कर रहे हैं! भ्रष्टाचार फैला रहे हैं! खून-खरावा कर रहे हैं! देख! मेरे लिए कैसे पागल हो गये हैं सभी!'

'अरे, इधर उधर क्या देख रही है? मैं, मैं हूँ! मैं, सत्ता की कुर्सी! बहुत हँसी आती है मेरे लिए पगलानेवाले लोगों की! देख! देख, कैसे भाग रहे हैं मेरे लिए!'

मेरी नींद अचानक खुल गयी! तो क्या मैं सपना देख रही थी? हाँ, सपना ही था वह! लोकसभा चुनाव के दिन थे वे! भाषण, नारेबाजी, प्रचार, भ्रष्टाचार आदि पर विचार करते करते ही मुझे नींद आ गयी थी और सत्ता की कुर्सी मेरे सपने में आयी।

मुझे मालूम है कि लोकसभा के लिए चुनाव लडने-वाले बहुरूपी– हाँ बहुरूपी ही हमारी दूकान पर बार बार आते हैं। चुनाव के पहले सभी बहुरूपी ही तो होते हैं! वे सत्वशील और सज्जन मनुष्य बनते हैं। खद्दर के सफेद कपडे पहनकर, चेहरे पर मुसकान और दिल में झूठी आत्मीयता लेकर आते हैं। आते ही हाथ जोडकर पिताजी से कहते हैं, 'देखिए सेठजी, हमें भूलना नहीं!' और खिसियानी सी हंसी हँसते हैं। उनका पिछलगू भी कहता है, 'हाँ सेठजी, अपना वोट तो इन्हें ही देना!'

चुनाव के समय का वातावरण भुलाया नहीं जा सकता। उन दिनों बात उल्टी होती है। चुनाव की घोषणा से पहले हमें सत्ताधारियों के पीछे लगना पडता है, उनके पास याचना करनी पडती है। और अब वे ही हमारे पीछे पडते हैं, हाथ जोडते हैं, सिर झुकाते हैं, मिन्नतें करते हैं।

चुनाव के दिनों में दिनभर घोषणाएँ होती रहती हैं, लाउडस्पीकर राक्षसों की तरह चिल्लाते हैं, धमकियाँ दी जाती हैं, झगडे होते हैं, पैसे बाँटे जाते हैं। गरीब एक एक पैसे के लिए मोहताज होते हैं और नेता हैं कि पानी की तरह पैसा बहाते हैं। और यह सब 'कुर्सी' के लिए! वस्तुतः ईमानदारी हो तो पैसे बाँटने की आवश्यकता ही क्या? वह तो अपनी कार्य-कुशलता और प्रामाणिकता से 'कुर्सी' पा सकता है। परन्तु ऐसी प्रामाणिकता अब रही कहाँ? कुर्सी पाने के लिए इसीलिए तो डराना धमकाना, पैसे बाँटना आदि करना पडता है। हमारी गरीब जनता ऐसी भोली और लाचार कि वह उन पैसों को लेती तो है पर यह नहीं सोचती कि यह महँगाई, भ्रष्टाचार के लिए आमंत्रण है। क्योंकि अब ऐसे देनेवाले बाद में उसके दसगुना वसूलेंगे महँगाई, भ्रष्टाचार बढाकर!

चुनाव के दिन हमारे देश में फूट के दिन होते हैं। पार्टियाँ छोडने के दिन होते हैं। कुर्सी हथियाने के लिए पक्ष खत्म कर दिये जाते हैं। नये पक्ष बनाये जाते हैं। इस पार्टी से उस, और उस पार्टी से इस पार्टी में आना जाना शुरू होता है और अपने इस व्यभिचार का निर्लज्ज समर्थन भी किया जाता है। यह सब होता है 'कुर्सी' पाने के लिए! पर खेद है कि हमारी जनता इसे देखकर भी नहीं समझती। क्योंकि वह अनाडी, अनजान, अनपढ है। इसीका फायदा उठाकर बाघ नेता उसे भ्रमित करते हैं। झूठे आश्वासन देते हैं, आशाएँ दिलाते हैं और हमारी भोली जनता उन्हें 'वोट' का दान देकर कुर्सी पर आरूढ कर देती है। परन्तु कुर्सी पर बैठते ही ये नेता जनता से मुँह मोड लेते हैं और कुर्सी को टिकाने की चिन्ता में मग्न होते हैं। कुर्सी पर बैठते ही नेताओं का प्यार जनता के लिए सूख जाता है, और कुर्सी के लिए उमडने लगता है।

चुनाव के समय निन्दा-रस की नदियाँ बहने लगती है। हर पार्टी बडी उदारता से दूसरे की निन्दा करती है। उस समय गालियाँ देने की स्पर्धा लगी रहती है। एक पार्टी दूसरी पार्टी पर, एक उम्मीदवार दूसरे उम्मीदवार पर गालियों की बौछार करता है। क्योंकि जो अधिक गालियाँ देगा वही जीतेगा और कुर्सी पर बैठेगा न! इस 'पवित्र' कार्य के लिए मोर्चे, सभाएँ, फेरियाँ आदि का आयोजन किया जाता है। अखबारों को खरीदा जाता है। उनसे कहा जाता है, 'तुम हमारा समर्थन करो, हमारी स्तुति करो, विरोधकों की निन्दा करो, फिर हम कुर्सी पर बैठते ही तुम्हें पैसे देंगे, देते रहेंगे।' और फिर हमारे अखबार बडी निष्ठा से गालियाँ देने का पवित्र कार्य लगन से करते हैं।

चुनाव समाप्त होने पर किसीको कुर्सी मिलती है, तब अन्य सभी जन उसकी तरफ लाचारी से वा ईर्ष्या से देखने लगते हैं। उसे कुर्सी के नीचे खींचने का यत्न करने लगते हैं। लेकिन कुर्सीवालों का हाल तो पूछो ही मत। वे कुर्सी से इतना प्यार करने लगते हैं कि उस प्यार के नशे में अपने कर्तव्य को, आम जनता को दिये आश्वासनों को भूल ही जाते हैं। और तब जनता आँखों में आँसू भर कर उनके कुर्सी-प्यार को देखने के सिवा और कुछ नहीं कर सकती।

कुर्सी पर बैठते ही कुर्सीवाले अपनी पिछली बातें अवश्य याद करते हैं। लेकिन योजनाओं, आश्वासनों, वचनों की नहीं, बल्कि चुनाव में गये हुए पैसों की याद करते हैं। उन पैसों को कमाने के लिए ही अपनी सत्ता का उपयोग करते हैं। और तब महँगाई बढती है, भ्रष्टाचार बढता है, रिश्वत की बातें चलती हैं। इस चक्की में जनता पीसने लगती है। सत्ताधारी कुर्सी का उपयोग स्वार्थसाधन के लिए करते हैं। अपने छोटे से सुख के लिए सारे लोगों को दुःख के सागर में डुबाते हैं और कुर्सी में बैठकर निर्लिप्त भाव से जनता की ओर देखते रहते हैं। जनता के लिए कुछ करते नहीं। करते हैं सब खुद के लिए। सत्ताधारियों के पिछलग्गू कुर्सी पर

कु. एम्. एम्. धालपे
एस्. वाय्. बी. ए.

## 'किस्सा कुर्सी का'

बैठनेवाले की रक्षा करते हैं और कुर्सी पर बैठनेवाले अपनी कुर्सी की रक्षा करते हैं ।

कभी कभी मैं सोचती हूँ, कुर्सी पर बैठनेवाले सत्ताधारी को भी सुख की नींद नहीं आती होगी । इन्द्र की तरह उसे भी डर लगता होगा कि कोई मेरी कुर्सी हडप न ले । क्योंकि विरोधी पार्टियाँ सत्ताधारी को कुर्सी से नीचे खींचने का प्रयास करती हैं और सत्ताधारी कुर्सी पर अपना अस्तित्व बनाये रखने का प्रयत्न करते हैं । इस खींचातानी में बुरा हाल होता है बिचारी जनता का । कुर्सीधारियों द्वारा जनता के लिए बडी बडी योजनाएँ अवश्य बनायी जाती हैं, परन्तु प्रामाणिकता से कार्यवाही किसी पर भी नहीं होती । जनता बडी आशा से उनकी ओर देखती है और वे जनता को निराश करते हैं । जिस जनता ने विश्वास से उनके हाथ सत्ता सौंप दी उसी जनता का वे विश्वासघात करते हैं । क्योंकि सभी पार्टियाँ कुर्सी के लिए झगडती रहती हैं ।

इस तरह यह कुर्सी अपने लिए हर एक को घुमाती रहती है । इसके बारे में जितना भी कहूँ, कम ही है । यही वह कुर्सी है जो किसी को आसमान पर चढाती है । कोई इसके लिए पैसों की बरसात करता है । कोई अन्याय करता है । कोई किसी को भूखा मरवाता है । कोई लडता है । कोई झगडता है । कोई लार टपकाता है । कोई पागल बनता है । कोई षड्यन्त्र करता है ।

ऐसा है यह किस्सा कुर्सी का !

●●

---

## ' सर्वात पहिले '

- भारताचे पहिले फील्ड मार्शल — के. माणेकशहा
- भारतीय प्रजासत्ताकाचे पहिले पंतप्रधान — पं. जवाहरलाल नेहरू
- भारतीय घटक राज्याची पहिली स्त्री मुख्यमंत्री — श्रीमती सुचेता कृपलानी (उ. प्रदेश)
- भारताची पहिली स्त्री पंतप्रधान — श्रीमती इंदिरा गांधी
- नोबल पारितोषिकाचा मान मिळविणारा पहिला भारतीय — रवींद्रनाथ टागोर
- भारतीय प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्रपती — डॉ. राजेंद्र प्रसाद
- स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल — लॉर्ड माउंट बॅटन
- स्वतंत्र भारताचे पहिले भारतीय गव्हर्नर — चक्रवर्ती राजगोपालाचारी
- भारतात येणारा पहिला चिनी प्रवासी — फा-हि-एन
- भारताला भेट देणारा अमेरिकेचा पहिला अध्यक्ष — आयसेन हॉवर
- भारतीय वायुदलाचा पहिला मुख्याधिकारी — एअर मार्शल एस्. मुकर्जी
- भारतीय भू-दलाचा पहिला भारतीय मुख्याधिकारी — जनरल के. एम्. करीआप्पा
- भारतीय नौदलाचा पहिला भारतीय मुख्याधिकारी — व्हाईस अॅडमिरल कटारी
- संयुक्त राष्ट्रसंघटनेतील सर्वसाधारण पहिल्या सभेच्या स्त्री अध्यक्षा — श्रीमती विजयालक्ष्मी पंडित
- आय्. सी. एस्. परीक्षेला बसणारा पहिला भारतीय — सत्येंद्रनाथ टागोर
- जागतिक बिलीयर्ड साठी ठेवलेली ढाल जिंकणारा पहिला भारतीय — विल्सन जोन्स

---

घोळवे आर. ए. (एस्. वाय. बी. ए.)

## वक्त ही बताएगा !

चाँद कहता है कि रात है मेरी,
सूरज कहता है कि दिन है मेरा,
सितारे कहते हैं कि आसमाँ है हमारा,
बादल कहता है कि बरसात है मेरी,
समंदर कहता है कि पानी है मेरा,
फूल कहता है कि खुशबू है मेरी,
माँ कहती है कि तू ' लाडला ' है मेरा,
दोस्त कहते हैं कि तू ' यार ' है मेरा,
प्रेमिका कहती है कि तू ' दिलदार ' है मेरा,
खैर, वक्त ही बतायेगा ' कौन है मेरा ?'

●●●

कु. एस्. के. क्षत्री
एस्. वाय्. बी. ए.

## न फिर आवाज देना

एक टूटे दिल की जुबाँ कोई तो सुन ले
न कोई सुने, तो तू सुन ले आसमाँ ।
दर्द में घुटघुट कर हम मर कर जी लें
जरा देख तू, मेरा रोये अरमाँ ॥
गाँव से दूर अकेले सूनेपन में
सोचता रहा-जाते कदमों से ।
तेरी एक हलकी-सी नजर
भुला गीत दे गयी चुपके-से ॥
अनोखा दर्द दिल में उतर आया
सीना चीर कर आँखों में भर आया
कदम कदम पर मैं पीछे देखता रहा
कोयल की आवाज में कोई रोता रहा ॥
पर है मुझे दूर जाना-दूर दूर जाना
इस धरती के उस पार जाना
पनघट पे न फिरसे तुम गाना
दर्दभरे दिल को न फिर आवाज देना ॥

●●●

मिराज मुलाणी
टी. वाय्. बी. ए.

## गजल

मुरझा गयी दिल की कली खिल जाने से पहले ।
उजड गया बाग दिल का बहार आने से पहले ॥
रंग लायी थी महफिल खुशनुमा था समाँ ।
टूट गया साज मगर दर्दे दिल सुनाने से पहले ॥
गलियाँ हैं सूनी सूनी उजडा हुआ है दिल ।
अंजाम न पूछा जहाँ से दिल लगाने से पहले ॥
मैखाने सीधे चल दिये गम दूर करने के लिए ।
टूट गया जाम मगर दो बूँद पीने से पहले ॥
न करना यकीन दुनियावालों पे ' शरीफ ' ये
घाव लगाती है जख्म भर आने से पहले ॥

●●●

आझाद शेख ' शरीफ '
एफ्. वाय्. बी. ए.

## प्यार की खातिर

खुश रहता आया हूँ तुझे देखकर सदियोंसे ।
दिलमें चोट लगती है तुम्हारे रूठ जाने से ।
न करो कोई ऐसा कि मर मिट जायें हम ।
किनारा हो जिंदगी का बस तुम ही तुम ।
अगर करोगी कभी नफरत तुम हमसे ।
समझ लो कि उठ जायेंगे हम इस भरी दुनिया से ।
फिर ना बहाओ आँसू कभी हमारे जाने से ।
न करेगा कोई यारी कभी फिर तुमसे ।

●●●

नितीन जगताप
टी. वाय्. बी. ए.



बैठनेवाले की रक्षा करते हैं और कुर्सी पर बैठनेवाले अपनी कुर्सी की रक्षा करते हैं।

कभी कभी मैं सोचती हूँ, कुर्सी पर बैठनेवाले सत्ताधारी को भी सुख की नींद नहीं आती होगी। इन्द्र की तरह उसे भी डर लगता होगा कि कोई मेरी कुर्सी हडप न ले। क्योंकि विरोधी पार्टियाँ सत्ताधारी को कुर्सी से नीचे खींचने का प्रयास करती हैं और सत्ताधारी कुर्सी पर अपना अस्तित्व बनाये रखने का प्रयत्न करते हैं। इस खींचातानी में बुरा हाल होता है बिचारी जनता का। कुर्सीधारियों द्वारा जनता के लिए बडी बडी योजनाएँ अवश्य बनायी जाती हैं, परन्तु प्रामाणिकता से कार्यवाही किसी पर भी नहीं होती। जनता बडी आशा से उनकी ओर देखती है और वे जनता को निराश करते हैं। जिस जनता ने विश्वास से उनके हाथ सत्ता सौंप दी उसी जनता का वे विश्वासघात करते हैं। क्योंकि सभी पार्टियाँ कुर्सी के लिए झगडती रहती हैं।

इस तरह यह कुर्सी अपने लिए हर एक को घुमाती रहती है। इसके बारे में जितना भी कहूँ, कम ही है। यही वह कुर्सी है जो किसी को आसमान पर चढाती है। कोई इसके लिए पैसों की बरसात करता है। कोई अन्याय करता है। कोई किसी को भूखा मरवाता है। कोई लडता है। कोई झगडता है। कोई लार टपकाता है। कोई पागल बनता है। कोई षड्यन्त्र करता है।

ऐसा है यह किस्सा कुर्सी का!

●●●

## 'सर्वात पहिले'

- भारताचे पहिले फील्ड मार्शल — के. माणेकशहा
- भारतीय प्रजासत्ताकाचे पहिले पंतप्रधान — पं. जवाहरलाल नेहरू
- भारतीय घटक राज्याची पहिली स्त्री मुख्यमंत्री — श्रीमती सुचेता कृपलानी (उ. प्रदेश)
- भारताची पहिली स्त्री पंतप्रधान — श्रीमती इंदिरा गांधी
- नोबल पारितोषिकाचा मान मिळविणारा पहिला भारतीय — रवींद्रनाथ टागोर
- भारतीय प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्रपती — डॉ. राजेंद्र प्रसाद
- स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल — लॉर्ड माउंट बॅटन
- स्वतंत्र भारताचे पहिले भारतीय गव्हर्नर — चक्रवर्ती राजगोपालाचारी
- भारतात येणारा पहिला चिनी प्रवासी — फा-हि-एन्
- भारताला भेट देणारा अमेरिकेचा पहिला अध्यक्ष — आयसेन हॉवर
- भारतीय वायुदलाचा पहिला मुख्याधिकारी — एअर मार्शल एस्. मुकर्जी
- भारतीय भू-दलाचा पहिला भारतीय मुख्याधिकारी — जनरल के. एम्. करीआप्पा
- भारतीय नौदलाचा पहिला भारतीय मुख्याधिकारी — व्हाईस ॲडमिरल कटारी
- संयुक्त राष्ट्रसंघटनेतील सर्वसाधारण पहिल्या सभेच्या स्त्री अध्यक्षा — श्रीमती विजयालक्ष्मी पंडित
- आय्. सी. एस्. परीक्षेला बसणारा पहिला भारतीय — सत्येंद्रनाथ टागोर
- जागतिक बिलीयर्ड साठी ठेवलेली ढाल जिंकणारा पहिला भारतीय — विल्सन जोन्स

घोळवे आर. ए. (एस्. वाय. बी. ए.)

## वक्त ही बताएगा!

चाँद कहता है कि रात है मेरी,
सूरज कहता है कि दिन है मेरा,
सितारे कहते हैं कि आसमाँ है हमारा,
बादल कहता है कि बरसात है मेरी,
समंदर कहता है कि पानी है मेरा,
फूल कहता है कि खुशबू है मेरी,
माँ कहती है कि तू 'लाडला' है मेरा,
दोस्त कहते हैं कि तू 'यार' है मेरा,
प्रेमिका कहती है कि तू 'दिलदार' है मेरा,
खैर, वक्त ही बतायेगा 'कौन है मेरा?'

●●●

कु. एस्. के. खत्री
एस्. वाय्. बी. ए.

## न फिर आवाज देना

एक टूटे दिल की जुबाँ कोई तो सुन ले
न कोई सुने, तो तू सुन ले आसमाँ।
दर्द में घुटघुट कर हम मर कर जी लें
जरा देख तू, मेरा रोये अरमाँ॥

गाँव से दूर अकेले सूनेपन में
सोचता रहा-जाते कदमों से।
तेरी एक हलकी-सी नजर
भुला गीत दे गयी चुपके-से॥

अनोखा दर्द दिल में उतर आया
सीना चीर कर आँखों में भर आया
कदम कदम पर मैं पीछे देखता रहा
कोयल की आवाज में कोई रोता रहा॥

पर है मुझे दूर जाना-दूर दूर जाना
इस धरती के उस पार जाना
पनघट पे न फिरसे तुम गाना
दर्दभरे दिल को न फिर आवाज देना॥

●●●

मिराज मुलाणी
टी. वाय्. बी. ए.

## गजल

मुरझा गयी दिल की कली खिल जाने से पहले।
उजड गया बाग दिल का बहार आने से पहले॥
रंग लायी थी महफिल खुशनुमा था समाँ।
टूट गया साज मगर दर्दे दिल सुनाने से पहले॥
गलियाँ हैं सूनी सूनी उजडा हुआ है दिल।
अंजाम न पूछा जहाँ से दिल लगाने से पहले॥
मैखाने सीधे चल दिये गम दूर करने के लिए।
टूट गया जाम मगर दो बूँद पीने से पहले॥
न करना यकीन दुनियावालों पे 'शरीफ' ये
घाव लगाती है जख्म भर आने से पहले॥

●●●

आझाद शेख 'शरीफ'
एफ्. वाय्. बी. ए.

## प्यार की खातिर

खुश रहता आया हूँ तुझे देखकर सदियोंसे।
दिलमें चोट लगती है तुम्हारे रूठ जाने से।
न करो कोई ऐसा कि मर मिट जायें हम।
किनारा हो जिंदगी का बस तुम ही तुम।
अगर करोगी कभी नफरत तुम हमसे।
समझ लो कि उठ जायेंगे हम इस भरी दुनिया से।
फिर ना बहाओ आँसू कभी हमारे जाने से।
न करेगा कोई यारी कभी फिर तुमसे।

●●●

नितीन जगताप
टी. वाय्. बी. ए.



# Rights of Women : A Social Problem

Miss S. K. Khatri
S. Y. B. A.

With the dawn of twentieth century there was some awareness in the Indian woman. She was a slave of customs and blind traditions for centuries together. The Hindu woman was considered as inconsiderate. The Muslim woman was not holding a better position than this. It is very much essential today to take a sympathetic attitude and solve this problem.

Since ancient times the status of a woman was considered a trivial matter. It was her world, delimited by four walls. To take education was thought as a grave crime and she was treated mercilessly. A woman was sold in the open market for money. She had not any sort of security. A man forgets that he comes out of her Womb and she is the real builder of a nation. Gandhiji has rightly pointed out the difference between a man and a woman. He says, 'When a man is educated he himself is educated, but when a woman is educated the whole family is educated.'

A woman was a doll in man's hands and she was compelled to behave as per the desire of a man. If not, she was tortured. In fact, a man and a woman are the two sides of the same coin. Her work was never appreciated. It was the bias of man. A widow was harassed. She found it vary difficult to live. She was no better than an animal. She was a burden to society. So, she was mostly nipped in the bud. Sometimes they used to Sacrifice her than to meet the problem of dowry at the time of her marriage. A man never thought her as a life-partner but as a source of income.

If we take a cursory glance at the western woman we find she is in a little better position. The reason may be that she could get education and maintain herself economically. She is independent, so she never looks for support. The Indian woman has no means to live. It is her poverty that has made her helpless. She has been crushed under the cruel feet of Society. Man has not understood her.

In the beginning of 20th Century, the Indian woman's status improved. She proved that she is not less than a man. If opportunities are available she too can compete with a man. A very significant event took place in the history of the woman in the beginning of this year. Mother Teresa was awarded the Nobel Prize. She is a Christian by birth. She thought of India as the proper place where she could serve the humanity better. She started 'Ashadan' a service centre in a slum area near Calcutta. The Indian Government has conferred on her, the 'Bharat Ratna' and honoured her greatly. Another notable name is Anutai Wagh who worked in the Adivasi area. There is Jyoti Rane who is thought as the first woman who jumped off a parachute. It is an assumption that a woman is frail by nature. But it is from the tyranny of man that the greater number of females are made frail.

Great social reformers like Mahatma Phule, Raja Ram Mohan Roy tried their best to uplift a woman's status. Mahatma Gandhiji strongly advocated the rights of woman. A woman get encouragement and she struggled to change her life. She got education and began to earn her living. There are some uneducated women in history who have rendered great service to the nation. Jijabai gave Shivaji, the great Maratha ruler to the nation. Rousseau thought a woman as artificial and useless. But to me it seems that he is mistaken. It is said that a woman is a fool. But a man is a greater fool because he has made her a fool. A woman is not really a fool. A man is allowed to commit a hundred crimes but a woman is not excused when she errs even once. I will strongly say that a woman should remember it well that she is to be an ideal sister, a wife, a mother and an ideal citizen. But because of the tyranny of man she is made to ignore this. It has been proved by Mrs. Indira Gandhi, the Prime Minister of India, that a woman can lead a nation, successfully in the times of peace as well as crisis. She has set an example that will be remembered for years to come.

There is a little spread of education for women today in India. Only the women in cities are educated. The village woman is still illiterate and is under pressure of blind customs. I do not mean that a woman should earn money by taking education. Finance is one of the essential factors. She must take proper care of her family too.

The Indian woman has got equal constitutional rights but the society is not yet prepared to give them to her. No proper justice is given to her if any injustice is caused. In western countries women are given constitutional protection. There is growth in such offences in India relating to women. It is perhaps of the passive role of the Government.

The 'Mathura-rape case' awakened the government to think of making rigorous provisions in Criminal Procedure Code. The various organisations of women held debates discussions and conferences. The Hon. Supreme Court Justice, Mr. Chandrachud said, 'it is a happy thing that the Indian woman is awakened from long sleep by the 'Mathura-Rape case'.' This tyranny over woman cannot cease by making law and order more powerful. There must be a change in a man's view of looking at a woman.

गजरा उशाला मांडी देऊन आसवं गाळीत बसली होती. शिरपानं जवळ जाऊन आबाला गदगदा हालवलं. 'आबा– आबा' म्हणून हाका मारल्या. क्षणात आबानं डोळं उघाडलं. शिरपाला जवळ घेऊन मायेनं कुरवाळलं. आपलं थंड होत चाललेलं ओठ जडपणानं हालवलं,

'शिरपा !'

शिरपा पागोटयात गुंडाळलेलं पैसं दाखवीत म्हणाला, 'आबा आपण दवाखान्यात जाऊ.

पैसे दिसताच आबाचे डोळे गरगर फिरले. ओठ थरथरू लागले.

क्षणात शिरपाकडं तर क्षणात गजराकडं डोळं फिरवीत... 'शि ..र...पा. ग...ज...रा.' असे म्हणत त्यांनी कायमचे डोळे मिटले.

शिरपा अंग टाकून ओक्साबोक्शी रडू लागला. गजरानं आबाच्या चेहऱ्यावर हात फिरवीत 'मामाजी– मामाजी' अशा हाका मारल्या आणि जोरजोरानं रडू लागली. जमलेल्या बाया माना खाली घालून आसवं गाळू लागल्या. राजूला आणि मनूला आवरणं कठीण झाले.

•••

# सामाजिक विषमता आणि आम्ही

विसाव्या शतकात जगाला श्रमिकांच्या श्रमाची किंमत समजून आली आहे, किंबहुना श्रमाचे योग्य मूल्यमापन केले जात आहे. १५० वर्षांच्या गुलामगिरी-नंतर स्वातंत्र्याचा सूर्य उगवला, अनेकांच्या अपेक्षा सफल झाल्या, कष्टाला किंमत आली, छळ संपला, गुलामगिरीचा अंत झाला तेव्हाच मानवाने मानायला हवे होते की येथून तेथून आम्ही एकच. परंतु असे झाले नाही. तथाकथित पुढाऱ्यांची सत्तालालसा व स्वार्थी वृत्ती यामुळे गुलामगिरी संपली तरी समाजातील विषमता संपली नाही. उलट चार वर्णांबरोबरच आणखी दोन वर्ण समाजात निर्माण झाले ते म्हणजे भांडवलदार आणि मजूर. यामुळे सामाजिक विषमतेत आणखीनच भर पडत गेली. प्राचीन काळी समाजाची रचना चातु-र्वर्णावर आधारलेली होती, ती श्रमविभागणीच्या सोयीसाठी. परंतु अध्ययन–अध्यापन यासारखी बुद्धीची कामे करणाऱ्या ब्राह्मणाने आपले महत्त्व वाढविण्यासाठी अनेक रूढी व समजुती निर्माण केल्या. त्यामुळे सामाजिक विषमता वाढत गेली आणि सध्याच्या युगामध्ये भांडवलदार लोकांनी श्रमजीवी लोकावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रूपाने सत्ता गाजवून, त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, त्यांच्यामधील एकीस सुरुंग लावून, ती विषमता वाढीस लावली. या तथाकथित बुद्धिजीवी लोकांनी सुखविलास आणि चैन करायची; त्यासाठी श्रमजीवी लोकांनी सतत कष्ट करावयाचे आणि मिळेल ती चटणी-भाकरी गोड मानायची, टीचभर पोटासाठी जीवापाड मेहनत करायची, योग्य मोबदला न मिळाल्या-मुळे निवारा व वस्त्र यांची चणचण कायम स्वरूपाची सोसायची, अशी ही सामाजिक विषमतेची दरी ही दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे.

शेतकरी सतत कष्ट करतो, उन्हापावसात थंडी-वाऱ्याची पर्वा न करता दिनरात शेताची राखण करतो, राबतो, शेती पिकवितो, तरी शेवटी त्याला मिळते ती नाचणीची भाकरी, सोबत असली तर चटणी किंवा कोरडा कांदा आणि मीठ. वास्तविक पाहता शेतकऱ्याच्या श्रमामुळे जगाचे नंदनवन बनते. पण आज भारतासारख्या कृषिप्रधान देशातही शेत-कऱ्याला योग्य तो मान मिळत नाही. हिंदुस्थानातील तथाकथित पुढाऱ्यांना, बुद्धिजीवी लोकांना अद्याप शेतकऱ्याची महती पटलेली नाही. आणि नजिकच्या भविष्याच्या काळात यात काही बदल घडून येईल याची आशा करता येत नाही.

सारे जग सुंदर दिसावे, हवा शुद्ध राहावी म्हणून इतरांनी केलेली घाण जे आपल्या डोक्यावरून वाहत राहिले याबद्दल समाजाने त्यांना काय दिले तर 'अस्पृश्य' म्हणून त्यांना समाजापासून दूर ठेवलं. त्यामुळे दलित अस्पृश्य श्रमिक लोकांना 'आपली समाजात किंमत काय ? समाजातील आपले स्थान कोणते ?' या प्रश्नांनी अस्वस्थ केले.

आणि सामाजिक विषमतेचा मानवतेला लागलेला हा कलंक जर वेळीच पुसून काढला नाही तर– तर जगात माणसाला माणुसकीच्या मापानं मोजणारी मोजकी तरी माणसं भविष्यकाळात राहतील की नाही, याची शंका आहे. म्हणून प्रौढ शिक्षण वर्ग, समाज-शिक्षण सेवा, लोकजागृती या कार्यक्रमांवर भर देऊन लोकजागृती करण्याचे कार्य तुम्हां-आम्हांला करावयाचे आहे.

सामाजिक विषमता दूर करण्याचे कार्य आजच्या विद्यार्थ्यांनी यथाशक्ती स्वतःची जबाबदारी ओळखून

कु. शहा एस्. एम्.
१२ वी वाणिज्य

पार पाडण्यास पुढे आले पाहिजे. अनेकदा आपला वेळ गप्पा मारण्यात, निरर्थक गोष्टी करण्यात, चित्रपट पाहण्यात, नाचगाण्यात मश्गुल होण्यात खर्च करण्या-पेक्षा समाजोपयोगी कार्य यथाशक्ती पार पाडल्यास सामाजिक विषमता दूर होण्यास मदत होईल.

देशातील लाखो विद्यार्थ्यांनी दररोज फक्त एक तास समाजोपयोगी कार्याकरिता देण्याचे ठरविल्यास नजिकच्या भविष्यकाळात हिंदुस्थानचे सामाजिक स्वरूप पार बदललेले दिसेल. सामाजिक विषमतेची दरी नष्ट होईल, दलितास आपण दलित आहोत याची जाणीव बोचणार नाही आणि श्रीमंत लोकांकडून दलितांची, श्रमिकांची पिळवणूक होणार नाही आणि समाजातील विषमतेचे खंदक बुजून संघशक्तीला गेलेल्या चिरा भरून विषमता नष्ट करता येईल, तद्वत श्रमिकांनी स्थापलेली संस्था श्रमलक्ष्मीचे मंदिर असेल आणि मानवधर्म हा त्याचा विश्वधर्म असेल. प्रत्येक हिंदुस्था अभिमानाने जगास सांगेल,

'खाटल्यावरी कुणास देणार नाही हरी, श्रमिकां
पाठिशी मात्र उभा गिरीधारी।'

त्याच्या कार्यामध्ये एकसूत्रता येईल, देशाभिमान त्याची मान नेहमी ताठ असेल. स्वतःच्या एकीब संघटनेबद्दल त्याला विश्वास असेल.

'एक अकेला थक जाए, तो मिलकर बोझ उठा
साथी हाथ बढाना।'

या तत्त्वाने तो चालत असेल आणि उद्याचे रा श्रमिकांचे दलितांचे म्हणजेच खऱ्या अर्थाने भार यांचे असेल.

●●

---

## स्वातंत्र्याचे मोल

- प्रफुल्ल गुलाबाचा सुगंध तुम्हांला हवा ना ? मग त्याच्या काट्यांचे हसतमुखाने स्वागत करा. हसऱ्या उषेचे मधुर स्मित तुम्हांला पाहायला पाहिजे ना ? तर मग रात्रीच्या काळोखात प्रहर नि प्रहर तिष्ठत राहण्याची तयारी ठेवा. स्वातंत्र्याच्या आनंदाचा आस्वाद तुम्हांला हवा आहे ना ? मग त्याचे मोल द्यायला तुम्ही सिद्ध झाले पाहिजे. हालअपेष्टा आणि त्याग हे स्वातंत्र्याचे मोल आहे.

## मैत्री

- गोड बोलणारे सारे मित्रच असतात असे नाही; खरा मित्र ओळखणे हीसुद्धा एक कला आहे.
- आपले दोष मित्राला सांगणे हे लक्षण विश्वासाचे, आणि त्याचे दोष त्याला सांगणे हे लक्षण गाढ विश्वासाचे.

## जीवन

- जीवन हा कल्पवृक्ष नाही, आम्रवृक्ष आहे, त्याचा पुष्कळसा मोहर गळून जातो पण त्याची फळे गोडच लागतात.
- फूल आज ना उद्या सुकायचेच असते. मानवी जीवन तसेच आहे. कोमेजून जाईपर्यंत फुलाने सुवास दिला की, त्याच्या जीवनाचे सार्थक झाले.
- मानवी जीवन हे विलक्षण रासायनिक मिश्रण आहे. जीवनातला प्रत्येक उत्कट अनुभव त्याच्या स्वरूपात बदल घडवून आणतो.
- पूजा ही जीवनाचा कळस आहे, त्याचा पाया क्षमा, सहानुभूती व प्रीती.
- जीवनात कला नसेल तर ते जीवन विफल आहे.

स्मिता एस्. बिरबले ११ वी (वाणिज्य)

---



Now-a-days petroleum products are becoming very costly. There is always a shortage of petrol, kerosene, diesel etc.. And oil is not going to last forever. That is why we have to find some other sources of fuel and energy. The best way, scientists so far see today, is the solar energy.

The power of the sun is 99% wasted before it reaches the earth. Scientists can use it by turning it into electricity or even save it for the future.

One way of using the energy of the sun is to make a sun-stove. In this stove, the rays of the sun are caught on a huge, flat piece of a bright metal. From it, they are reflected to another piece of a bright metal which is curved. This directs the sun-rays to a point where they are collected and put to work. This heat is also used to boil water and turn it into steam. The steam is used to operate an engine or produce electricity. Thus the sun-energy can be used to operate machines in a factory.

Another way of using sun-energy to produce electricity has been found it is a Silicon battery. In this device, there is a small metal box filled with impure Silicon. But when sun-rays pass through the box, it becomes pure. This process produces electricity. The same sort of batteries are used in the space satellites.

In cold areas, coal and oil are used to provide heat, power and electricity or light. There, the heat of the sun on bright days may be collected and stored for cold days.

Many experiments to use the solar energy have become successful. Modern sun-stoves have been made which cook food in a few minutes. In Tokyo (Japan), there is a factory which gets its heat and hot water from the sun.

The heat of the sun is also being used for studies of metals. Great heat melts the metal and destroys all other substances. Thus the scientists can study the pure metal. Solar furnace is the best kind of research instrument as it can easily create the temperature necessary for these experiments. One of the first scientists to develop such a solar furnace is Prof. Maria Telkes.

The scientists think that in future the sun will supply power to factories, trains and automobiles. The problem of fuel will be no more. The sun will also increase the water supply of the world. If sea water, changed into fresh water, were carried to the deserts, those deserts could be changed into green farms. The sun will make the world happier !

●●●

**Chaphekar Santosh Raghunath**
11th Science.

## 'The Solar Energy'

## हिवाळ्यातली एक संध्याकाळ

नभमंडपातल्या गुलाबपाण्याचा झणकारत वर्षाव
मोहरलेला निळसर गारवा, गोठलेले गाव.
चिबओल्या परतणाऱ्या गायींचे हंबरणे दुधाळ;
मलूलपणे; दमलेल्या गुराख्यांबरोबर रांगत
येणारे धुके
हिवाळ्यातली एक संध्याकाळ...

झाकोळले आकाश. अभ्रट गवसणी.
निस्तेज कलत्या सूर्याची तांबूस झरणी.
गोठलेली पावले रस्ते ओसाड,
काळपट छटेने चमकणारे स्तब्ध भारले झाड.
हिवाळ्यातली एक संध्याकाळ...

बुजल्या वाटा... धूसर माळ...
बहुधा... गारव्यानेच...
डोळा आसवला असेल... की...
नुकत्याच हरवलेल्याच्या आठवणींचे मनात...
तरंग... फेसाळ ?
हिवाळ्यातली एक संध्याकाळ...

●●●

राजेश आचार्य (१२ वी, शास्त्र)

## बदल

निस्तेज अग्निगोलाच्या पिंगट किरणांनी
धरती झाकोळली असताना,
मलूल वाऱ्याने अंगावर शिडकावलेल्या
पाचोळ्याचा पिवळट उदासपणा
रोमारोमात भिनतो.
सावल्या लांबट, गडद होत होत
अंधार पसरवीत असताना,
शिणलेल्या एकल्या डोळ्यांच्या खाचांत
भावनांचा उष्ण डोह दाटून येतो;
अंधाराच्या अनंत छटा एकजीव होतात,
अन् सर्व दिशा बधीर होऊन डोहमय होतात.
धडपडत येणाऱ्या वाऱ्याबरोबर
येते अडखळती तान कानी;
सळसळणाऱ्या अदृश्य पालवीत
हलकेच फुलते रातराणी !
चंद्राच्या मिस्कील हास्याने
अंधार सहजच विरून जातो,
चंद्रशीतल वाऱ्याच्या झुळकीने
डोह हलकेच आटून जातो !

●●●

राजेश आचार्य (१२ वी, शास्त्र)

## काळी रात्र

एक निर्घृण काळी रात्र
उत्कर्षाच्या आदर्शाची
गाथा अर्धीच राहिली
बुडाली खोल प्रवाहात
झाले ओसाड सगळे रान
त्यात भटकती पाखरे दोन
पाठीमागे आगीचा डोंब
पुढे काय ? नियतीची आण

वृक्षा, तू दे सावली त्यांना
खड्यांनो, नका टोचू पायांना
सूर्या, तळपू नको चौफेरी
नियतीचा बाण घुसलाय जिव्हारी

●●●

बी. व्ही. झगडे (१२ वी, कला)

## खूण

तुझे माझे नाते तुला मला ठावे
आणि आहे ठावे देवाला !
त्याच्याच कृपेने घडल्या या भेटी
कधी गळामिठी सुटू नये !
कशाला करावा बोभाटा जनात
मौनाच्या मनात स्वस्थ राहू !
पाहताच पटली अंतरीची खूण
लक्ष जन्मांतून एकदाच

●●●

सदानंद बेलसरे (१२ वी, शास्त्र)

## नियतीचा घाला

नियतीचा घाला अचानक आला
उमलता संसार कोमेजून गेला
भर दिवसा सूर्य अस्ताला गेला
मनात नभात काळोख दाटला

रथाचं एक चाकच निखळलं
जीवनी सुन्न एकटेपण आलं
गोजिरवाणी दोनच फुलं
शैशव त्यांचं पोरकं झालं
श्रद्धांजली वाहता शब्दही थकले
गळ्यात मूक हुंदके दाटले
हुंदके दाटले.

●●●

सुनील दयाराम पाटील
११ वी, शास्त्र

## रूढी

'रूढी–रूढी–रूढी' कंटाळले या शब्दाला
कशाला लोक या रूढींचे गुलाम होतात
का त्या हृदयाला कवटाळून घेतात
या रूढींच्या जगात जीव गुदमरतोय्
एखाद्या तडफडणाऱ्या माशासारखा
कणाकणातून आक्रोश उठतोय्
रूढी, रूढी, रूढी...
कधी मला वाटतं की
मेघांचा जोरात गडगडाट व्हावा
खूप मुसळधार पाऊस पडावा
आणि त्या त्याच्या प्रत्येक थेंबाबरोबर
या सर्व रूढी वाहून जाव्यात
मग जिकडे-तिकडे सृष्टी फुललेली दिसेल
नवीन किरणांचा प्रकाश पसरू लागेल
आणि नवे जग जन्माला येईल
नवे जग जन्माला येईल

●●●

कु. माधुरी गोसावी
१२ वी, कला

## फुला रे फुला

फुला रे फुला
तू असा रे कसा
माळ्याच्या मळ्यात
जन्मला कसा ?
तुझ्या जवळ
येईन मी
तोडून तुजला
घेईन मी ॥
तुझा किती रे
सुगंध सुंदर
पाहुन तुजला
भुलतो मधुकर ॥
जो तो घेतो
तुजला हाती
सुवास घेऊन
हरखुन जाती ॥
जात पात
नाही मानत
सर्वांना आनंद
वाटतो जगात ॥
वाऱ्या वादळाला
हात पालवुनी
हासत नाचत
सांगतो कहाणी ॥
'मी जीवनात
नाही दुःखी
म्हणून जगाला
करतो सुखी'

●●●

एस्. एन्. शिंदे
१२ वी, वाणिज्य

*With Best Compliments from :*

PROMINENT CENTRE OF CO-OPERATIVE COMPLEX
IN MAHARASHTRA STATE
" SILVER JUBILEE YEAR "

## Shri Chhatrapati Sahakari Sakhar Karkhana Ltd.,

Bhavaninagar, Tal. Indapur, (District-Pune) Pin Code No. : 413 104

Tele. No. :
31, Bhavaninagar

Tele. Address :
" SHIVSAKHAR "
Bhavaninagar ( Pune )

**Started Sugar Production in 1957. This Agri. Industrial Undertaking has now bloomed into a Centre of Economic and Welfare Activities in the area of operation comprising 1/ villages in Baramati and Indapur Talukas of Maharashtra State.**

BOARD OF DIRECTORS :

1. Shri. Bajirao Dinkarrao Jachak — Chairman
2. " Tukaram Shankarrao Patil — Vice-Chairman
3. " Sahebrao Namdeorao Jachak — Director
4. " Shahajirao Marutrao Machale — do
5. " Suryakant Sadashivrao Nimbalkar — do
6. " Tukaram Ramchandra Sapkal — do
7. " Rajendrakumar Baburao Gholap, M.L.A. — do
8. " Manikrao Ramchandra Mane — do
9. " Anandrao Martand Rupnawar — do
10. " Tatyaram Vithal Shinde — do
11. " Sopanrao Gulabrao Kate — do
12. " Kantilal Raoji Vhora — do
13. " Dinkarrao Govindrao Pawar — do
14. " Shivajirao Sopanrao Jachak — do
15. " Sambhajirao Genu Borkar — do
16. " Manikrao Sopanrao Jachak — do
17. " Laxmanrao Krishna Gawade — do
18. " Jagannath Atmaram Hingane — do
19. " Bhimdeorao Bhivaba Ghule — do
'B' Class Socy. Members' Nominee
20. " Haribhau Gajanan Deshpande, Co-opted. — do
21. The Regional Dy. Director of Sugar — Govt. Nominee
22. " Narhari Narayan Takle — Bank Representative
23. " Mahadeorao Sambhajirao Kharat — Backward Class Representative
24 " Hanmantrao Shankarrao Patil — Managing Director

## कार्याविष्कार



- केवळ हृदय आणि बुद्धीच नव्हे तर जोडीला कर्म हवे–ते कर्म बुद्धीच्या निकषावर घासून घ्यावे आणि सहृदयतेने करावे.
- ज्ञान आणि सौंदर्य, प्रतिभा आणि प्रज्ञा यांची संगत जुळवते ते खरे शिक्षण.

रवींद्रनाथ टागोर

- जीवनाचे ज्ञान, कलोपासना, विवेक यांच्याशी जेव्हा नाते तुटते, प्रकाशाचा वेध घेत कमला-प्रमाणे सुखदुःख पचवून फुलायची जिद्द जेव्हा संपते त्यावेळी व्यक्तिगत जीवनाप्रमाणे देशाचाही स्वतःवरचा विश्वास उडतो.

पु. ल. देशपांडे

- माणसाच्या आयुष्यातला तारुण्य हाच कालावधी ज्ञानाच्या, सौंदर्याच्या आणि विद्रोहाच्या ग्रहणाला सर्वात अधिक पोषक असतो. हे कंद या वयात रुजले नाहीत तर पुढल्या वयात ज्ञानवर्धन होणार नाही, सौंदर्यानुभव येणार नाही, आणि विद्रोहाला अनुसरणारी शांती लाभणार नाही.

त्र्यं. वि. सरदेशमुख



# अभ्यासविषयक कार्य

**परीक्षांचे निकाल**

(अ) वरिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १. | बी. ए. डिग्री कोर्स | ५३.०० टक्के |
| २. | बी. कॉम्. डिग्री कोर्स | ५३.७ टक्के |
| ३. | एम्. ए. (मराठी) | ८०.०० टक्के |
| ४. | एम्. कॉम्. | ९५.२३ टक्के |

(ब) कनिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १. | १२ वी कला | ३९.२३ टक्के |
| २. | १२ वी शास्त्र | ४६.२९ टक्के |
| ३. | १२ वी वाणिज्य | ५८.९८ टक्के |

**विद्यार्थी संख्या**

(अ) वरिष्ठ महाविद्यालय

| | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण |
|---|---|---|---|
| १. पदवी वर्ग | ७९० | २५३ | १०४३ |
| २. पदव्युत्तर वर्ग | ११९ | ३३ | १५२ |
| (ब) कनिष्ठ महाविद्यालय | | | |
| | ११०३ | १६३ | १२६६ |

(क) वसतिगृहात राहणारे विद्यार्थी ८४, विद्यार्थिनी ४५

**नवागतांचे स्वागत**

(अ) वरिष्ठ महाविद्यालय

१. प्रा. के. एस. अय्यर (इंग्रजी)
२. प्रा. आर. जी. पाटील (अर्थशास्त्र)
३. प्रा. एस. आर. काकडे (राज्यशास्त्र) १० फेब्रु. पासून
४. प्रा. के. एम्. जाधव (मानसशास्त्र)
५. प्रा. एस. बी. खरोसेकर (रसायनशास्त्र)
६. प्रा. आर. डी. कांकरिया (रसायनशास्त्र)
७. प्रा. बी. आर. अग्रवाल (रसायनशास्त्र)
८. प्रा. सौ. एन. ए. पाटील (वनस्पतीशास्त्र)
९. प्रा. एस. बी. भांबुर्डेकर (वनस्पतीशास्त्र) १ ले सत्रअखेरपर्यंत
१०. प्रा. डॉ. एस. एल. शिंदे (प्राणिशास्त्र) १ ले सत्रअखेरपर्यंत
११. प्रा. ए. डी. साठे (प्राणिशास्त्र) २ ऱ्या सत्रापासून
१२. प्रा. एम्. व्ही. गोडसे (भूगोल)
१३. प्रा. एन्. एम् नारे (वाणिज्य)
१४. प्रा. कु. सी. आर. पांडे (वाणिज्य)
१५. प्रा. आर. व्ही. जोशी (राज्यशास्त्र) 'कोहसिप'खाली

(ब) कनिष्ठ महाविद्यालय

१. प्रा. एन्. एस. शिंदे (मराठी) २ ऱ्या सत्रापासून
२. प्रा. व्ही. बी. परकाळे (हिंदी)
३. प्रा. एस. पी. पाटील (इंग्रजी)
४. प्रा. एस. पी. घोळवे (अर्थशास्त्र)
५. प्रा. डी. के. गुरव (राज्यशास्त्र)
६. प्रा. के. एम्. जाधव (मानसशास्त्र)
७. प्रा. डी. एम्. दराडे (रसायनशास्त्र)
८. प्रा. ए. बी. पाटील (भौतिकशास्त्र)
९. प्रा. बी. डी. बोरसे (वनस्पतीशास्त्र)
१०. प्रा. एम्. जी. गोंडा (वाणिज्य)
११. प्रा. कु. ए. के. भालेराव (वाणिज्य)
१२. प्रा. व्ही. एस. भोसले (वाणिज्य)

**मराठी विभाग**

प्रमुख : प्रा. डॉ. दयाराम पाटील

'कोहसिप्' योजनांतर्गत कार्यक्रम :

१. व्याख्याने : (अ) डॉ. हेमंत इनामदार, प्राचार्य, एस्. एन्. डी. टी. महाविद्यालय, पुणे

(आ) प्रा. डॉ. गं. ना. जोगळेकर, प्रमुख, मराठी विभाग, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

२. चर्चासत्रे :

(अ) १ व २ नोव्हेंबर ८० रोजी 'नाटककार तेंडुलकर' या विषयावर.

सहभाग : प्रा. डॉ. अंजली सोमण–पुणे, प्रा. डॉ. भीमराव कुलकर्णी–पुणे, प्रा. प्र. ना. दीक्षित–फलटण; प्रा. उपासे–खटाव, प्रा. डी. एस्. शहा, प्रा. आर् टी. शहा, प्रा. एन. जी. लोंढे.

(आ) १४ व १५ मार्च १९८१ रोजी 'गेल्या दोन शतकांतील मराठी कथा : नवता व परंपरा'

सहभाग : प्रा. गंगाधर गाडगीळ–मुंबई, प्रा. डॉ. भीमराव कुलकर्णी–पुणे, प्रा. डॉ. गं. ना. जोगळेकर–पुणे, प्रा. डॉ. अंजली सोमण–पुणे, ह. मो. मराठे–पुणे, कमल देसाई, डॉ. स. गं. मालशे–मुंबई.

**हिंदी विभाग**

अध्यक्ष : डॉ. कृ. मं. सुर्वे.

विभागद्वारा आयोजित कार्यक्रम.

१. 'हिंदी दिवस' : १९ सितंबर १९८० को
प्रमुख अतिथि : प्रा. डॉ. दुर्गा दीक्षित–पुणे.

२. तुलसी जयंती : प्रमुख अतिथि : प्रा. डॉ. रामजी तिवारी पुणे.

'कोहसिप्' योजनांतर्गत कार्यक्रम :

१. व्याख्यान : डॉ. शिवराम माळी–सातारा, प्रा. सुरेश जैन–शिरूर, प्रा. हरि साने–पुणे, प्रा. कांतिलाल शहा–कर्जत.

२. विद्यार्थि-संगोष्ठी : २२ मार्च १९८१. स्नातक एवं स्नातकोत्तर विद्यार्थियों के लिए.

विषय : 'हिन्दी निबन्ध साहित्य एवं कुबेरनाथ राय'
विशेष अतिथि : प्रा. डॉ. ज्ञानराज गायकवाड–बार्शी,

३. प्राध्यापक-संगोष्ठी : १० एवं ११ जनवरी १९८१.

विषय : 'वर्तमान हिन्दी साहित्यकारों का आक्रोश : कितना सच्चा कितना झूठा !'

सहभाग : डॉ. भगवानदास वर्मा–औरंगाबाद, प्रा. रंगनाथ तिवारी–आंबेजोगाई, प्रा. निशिकान्त ठकार–सोलापूर, प्रा. सुरेश जैन–शिरूर, प्रा. डॉ. कृष्ण सुर्वे–बारामती, प्रा. महावीर कंडारकर–बारामती, प्रा. रतिकान्त शहा–बारामती, प्रा. सुभाष तळेकर–सासवड, प्रा. सुरेश बुरबुरे, प्रा. शरद भाळवणकर.

४. निबंध स्पर्धा :

विषय : 'राष्ट्रीय एकता में हिन्दी का योगदान'
विजयी स्पर्धक : कु. मंगल दोशी, कु. प्रज्ञा कुलकर्णी.

**English Department**

Head : Prof. V. V. Upadhye.

Activities under COHSSIP

1. Talks :
   a. Praf. Dr. Y. S. Kalamkas, wai.
   Topic 'Study of English in India Today.'
2. Lectures :
   a. Prof. Mulay, Ahmednagar.
   b. Prof. Solapur, Ahmednagar.
   c. Prof. B. N. Kulkarni, Pune.
3. Seminars :
   a. 31st Jan. & Feb. 1981.
   Sub : 'English Fiction during 1890 to 1914.,
   Chief Guests- Dr. C. Y. Daswani. Head, Department of English, Pune, Uulve[...]
   Dr. P. A. Takawale. Dean, Arts F[...]
   Pune University.
   13 papers were read and discussed.
   b. 23th March 1981.
   Sub : 'Tragedy'
   Chief Guests- Porf. Dr. Sinha, [...]
   University. Prof. Raikar Modern Co[...]
   Pune.
4. Educational Tours.
   A tour was arranged to Hyderab[...]
   visit CIEFL.
5. Participation of Teachers in Semi[...]
   Prof. V. V. Upadhye and Prof. K. S. [...]
   participated in seminar arranged by [...]
   University on 'New Directions o[...]
   Study of English.'
6. Use of Audio–aids.
   Students and Teachers listened to [...]
   cords and Tapes Hamlet Discs on Ph[...]
   logy, through Head phones Discus[...]
   with students.

**इतिहास विभाग**

प्रमुख : प्रा. ए. एस्. किर्णिगे

'कोहसिप' योजनान्तर्गत कार्यक्रम

१. व्याख्याने : प्रा. सावंत–इंदापूर, प्रा. थोरात–[...]

२. सहल : दिल्ली, आगरा, फत्तेपूर–शिक्री येथे

**अर्थशास्त्र विभाग**

प्रमुख : प्रा. एस्. जी. बोंद्रे

कोहसिप योजने खालील कार्यक्रम :

(१) व्याख्याने : पदवी वर्ग व पदव्युत्तर व[...]

१ प्रा. डॉ. पैठणकर (कोल्हापूर) ३०, ३१ ऑगस्[...]
२ प्रा. एल्. जी. जाधव (पुणे) ६ व ७ सप्टेंबर [...]
३ प्रा. एस्. एस्. जोशी (पुणे) ६ व ७ सप्टेंबर [...]
४ प्रा. जी. आर. गोखले (पुणे) १० व ११ ऑक्टो[...]
५ प्रा. व्ही. आर. शिरगुरकर (पुणे) १० व ११ ऑक्टो[...]
६ प्रा. जे. एल्. गांधी (पुणे) १० व ११ ऑक्टो[...]
७ प्रा. एस्. जी. भानुशाली (कोल्हापूर) १९ सप्टेंबर[...]

(२) अभ्यास सहल : फेब्रुवारी १, २, ३ अ[...] सहल खोपोली येथे तेथील उत्पादन, बाजारपेठा, मजु[...] प्रश्न, सरकारी धोरणे याबद्दल विद्यार्थ्यांनी उप[...] माहिती मिळविली.

**राज्यशास्त्र विभाग**

प्रमुख : प्रा. डॉ. एस्. एन्. पुराणिक (प्रथम सत्र अखेर)
प्रा. डॉ. एस्. आर्. काकडे (१० फेब्रुवारी ८१ पासून)

१. पुणे विद्यापीठाच्या यू. एल. पी. योजनान्तर्गत आयोजित 'भारताचे परराष्ट्रीय धोरण' या विषयावर जुलै ८० च्या अभ्यास शिबिरात प्रा. व्ही. डी. काकडे यांचा सहभाग व

२. नोव्हेंबर ८० मध्ये 'भारतीय शासन व राजकारण' या विषयावरील अभ्यास शिबिरात प्रा. डी. के. गुरव यांचा सहभाग

'कोहसिप्' योजनान्तर्गत कार्यक्रम

१. व्याख्याने : पी. डी. ऋषी–नगर, प्रा. डॉ. ए. के. वकील–संगमनेर, प्रा. डॉ. व्होरा, प्रा. डॉ. क्षीरे–पुणे, प्रा. डॉ. श. ना. नवलगुंदकर–पुणे, प्रा. डॉ. वि. मा. बाचल–पुणे

२. अभ्यास सहल : 'पुणे महानगरपालिकेतील निर्णय प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी' पुणे येथे २२ नगरपित्यांच्या मुलाखती. १७ विद्यार्थ्यांचा सहभाग.

३. चर्चासत्र : दिनांक २७ मार्च ८१ रोजी.

विषय : भारतातील राजकीय पक्ष

सहभाग : प्रा. डॉ. व्होरा–पुणे विद्यापीठ, प्रा. देव–पुणे, प्रा. शिरोळे–पुणे, प्रा. नांदे–पुणे, प्रा. डॉ. दात्ये–औरंगाबाद, प्रा. दात्ये,–सोमेश्वरनगर, प्रा. शित्रे–इंदापूर.

**मानसशास्त्र विभाग**

प्रमुख : प्रा. बी. एस्. माने

'कोहसिप्' योजनान्तर्गत आयोजित कार्यक्रम :

१. व्याख्याने : डॉ. श्री. ब. गोगटे–पुणे, श्री. जी. आर. गोलम–रत्नागिरी, प्रा. एस्. जी. माळी–कोल्हापूर

२. अभ्यास सहल : दिनांक २७-१-८१ रोजी मेंटल हॉस्पिटल, पुणे येथे. १५ विद्यार्थ्यांचा सहभाग.

३. कृतिसत्र : दिनांक २० व २१ फेब्रुवारी ८१ रोजी
विषय : Psychological Testing

विशेष सहभाग : प्रा. व्ही. के. कोठुरकर, प्रा. डॉ. पिंपळखरे, प्रा. डॉ. अशोक निरफराके, प्रा. पी. एच्. मोदी, प्रा. डॉ. सी. जी. देशपांडे, प्रा. डॉ. एस्. डब्ल्यू. देशपांडे

**समाजशास्त्र विभाग**

प्रमुख : प्रा. एस्. पी. कदम.

कोहसिप् योजनांतर्गत कार्यक्रम :

१. व्याख्याने : प्रा. सिगरू–अहमदनगर, प्रा. डॉ. पुराणिक–बारामती, प्रा. डॉ. सुर्वे–बारामती

२. निबंध स्पर्धा : विषय : 'हुंडा पद्धती'

**गणित विभाग**

व्याख्याने : (१) डॉ. गोपालकृष्णन्–पुणे विद्यापीठ
(२) डॉ. ए. डी. जोशी–पुणे विद्यापीठ

**भूगोल विभाग**

प्रमुख : प्रा. बी. पी. जोहरापूरकर

भूगोल मंडळाचे उद्घाटन : २०–९–८० रोजी प्रा. सौ. संजीवनी दाते, सातारा यांच्या हस्ते.

व्याख्याने : सौ. संजीवनी दाते–सातारा, डॉ. पी. टी. मालशे–पुणे विद्यापीठ.

सहल : विजयनगर, बदामी, विजापूर.

**रसायनशास्त्र विभाग**

प्रमुख : प्रा. आर. जी. गांधी

१. व्याख्याने : ६–२–८१ : डॉ. एस्. एफ्. पाटील; प्रपाठक, भौतिक रसायनशास्त्र, पुणे विद्यापीठ
१२–२–८१ डॉ. आर. ए. भोबे, प्रपाठक, असेन्द्रिय रसायनशास्त्र. पुणे विद्यापीठ
६–३–८१ डॉ. ए. सी. रानडे. प्रपाठक, सेन्द्रिय रसायनशास्त्र– पुणे विद्यापीठ

२. अभ्यास सहल : ३० जानेवारी ते ३ फेब्रुवारी औरंगाबाद, अजंठा, वेरूळ इत्यादी ठिकाणी. तृ. वर्ष बी. एस्सी. च्या विद्यार्थ्यांनी मराठवाडा विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभाग, ॲरिस्टो फार्मास्युटिकल्स, ऑटोमोबाईल प्राडक्ट्स् ऑफ् इंडिया इत्यादी कारखान्यांना भेटी दिल्या.

**वाणिज्य विभाग**

प्रमुख : प्रा. डॉ. सी. एस्. शेट्टी

कोहसिप योजनेखालील उपक्रम :

'व्यापारी बँकेचे राष्ट्रीयीकरण या विषयावर निबंध स्पर्धा.

श्री. दबडे एम्. एस्. (एस्. वाय्. बी. कॉम) याचा प्रथम क्रमांक.

व्याख्याने :

३१-८-८०/डॉ. एम्. सी. दीक्षित–पुणे/कंपनी नियोजन
११-९-८०/डॉ. के. बी. देव–पुणे/मशीन आवर रेट
१९-२-८१/डॉ प्रा. ए. जी. गोसावी–पुणे/नफा विभाजन

चर्चासत्र :

१. दिनांक २२ व २३ मार्च १९८१ रोजी ' खाजगी क्षेत्रांतील मोठ्या उद्योगधंद्यांना होणारा भांडवल पुरवठा' उद्घाटन–श्रीमान सेठ लालचंद हिराचंद, मुंबई.

हजर असलेल्या प्राध्यापकांची नावे :

1. Dr. M. C. Dixit, Pune
2. Prof. S. G. Datar, Pune
3. Prof. A. V. Gosavi, Pune
4. Prof. G. D. Pethe, Pune
5. Prin. Dr. P. Subbarao, Kolhapur
6. Dr. R. L. Moktali ,,

एम्. कॉमच्या काही विद्यार्थ्यांना एफ्. वाय. बी. कॉमच्या विद्यार्थ्यांच्या वर्गावर शिकविण्याची संधी.

## पदव्युत्तर विभाग

संचालक : प्रा. डॉ. डी. टी. पाटील

गेल्या अनेक वर्षांपासून महाविद्यालयात मराठी व अर्थशास्त्र-राज्यशास्त्र (संयुक्त) व एम्. कॉम च्या अध्यापनाची सोय आहे. गतवर्षीपासून संपूर्ण इंग्रजी व यंदापासून हिन्दी, इतिहास व राज्यशास्त्र या विषयांच्या पदव्युत्तर अध्यापनाची सोय महाविद्यालयात करण्यात आली आहे.

प्रत्येक विभागाचा स्वतंत्र अहवाल पुढे दिला आहे.

### मराठी विभाग

विद्यार्थि–संख्या ३४

प्राध्यापक : प्रा. डॉ. डी. टी. पाटील, प्रा. डी. एस्. शहा, प्रा. आर. टी. शहा, प्रा. एन्. जी. लोंढे.

अतिथि–प्राध्यापक :

(१) प्रा. डॉ. भीमराव कुलकर्णी, पुणे (२) प्रा. डॉ. गं. ना. जोगळेकर, पुणे (३) प्राचार्य डॉ. हेमन्त इनामदार, पुणे (४) प्रा. प्र. ना. दीक्षित, फलटण

### हिन्दी विभाग

इसी वर्ष महाविद्यालय के हिन्दी विभाग में स्नातकोत्तर अध्यापन का आरम्भ.

विद्यार्थि–संख्या : १६.

प्राध्यापक : प्रा. डॉ. कृ. मं. सुर्वे, प्रा. मह[illegible] कंडारकर.

अतिथि प्राध्यापक : प्रा. डॉ. दुर्गा दीक्षित–[illegible] प्रा. डॉ. प्रभाकर ताकवले–पुणे, प्रा. डॉ. कृष्ण दि[illegible] –पुणे, प्रा. डॉ. रामजी तिवारी–पुणे, प्रा. डॉ. [illegible] संगोराम–पुणे, प्रा. डॉ. चन्द्रभानु सोनवणे–औरंगा[illegible]

विभाग में सम्पन्न कार्यक्रम :

१. संयुक्त अध्ययन :

विद्यापीठ के हिन्दी विभाग में संयुक्त अध्यय[illegible] दो कार्यक्रम.

सहभाग : तुळजाराम चतुरचंद महाविद्या[illegible] बारामती, हिन्दी विभाग–पुणे विद्यापीठ, गर[illegible] महाविद्यालय–पुणे.

व्याख्यान : डॉ. आनन्दप्रकाश दीक्षित.

२. संगोष्ठी : दिनांक १५ मार्च १९८१ को [illegible] विद्यापीठ के तत्त्वावधान में आयोजन.

विषय : ' सन्त साहित्य की प्रासंगिकता. '

अध्यक्ष : डॉ. प्रभाकर ताकवले–पुणे.

सहभाग : डॉ. कृष्ण दिवाकर–पुणे, डॉ. राम[illegible] तिवारी–पुणे, डॉ. चन्द्रभानु सोनवणे–औरंगाबाद, [illegible] महावीर कंडारकर–बारामती, डॉ. दयानन्द श[illegible] अहमदनगर, डॉ. व्यं. वि. द्रविड–कोल्हापूर, डॉ. [illegible] प्रथमवीर–हडपसर, प्रा. जगन्नाथ काळे–हडपसर, [illegible] शरद भाळवणकर–जुन्नर, प्रा. ए. आर्. जाधव–कोरे[illegible]

### इतिहास विभाग

याच वर्षापासून इतिहास विभागात एम्. ए. (सं[illegible] इतिहास) च्या अध्यापनाची सोय

विद्यार्थि–संख्या : २२

प्राध्यापक : प्रा. ए. एस्. किणिंगे, प्रा. एस्. पी. क[illegible] प्रा. व्ही. ए. संगई

अतिथि–प्राध्यापक :

डॉ. के. एन्. चिटणीस–पुणे, प्रा. डी. डी. थोरात–क[illegible] प्रा. आर्. एच्. भोसले–सातारा

### राज्यशास्त्र विभाग

याच वर्षापासून राज्यशास्त्र विभागात ' संपू[illegible] राज्यशास्त्रा ' च्या अध्यापनाची सोय करण्यात आली[illegible]

विद्यार्थि–संख्या:

प्राध्यापक :

प्रा. डॉ. एस्. एन्. पुराणिक (प्रथम सत्र अखेर)
प्रा. व्ही. डी. काकडे, प्रा. एस् आर. काकडे (१० फेब्रुवारी ८१ पासून)

अतिथि प्राध्यापक :

प्राचार्य डॉ. श. ना. नवलगुंदकर–पुणे, प्रा. डॉ. ए. के. वकील–संगमनेर, प्रा. डॉ. क्षीरे–पुणे विद्यापीठ.

### अर्थशास्त्र विभाग

व्याख्याने :

१. प्रा. डॉ. आर् जी. पैठणकर, कोल्हापूर
२. प्रा. जी. आर् गोखले, पुणे
३. प्रा. व्ही. आर्. शिरगुरकर, पुणे
४. प्रा. जे. एल् गांधी, पुणे
५. प्रा. एस्. जी. भानुशाली, कोल्हापूर
६. प्रा. डॉ. बी. जी. बापट
७. प्रा. डॉ. एम्. सी. दीक्षित

### दृक्श्राव्य केन्द्र व भाषाविज्ञान प्रयोगशाळा

ग्रामीण विभागातील महाविद्यालयांमध्ये अन्यत्र कुठेही नसलेला आमच्या महाविद्यालयाचा एक विशेष उपक्रम.

३१ जानेवारी ८१ दृक्श्राव्य केंद्राचे व प्रयोगशाळेचे उद्घाटन

उद्घाटक : मा. आ. शरच्चन्द्र पवार, विरोधी पक्षनेते.

अध्यक्ष : प्रा. डॉ. प्रभाकर ताकवले, डीन, आर्टस् फॅकल्टी, पुणे विद्यापीठ

विशेष अतिथी : प्रा. डॉ. सी. जे. दासवानी, अध्यक्ष. इंग्रजी विभाग, पुणे विद्यापीठ

अर्थसाहाय्य : भाषाविज्ञान प्रयोगशाळा : विद्यापीठ अनुदान मंडळ, रुपये ४६,०००/–

दृक्श्राव्य केंद्र : विद्यापीठ अनुदान मंडळ ३०,०००/–

### फिल्म क्लब

प्रमुख : प्रा. ई. के. पाटील

शास्त्र विभाग, इंग्रजी विभाग व राष्ट्रीय छात्र सेनेतील विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक चित्रपट दाखविले.

सहकार्य :

१. ब्रिटिश हायकमिशन
२. ऑस्ट्रेलियन हायकमिशन
३. यू. एस्. एस्. आर. कॉन्सुलेट जनरल
४. महाराष्ट्र राज्य दृक्श्रवण संस्था, पुणे

### ग्रंथालय

ग्रंथपाल : श्री. एस्. एन्. पाटील

विद्यार्थि-प्रतिनिधी . मोहन संपतराव कदम

ग्रंथ खरेदी व संख्या : १ मार्च १९८० ते ३१ मार्च १९८१या शैक्षणिक वर्षात ७६३५१-७८ रुपयांची ४५२२ पुस्तके विकत घेतली. ग्रंथसंख्या ४३,५०४ (किमत रुपये ५,४६,३७६–४३ ).

नियतकालिके : अंदाजे ४५००/– रुपयांची भारतीय व आंतरराष्ट्रीय १९० विविध नियतकालिके. अनेक नियतकालिके प्रकाशकाकडून भेटीदाखल येत असतात. अंदाजे १४०० रुपयांची १० वर्तमानपत्रे घेतली जातात. याशिवाय महाविद्यालये तर CA, NDA DBM, Upsc, Mpsc, Management Marketing, National talent Exam, Medical, Engineering, I.T I यांसारख्या परीक्षांना आवश्यक अशी पुस्तके व नियतकालिके उपलब्ध करून देण्यात आली. संशोधनासाठी Research Methozology च्या अनेक उपयुक्त पुस्तकांची भर.

पदव्युत्तर वर्गाची पुस्तके खरेदी : ३०,०००/– रुपये अनुदान विद्यापीठ अनुदान मंडळाकडून COHSSIP योजनेखाली २१३००/- रुपये अनुदान. पदव्युत्तर वर्गाची स्वतंत्र ग्रंथालय इमारत पूर्ण होत आहे.

बुक बँक : विद्यापीठ अनुदान मंडळाने पुरस्कारिलेल्या योजनेनुसार आणि विविध संस्था, व व्यक्तींनी दिलेल्या देणगीतून या वर्षी ८३४ वरिष्ठ ३४९ कनिष्ठ ४८५ गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुस्तकांचे संच देण्यात आले.

अभ्यासिका : सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत अभ्यासिका सुरू ठेवण्यात येते. विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी नोकरीच्या व विविध प्रवेश परीक्षेच्या जाहिराती, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रातील महत्त्वपूर्ण लेख काचफलकावर लावण्यात आले शिवाय व्यवसाय मार्गदर्शनपर पुस्तके प्रदर्शित करण्यात आली.

आमच्या ग्रंथालयात या वर्षी मा. प्राचार्य डॉ. जे के गोधा, प्रा. व्ही. व्ही. आचार्य, प्रा एस. पी. कदम, श्री. का. र पोळ, श्री. डी. डब्ल्यू शहा, प्रा. एस. आर. नवाथे, कु. पी. डी पवार, श्री. ज्ञानेश्वर जराड, प्रा एस. जी बोंद्रे, सन्मति प्रकाशन– बाहुबली, प्रा. डी. एस. शहा, समाज शिक्षणमाला, पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, ओरिएंट लाँगमन्स, शिक्षण संचालनालय पुणे, श्री. संजीव शेंबेकर, नरेंद्र प्रकाशन, सुविचार प्रकाशन पुणे इत्यादी व्यक्ती व संस्था यांच्याकडून उपयुक्त ग्रंथ भेटीदाखल मिळाले. या सर्वांचे आभार !

# अभ्यासेतर कार्य

**ज्ञान-प्रबोधिनी**

प्रमुख : प्रा. नी. ग. लोंढे

उद्देश :

'स्टाफ अॅकेडमीचा' विस्तार करून हे व्यासपीठ शहरातील विचारवंतांनाही उपलब्ध करून देणे.

आयोजित कार्यक्रम :

दि. २३-८-८० : प्राचार्य डॉ. हेमंत इनामदार (पुणे) 'ज्ञानेश्वर व नामदेव यांचा भागवत धर्म.'

दिनांक २६-९-८० : प्रा. रंगनाथ तिवारी (आंबेजोगाई) 'प्रेमचंदांच्या कादंबऱ्या.'

अध्यक्ष : डॉ. प्रभाकर ताकवले (पुणे)

दिनांक २९-९-८० : चर्चा : 'सत्रपद्धती व शिक्षण विकास'

प्रमुख अतिथी : डॉ. एस्. बी. गोगटे (पुणे) जॉइंट डायरेक्टर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे.

दिनांक २१-२-८१ : अॅड. धन्यकुमार दोशी, (कोल्हापूर) 'नोटरी रिपब्लिक'

दिनांक डॉ. व. झा. साळी, संशोधनाधिकारी, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, 'शैक्षणिक क्षेत्रातील संशोधन.'

दिनांक ५-३-८१ : प्रा. डॉ. व्ही. व्ही. बोरकर, प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. '१९८१-८२ चे केंद्रीय अंदाजपत्रक'

**वादविवाद व वक्तृत्व मंडळ**

प्रमुख : प्रा. व्ही. व्ही. उपाध्ये

विद्यार्थि-प्रतिनिधी : श्री. सुनील महामुनी

लोकमान्य टिळक पुण्यतिथी :

१ ऑगस्ट १९८० रोजी विद्यार्थी-प्राध्यापकांची लोकमान्य टिळकांच्या विविध पैलूंवर प्रकाश पाडणारी भाषणे.

महात्मा गांधी जयंती :

४ ऑक्टोबर ८० रोजी प्राचार्य डॉ. हेमंत इनामदार (पुणे) यांचे व्याख्यान.

कर्मवीर भाऊराव पाटील जयंती :

स्थानिक शाळांच्या सहकार्याने दिनांक २७ सप्टेंबर ८० रोजी साजरी. प्राचार्य शिवाजीराव भोसले (फलटण) यांचे भाषण.

समता दिन : डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन :

६ डिसेंबर ८० रोजी प्रा. डॉ. नवलगुंदकर (पुणे) यांचे व्याख्यान.

महात्मा फुले जयंती :

११ डिसेंबर १९८० रोजी डॉ. बाबा आढाव यांचे भाषण.

श्रीमती सावित्रीबाई फुले यांची १५० वी जयंती :

३ डिसेंबर ८० रोजी 'स्त्री मुक्ती चळवळ' या विषयावर विद्यार्थी-प्राध्यापकांची चर्चा.

निबंध-स्पर्धा : विषय- 'स्त्रीमुक्ती चळवळ'

**कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा**

कार्याध्यक्ष : प्रा. रतिकांत शहा.

विद्यार्थि-प्रतिनिधी- श्री. सुनील महामुनी.

२७ सप्टेंबर ८०. स्पर्धांचे उद्घाटन :

प्राचार्य शिवाजीराव भोसले

अध्यक्ष : नगराध्यक्ष श्री. धों. आ. सातव

वक्तृत्व स्पर्धा :

विषय : (१) ग्रामविकासाची शोकांतिका (२) स्त्रियांवरील अत्याचार : एक सामाजिक समस्या (३) महाराष्ट्रात मराठीची उपेक्षा (४) पुनश्च स्वदेशी (५) नरेचि केला हीन किती नर (६) मोरोपंतांचे काव्य समाज पराङ्मुख आहे काय ?

सहभाग : २७ महाविद्यालये. ४० स्पर्धक.

विजयी स्पर्धक :

१. श्री. आर. ए. बादरायणी, लॉ कॉलेज, पुणे
२. कु. अनघा वैद्य, बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे
३. कु. सुप्रिया चाफेकर, तु. च. महाविद्यालय, बारामती.

२८ सप्टेंबर ८०, वादविवाद स्पर्धा :

विषय : 'आजच्या राष्ट्रीय दुरवस्थेस बुद्धिवाद्यांची निष्क्रियताच जबाबदार आहे.'

सहभाग : १३ महाविद्यालये, २६ स्पर्धक.

विजयी संघ : श्री. शैलेश सडेकर व श्री. प्रदीप ति[illegible] के. जी. जोशी आर्टस् व एन. जी. बेडेकर कॉमर्स कॉलेज, ठाणे.



परीक्षक :

(१) डॉ. प्रभाकर ताकवले, डीन, आर्टस् फॅकल्टी, पुणे विद्यापीठ. (२) डॉ. एस्. बी. गोगटे, जॉइंट डायरेक्टर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे (३) प्रा. रंगनाथ तिवारी, आंबेजोगाई.

पारितोषिक वितरण :

प्रा. डॉ. एस्. डी. पाटील, डीन, सायन्स फॅकल्टी, पुणे विद्यापीठ.

**सांस्कृतिक विभाग**

प्रमुख : प्रा. डॉ. पी. डी. वावरे

विद्यार्थी-प्रतिनिधी : श्री. पंकज शहा.

दिनांक ३०-३-८० : प्रा. वसंत बापट यांचे काव्यदर्शन.

दिनांक ३-९-८० : शीघ्रकवी श्री. यशवंत तांदळे यांचे काव्यगायन.

दिनांक ४ व ५-१०-८० : स्टूडंटस अॅक्टिव्हिटी सेंटर, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे, येथील स्पर्धांमध्ये कु. सुषमा नलावडे, कु. आरती निमकर व श्री. पंकज शहा यांचा सहभाग.

दिनांक २२-१-८१ : महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन : तीन एकांकिका, वाद्य-वृंद, दीपनृत्य, भांगडा, फॅन्सी ड्रेस इत्यादी कार्यक्रम.

दिनांक ६ ते ८ फेब्रुवारी ८१-संगमनेर येथे झालेल्या पुणे विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात सहभाग : श्री. पंकज शहा-तबलावादन, श्री. राजीव धामणस्कर-पेंटिंग, श्री. नंदू घाडगे - कथाकथन, श्री. राजीव दोशी-कथाकथन, कु. सुजाता खरात-काव्यवाचन.

**परिमल** (भित्तिपत्र)

अध्यक्ष : प्रा. बी. पी. जोहरापूरकर.

विद्यार्थी प्रतिनिधी : श्री. सुनील जगताप

१३ वर्षांची सफल वाटचाल

गांधी विशेषांकाचे प्रकाशन

मिराज मुलाणी, प्रमोद वडगावकर, अमर साबळे, गजानन भोसले, म. ना. करवे, कु. सुजाता खरात, कु. रुक्मिणी खराडे यांच्या कविता.

पी. डी. शेळके, राजीव धामणस्कर यांची चित्रे.

विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात भर पाडू शकतील अशा विविध विषयांवरील लेख.

**पारिजात** (हस्तलिखित)

शास्त्रशाखेच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम.

संपादक मंडळ :

कु स्मिता दोशी, कु. अंजली पानसे, श्री. राजीव कोल्हटकर, श्री. चंद्रकांत यादव.

स्नेहसंमेलनात कलाप्रदर्शनाच्या उद्घाटनाबरोबर हस्तलिखिताचे प्रकाशन

प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांच्या शुभ हस्ते

**सहल विभाग**

प्रमुख : प्रा. बी. एस्. माने

विद्यार्थि-प्रतिनिधी : श्री. हनुमंत पाटील

गोवा, हैद्राबाद, पुणे, खोपोली, औरंगाबाद, दिल्ली इत्यादी ठिकाणी सहली आयोजित केल्या.

## क्रीडा विभाग

**जिमखाना** (वरिष्ठ महाविद्यालय)

चेअरमन : प्रा. ए. एस्. किणिंगे

फिजिकल डायरेक्टर : श्री. ए. एस्. मेहेर.

विद्यार्थि-प्रतिनिधी :

(१) श्री. घुले ए. व्ही., आय्. सी. एस्. आर्. (मुले)
(२) कु. शैला दरेकर, आय्. सी. एस्. आर. (मुली)
(३) श्री. ढेरे एम्. एस्., क्रिकेट व मायनर गेम्स
(४) श्री. शेंदरकर डी. जी., बॉलगेम्स
(५) श्री. कुंभार जी. एस्., इंडियन गेम्स
(६) श्री. शेलार ए. एम्., अॅथलेटिक्स व कुस्ती

पुणे जिल्हा विभागाचे अध्यक्ष :

प्राचार्य डॉ. जे. के. गोधा

सचिव : श्री. ए. एस्. मेहेर

विशेष कामगिरी :

१. टेबल टेनिस (मुले) :

सोमेश्वर येथे आन्तर महाविद्यालयीन स्पर्धेत अजिंक्यपद. श्री. वीरेन्द्र शहा, श्री. हेमन्त गोरे व श्री. एम्. पी. जोशी यांचा उल्लेखनीय खेळ व पुणे जिल्हा विभागीय स्पर्धेसाठी निवड

२. कबड्डी (मुली) :

**हडपसर येथे आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत अजिक्यपद.** पुणे जिल्हा विभागाच्या कप्तानपदी कु. शैला दरेकर यांची निवड व कु. रंजना पोतेकर, कु. विजया पाटसकर, कु. सुलभा शिंदे, कु. प्रतिभा शिंदे, कु. अंजली फडतरे, कु. लता शेरकर, कु. मधुमती बोथरा यांची खेळाडू म्हणून निवड

अमृतसर येथील आंतर विद्यापीठीय स्पर्धेसाठी कु. शैला दरेकर, कु. रंजना पोतेकर, कु. विजया पाटसकर व कु. प्रतिभा शिंदे यांची निवड व पुणे विद्यापीठास अजिक्यपद सतत तिसऱ्यांदा मिळवून देण्यात महत्त्वाचा वाटा.

कु. रंजना पोतेकर यांच्याकडून सांगली येथील नॅशनल कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला संघाचे प्रतिनिधित्व.

३. कबड्डी (मुले) :

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत उपविजेतेपद–श्री. एस्. एम्. पोटे यांची जळगाव येथील आंतर विद्यापीठीय स्पर्धेसाठी पुणे विद्यापीठाचा कप्तान म्हणून व कुरुक्षेत्र येथील विभागीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड.

श्री. चक्रनारायण यांची पुणे जिल्हा विभागासाठी निवड.

४. कुस्ती :

सासवड येथे आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत महाविद्यालयास चॅंपियनशिप.

विशेष कामगिरी :

| | | | |
|---|---|---|---|
| १. काळे डी. बी. | ७४ | किलो वजन गटात | प्रथम |
| २. आटोळे पी. आर्. | ६८ | ,, ,, | प्रथम |
| ३. गाडे एस्. ए. | ९० | ,, ,, | प्रथम |
| ४. जाचक एस्. के. | १०० | ,, ,, | द्वितीय |
| ५. तावरे पी. बी. | ६२ | ,, ,, | प्रथम |
| | | ,, ,, | तृतीय |

–श्री. काळे डी. बी. व श्री. आटोळे पी. आर्. यांची कर्जत येथे आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड.

५. क्रिकेट :

आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत अजिक्यपद.

संघ :

हेमंत गोरे (कप्तान), पाटील एस्. आर्., कोठारी एस्. व्ही., भिसे जी पी., पऱ्हाळे आर्. जी., चक्रनारायण पी. आर्., ढरे एम्. एस्., आनंदवाला एच्. टी., भोसले व्ही. एच्., दोशी बी. जे., सोमाणी एस्. एच्., रा[illegible] भोसले एस्. एस्., भट्ट पी. जी., कोठारी बी. व्ही.

पंच :

श्री. व्यंकट बहादुरकर, श्री बागवान.

६. व्हॉलीबॉल (मुली)

–आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत अजिक्यपद

–आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवडला गेलेला [illegible]

कु. छाया मोरे (कप्तान), कु. वर्षा पोळ, [illegible] कल्पना पोळ, कु. शुभांगी पाटील, कु. अंजली फड[illegible] कु. मिसाळ एम्. बी., कु. वाघ व्ही. बी., कु. [illegible] एम् एस्., कु. वणजवाडे ए. बी., कु. दुरुगकर एस्. [illegible]

७. बास्केटबॉल :

कु. रंजना पोतेकर, कु. शैला दरेकर, कु. सिंग या[illegible] विभागीय स्पर्धेसाठी निवड.

८. मल्लखांब :

–आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत अजिक्यपद.

श्री. गायकवाड एस्. टी., श्री. माने, श्री. च[illegible] शिंदे, श्री. जगताप व श्री. रूपनवर यांची पुणे जि[illegible] विभागातर्फे आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड.

**जिमखाना** (कनिष्ठ महाविद्यालय)

चेअरमन : प्रा. ए. एस् किणिगे.

फिजिकल डायरेक्टर : श्री. एस्. बी. इंगवले.

पी. टी. लीडर्स : श्री. गावडे बी. एस्., श्री. शिंद[illegible] सोनवले, श्री. कुंभार जी. एस्, श्री. शेलार ए. [illegible] श्री. चिनके एम्. जी.

१. खो-खो : (मुली)– बारामती गटातील शा[illegible] सामन्यात अजिक्य पद

२. टेबल-टनिस : (मुले-मुली)– बारामती ग[illegible] अजिक्य पद. पुण जिल्हा विभागीय पातळीवर उपविज[illegible]

३. कुस्ती : पुणे जिल्हा विभागीय पातळीवर [illegible] विजयी. कुस्तीगीर : श्री. बाळकृष्ण होनराव, पुसाळकर, श्री. सोनवणे

४. भालाफेक : महाराष्ट्र राज्य ग्रामीण भाला[illegible] स्पर्धेत श्री. इंगुले एस्. डी. यांना सुवर्णपदक व हज[illegible] बाग येथे अ. भा. स्पर्धेसाठी निवड.



# विविध उपक्रम

**राष्ट्रीय छात्र सेना**

कंपनी कमांडर : प्रा. कॅ. ए. एस्. किणिगे,

सेकंड लेफ्टनंट : ए. एस्. मेहेर

सीनियर अंडर ऑफिसर : श्री. एस्. डी. महामुनी

छात्रसैनिक संख्या : १६०

वैद्यकीय तपासणी : डॉ. व्ही. एम्. कोठारी

निकाल (१९७९–८० चा) :

'सी' सर्टिफिकेट– ७ पैकी ६ उत्तीर्ण,

'बी' सर्टिफिकेट– २३ पैकी १८ उत्तीर्ण

मानवन्दना :

१५ ऑगस्ट' ८० : नगराध्यक्ष श्री. धों. आ. सातव,

२६ जानेवारी' ८१ : प्राचार्य जे. के. गोधा

फायरिंग :

१४ स्प्टेंबर १९८० : दौंड येथील एस्. आर. पी. रेंजवर. सहभागी छात्रसैनिक : ९८. विशेष मार्गदर्शन : बटालियन कमांडर, रोम ऑलिंपिक हॉकी पटू मे. एम्. एम्. जाधव व ग्रुप कमांडर ले. कर्नल अशोक कॉंक यांचे.

ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प :

नोव्हेंबर ८० मध्ये पाचगणी येथे ४४ छात्रसैनिक सहभागी.

परीक्षार्थींची संख्या :

सी सर्टिफिकेट : ११, बी सर्टिफिकेट : २२

**राष्ट्रीय सेवा योजना**

प्रमुख : प्रा. व्ही. डी. काकडे

सहभागी विद्यार्थी : विद्यार्थी ६०. विद्यार्थिनी ४०.

उद्घाटन : १० ऑगस्ट १९८० रोजी प्रा. डॉ. के. एम्. सुर्वे यांच्या हस्ते.

भेटी :

श्री. व्ही. एन्. भिडे, प्रमुख, रा. से. योजना, पुणे विभाग.

दत्तक ग्राम : रुई.

शिबिरे :

२१ सप्टेंबर १९८० : रुई येथे, ८ फेब्रुवारी १९८० : रुई येथे, २१ ते ३० नोव्हेंबर १९८० : रुई येथे. कार्य : ग्रामसफाई, विहीर स्वच्छता, एक कि. मी. रस्त्याची दुरुस्ती, नाल्यास भराव टाकणे, मंदिराच्या ओटयाचे बांधकाम, पार व क्रीडांगण तयार करणे, पिकांवरील रोग व त्यांच्या निवारणाचे उपाय, वृक्षसंवर्धन, गोबरगॅस यांचे महत्त्व समजावून ग्रामस्थांचे उद्बोधन. मनोरंजक व सांस्कृतिक कार्यक्रम.

सार्वजनिक व सांस्कृतिक कार्यक्रम :

नगरपालिका रुग्णालयात स्वच्छता व रुग्णांशी चर्चा, बालसुधार गृहामध्ये तीळगूळ समारंभ, मुलांच्या चाचण्या, शर्यती. महाविद्यालयाच्या प्रांगणात श्रमदान, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन.

जिल्हा शिबिरात सहभाग :

श्री. राजीव दोशी व कु. सीमा मुथा

विद्यार्थि-नेतृत्व :

श्री. राजीव दोशी, श्री. धोत्रे, कु. सीमा मुथा, कु. जया भापकर.

**महाविद्यालय–शाळा समूह–योजना**

प्रमुख : प्रा. व्ही. ए. वकील

व्यवसाय मार्गदर्शन : १० वी नंतरच्या अभ्यासक्रमाची व विविध व्यवसायांची माहिती.

प्राध्यापकांच्या शाळा भेटी : प्राध्यापकांनी समूहान्तर्गत शाळांना भेटी देऊन तेथील विद्यार्थ्यांना व अध्यापकांना मार्गदर्शन केले.

चर्चासत्र : गणित, इंग्रजी विषयांची दोन दिवसांची चर्चासत्रे आयोजित केली, १५ शाळांतील शिक्षकांनी लाभ घेतला.

ग्रंथदान : महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील काही पुस्तके शाळांना भेट म्हणून देण्यात आली.

अध्यापकांना ग्रंथालय लाभ : समूहान्तर्गत शाळांतील अध्यापकांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचा मुक्तपणे लाभ घेतला.

वक्तृत्व व चित्रकला स्पर्धा : शालेय विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धा आयोजित केल्या.

**राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना**

प्रमुख प्रा. एस्. पी. कदम

पर्यवेक्षक : श्री. गुलाब जगताप

प्रौढ शिक्षण केन्द्रे :

बारामती शहर : (१) जवाहर नगर (२) वसंत नगर (३) कसबा (४) आंबेडकर नगर

बारामती परिसर : (१) बांदलवाडी (२) मळद

(३) अंबुणें (४) तांबूळवाडी (५) डोरलेवाडी
लाभ प्राप्त झालेल्यांची संख्या : ३००

स्त्रिया ५०, अनुसूचित जातीतील व्यक्ती २५२

सांस्कृतिक कार्यक्रम :

२२-१-८१, २५-१-८१, ७-२-८१ रोजी तांदूळवाडी, जवाहरनगर, आंबेडकर नगर येथे.

सहकार्य : श्री. मधुकर मुंडे को-ऑर्डिनेटर, नॅशनल ॲडल्ट एज्यु. पुणे युनिव्हर्सिटी, श्री. विलास वाघ प्रकल्प अधिकारी, पुणे विद्यापीठ.

**कमवा आणि शिका योजना**

प्रमुख : प्रा. व्ही. ए. वकील

लाभ घेणारे विद्यार्थी : ३०

योजनान्तर्गत कामे :

बागकाम, वर्गसफाई, ग्रंथालयीन व कार्यालयीन कामे, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, सफाई इत्यादी

**व्यवसाय मार्गदर्शन**

प्रमुख : प्रा. व्ही. ए. वकील

उद्देश :

आपल्या आवडीनुसार व क्षमतेनुसार भावी आयुष्यात उपयुक्त असे अभ्यासक्रम निवडण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

कार्य :

(१) १० वी व १२ वी तील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन.

(२) भित्तिपत्रकाद्वारे विविध अभ्यासक्रमांचे व व्यवसायांचे मार्गदर्शन.

(३) निरनिराळ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पुस्तिका व मासिके उपलब्ध करून दिली.

**सामान्य ज्ञान केंद्र**

प्रमुख : प्रा. ए. एस्. किणिंगे.

उद्देश :

१. लोकसेवा आयोगाद्वारा घेतल्या जाणाऱ्या परीक्षांची माहिती करून देणे.

२. स्पर्धात्मक परीक्षांची माहिती करून देणे व त्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे.

३. जगातील विविध क्षेत्रांतील घडामोडींचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

कार्य :

जयपूर येथील 'रीडर्स रिसर्च मॉडर्न इन्स्टिट्यूट' या संस्थेतर्फे घेतल्या जाणाऱ्या अ. भा. स्तरावरील 'सामान्य ज्ञाना'च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची तयारी करवून घेण्यात आली.

परीक्षार्थींची संख्या : २७५

**निरंतर शिक्षण केंद्र**

प्रमुख : प्रा बी. एस्. माने

पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण केंद्रातर्फे आयोजित कार्यक्रम

१. शिवणकला वर्ग :

२५-३-८० ते २४-५-८० या दोन महिन्यांच्या कालावधीत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या महिलांसाठी

संयोजन : प्रा. बी. एस्. माने

२. योगासन शिबिर :

श्री. डी. ई. देशपांडे, चिंचवड यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १ ते ८ जुलै पर्यंत आयोजित.

१५ पुरुष व १५ महिलांनी लाभ घेतला.

संयोजन : श्री. अशोक मेहेर

३. सकस आहार योजना :

९ व १० डिसेंबर रोजी आयोजित.

४० विद्यार्थी व ३० महिलांना लाभ.

संयोजन : प्रा. व्ही. ए. वकील

४. लघु उद्योग मार्गदर्शन :

२८ जानेवारी ८१ रोजी आयोजित.

खडू, साबण, उदबत्त्या, धुण्याचा सोडा इत्यादी वस्तू तयार करण्यासंबंधी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन.

५० विद्यार्थी व २५ महिलांना लाभ.

५. प्रमुख धर्म परिचय व्याख्यानमाला :

संयोजक : प्रा. नी. गं. लोंढे

| | |
|---|---|
| ११-१-८१ | इस्लाम धर्म–श्री. हाफिज मोहंमद हारुन, मौलाना जामेम मस्जिद, बारामती |
| १८-१-८१ | जैन धर्म– प्रा. महावीर कंडारकर |
| २५-१-८१ | ख्रिस्ती धर्म– श्री. तिवारी |
| १-२-८१ | गीता धर्म– श्री. चं. प. भिशीकर, माजी संपादक, 'तरुण भारत,' पुणे |
| ८-२-८१ | बौद्ध धर्म– प्रा. रतिकांत शहा |
| १५-२-८१ | भारतीय राज्य घटनेतील धर्मनिरपेक्षतेचा अर्थ व धर्माचे जीवनातील स्थान प्रा. डॉ. वि. म. बाचल, फर्ग्युसन कॉलेज, पुणे |

**विज्ञान कार्यशाळा**

प्रमुख : प्रा. बी. बी. पाटील

उद्देश : तांत्रिक शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने समर्थ बनविणे. विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य प्राप्त करवून देणे.

कार्यशाळेतील विद्यमान यंत्रसामग्री

(१) लेथ (६.५ फूट लांब) (२) ड्रिल मशीन (३) ग्राइंडर (४) वेल्डिंग मशीन (५) हॅक् सॉ मशीन (६) कॉम्प्रेसर (७) कटिंग बेंडिंग मशीन्स (८) इलेक्ट्रिक मोटर्स

शिकविले जाणारे अभ्यासक्रम

फिटिंग, टर्निंग, वेल्डिंग.

अभ्यासक्रमांची सुरुवात : १७ नोव्हेंबर १९८०

अभ्यासक्रमांचा कालावधी ६ महिने.

लाभ घेणारे विद्यार्थी : ६१

मार्गदर्शन : श्री. अनिल हिरेमठ, श्री. ए. एम्. शेख, श्री. बी. एम्. बोबे.

अर्थसाहाय्य : विद्यापीठ अनुदान मंडळ. १,००,०००/–

## उल्लेखनीय कार्यक्रम

१. २३ जून ८० महाविद्यालयाचा वर्धापन दिन
२. १९ जुलै ८० वरिष्ठ महाविद्यालय निवडणुका
३. ३० जुलै ८० कनिष्ठ महाविद्यालय निवडणुका
४. २६ सप्टें. ८० मा. आ. ग. प्र. प्रधान व मा. भाई वैद्य यांची भेट.

**स्नेहसंमेलन**

प्रमुख :

प्रा. डॉ. डी. व्ही. तोगले, (वरिष्ठ महाविद्यालय) (कनिष्ठ महाविद्यालय)

प्रा. के. एस्. सणगर

प्रा. पी. बी. रंगवले

स्नेहसंमेलन प्रतिनिधी :

श्री. शिवाजी गाडे (वरिष्ठ महाविद्यालय)

२२ जानेवारी ८१ : (वरिष्ठ)

अल्पोपाहार, फिशपॉंड्स, बातमीपत्र, इत्यादी

एकांकिका :

(१) नोकरी सलामत तो... (२) आयजीच्या जिवावर (३) मंतरलेला हीरो

विविध गुणदर्शन :

(१) फॅन्सी ड्रेस (२) दीपनृत्य (३) विद्यार्थि-वाद्यवृन्द (४) भांगडा

२३ जानेवारी ८१ (वरिष्ठ व कनिष्ठ)

(१) फनी गेम्स (२) कला प्रदर्शन (३) चंद्रशेखर गाडगीळ यांचा 'मूव्ही म्यूझिकल' वाद्यवृन्द

२४ जानेवारी ८१ (कनिष्ठ)

अल्पोपाहार, फिशपॉंड्स, बातमी पत्र इत्यादी.

एकांकिका :

(१) सफाई (२) व्याह्यानं धाडलं घोडं

विविध गुणदर्शन :

(१) काव्य-दर्शन (२) विद्यार्थि-वाद्यवृन्द (३) भांगडा

विशेष :

स्नेहसंमेलन प्रसंगी महाविद्यालयाच्या सर्व इमारती विद्युद्दीपांनी सजविल्या गेल्या होत्या.

**पारितोषिक वितरण**

१३ मार्च ८१ : गुणवत्ता पारितोषिक–वितरण

अध्यक्ष : प्राचार्य डॉ. जे. के. गोधा.

प्रमुख अतिथी : डॉ. व. मा. कोठारी

१४ मार्च ८१ : क्रीडा-नैपुण्य पारितोषिक वितरण.

अध्यक्ष : प्रा. गंगाधर गाडगीळ.

प्रमुख अतिथी : मिस्. टी. मॅथ्यू, I.A.S. प्रांत–बारामती विभाग.

**सत्कार समारंभ : ३१ ऑक्टोबर ८० :**

१. प्रा. डॉ. एस्. एन्. पुराणिक– मुंबई विद्यापीठामध्ये राज्यशास्त्राचे प्रपाठक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल.

२. श्री. ए. एस्. मेहेर– कबड्डी पंच परीक्षेत महाराष्ट्र पातळीवर तिसरा क्रमांक प्राप्त केल्याबद्दल.

३. प्रा. ए. एस्. पंढरी– भोपाळ विद्यापीठात बी. एड्. परीक्षेत सर्वप्रथम आल्याबद्दल.

४. प्रा. एस्. एल्. शिंदे– यांना पुणे विद्यापीठाने जीवशास्त्र विषयामध्ये पीएच्. डी. पदवी प्रदान केल्याबद्दल.

